रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २७ ऑगस्ट २०२३



## भारतात आजही ब्रिटिशकालीन कायदे

# गुलामगिरीचे प्रतीक गाडा

कायदा म्हणजे नियम, सूचना, निर्बंध आणि अधिकारांची संहिता जे मानवी वर्तन नियंत्रित करते. परंतु ही भूमिका नैतिक, धार्मिक, सामाजिक संहिता देखील बजावते. कायदे हे देशाच्या अंर्तगत व बाह्य संरक्षणासाठी आणि प्रजेच्या हितासाठी,रक्षणासाठी केले जातात. जर राज्यकर्ताने जर नियम व कायदे मनमानीपणे लादले यातून प्रजेत उद्रेक होतो मग यातून सरकार विरोधात उठाव होतो. भारतात न्याय देवतेच्या डोळ्यावर पट्टी बांधलेली असून हातात समान न्याय देणारा तराजू होतात दाखविण्यात आलेला आहे.देशात अनेक गाजलेल्या प्रकरणात ''कडक' कारवाई केली जावी, अथवा फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली जाते! वास्तविक शासनाला शिक्षा देण्याचा अधिकार नाही,तो न्याय संस्थेला आहे. काही आरोपीला सत्र व उच्च न्यायालयातपर्यंत शिक्षा कायम राहते, पण ते सर्वोच न्यायालयात निर्दोष सुटतात! तेंव्हा तपास यंत्रणेने गुन्ह्याचा योग्य तपास करणे महत्वाचे आहे. न्याय संस्था त्या आधारे आरोपीला शिक्षा देत असते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ''सर्व मोदी चोर कसे ?, असे विधान केले. हे त्यांच्या अंगलट आले होते. त्यांनी मुख्य न्यायालय! सत्र व उच्च न्यायालयाने शिक्षा कायम ठेवली. पण सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दिलेली शिक्षा रद्द केली. त्यांना कायद्यातील अधिक शिक्षा देण्याची गरज होती काय ? असा प्रश्न न्यायालयाने केला आहे. वास्तविक गांधी बेताल बोलले हे नाकारले नाही. राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्याने जबाबदारीने वागले व बोलले पाहिजे. त्यामुळे त्यांना शिक्षा सुनावली गेली.पण काँग्रेसने यात षडयंत्र आहे,असे म्हणत याचे राजकीय भांडवल केले. केवळ देशात धनदांडगे, राजकीय नेत्यावर कारवाई झाली की, या मागे षडयंत्र असल्याचे म्हंटले जाते! ही मंडळी सर्वोच्च न्यायालयापर्यत धाव घेवू घेतात. यात अनेक प्रकरणात त्यांना दिलासाही मिळतो. मग सामान्य माणूस हा न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ शकतो काय ? याचा विचार केला जात नाही. भारतात मोगलांनी व इंग्रजांनी मराठवाड्यात निजामांनी अनेक वर्षे राज्य केले.या सम्राटांनी भारतीय जनतेला छळले, कायदे लादले. त्यामुळे त्यांना सत्ता गमवावी लागली. इंग्रज भारत सोडताना अनेक काही देऊन गेले! त्यांनी वास्तु कला, साहित्य, महत्वपूर्ण प्रकल्प, कायदे दिले. त्याबरोबर त्यांनी 'फूट डालो, राज्य करो' !ही त्यांची नीती होती. ती देशाला काँग्रेस पक्षाला शिकविली,असे वाटते! मोगल व निजाम हे राजे तर धर्मांध होते. त्यांनी प्रजेचा म्हणजेच हिंदूचा छळ केला,सक्तीचे धर्मातर केले. जनतेला गुलाम बनविले. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकारने सत्तेसाठी इंग्रजाची तीच नीती स्विकारली. सत्तेसाठी बगडी धर्ननिरपेक्षच्यानावाखाली तुष्टीकरणाचे राजकारण सुरु केले. काँग्रेस सरकार हे मोगल व इंग्रज साम्राज्याच्या गुलामीच्या खूणा जतन करत आलेला आहे. आजही इंग्रजानी केलेले कायदे आजही देशात लागू आहेत. या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. पण भारताचा आत्मा असलेले कायदे असावेत असे कधी त्यांना वाटले नाही. स्वातंत्र्यानंतर भारतात ५६५ संस्थाने होती पहिले गृहमंत्री स.वल्लभभाई पटेल यांच्या कणखर भूमिकेमुळे सर्व संस्थान भारतात विलीन झाली. यात स. पटेल यांचे मोठे योगदान आहे. दुसरीकडे जम्मू -काश्मीराचे: पंडित नेहरू व शेख अब्दुला या जोडीने वाटोळे करुन ठेवले होते. मोदी व भाजपा सरकारने काश्मिरचे ३७० कलम रद्द केले. त्यामुळे आज काश्मिरमध्ये एक झेंडा, एक घटना व देशातील सर्व कायदे लागू झालेले आहेत. भविष्यात पाक व्याप्त काश्मिर ताब्यात घेण्याची तयार भाजपा सरकारची तयारी आहे. काँग्रेस सरकार छोट्या राज्यातील समस्याकडे गांभिर्याने कधीच लक्ष दिलेले नाही. मणिपूर राज्याचा प्रश्न व संघर्ष जुना आहे. त्यात न्यायालयाच्या निकालाने संघर्षात भर पडली. यातून दोन समाजातील संघर्ष घडत आहे. पण या घटनेचे काँग्रेससह इतर विरोधी पक्षाने राजकारण केले.त्यांनी संसदेलाच वेठीला धरले! त्यांना केवळ पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करावयाचे होते. त्यातून भाजपा सरकारच्या विरोधात अविश्वास आणला होता. पण सभागृहात मतदान होण्यापूर्वी विरोधी पक्षाने पलायन केले. विरोधी पक्ष सभागृहाबाहेर गेल्यानंतर पंतप्रधान मोदी मणिपूरवर बोलले! अशी काँग्रेसची 'झील' चाटूगार पत्रकारांनी ओढली. पण विरोधी पक्षांनी पलायन का केले ? यावर पंतप्रधान मोदी यांनी संसदेत आधी बोलले पाहिजे, ही विरोधी पक्षाची मागणी संसदीय नियमाला धरुन होती काय ? हे विरोधी पक्षाला विचारले गेले नाही.यातून विरोधी पक्षाने काय साध्य केले ? संसदेच्या गोंधळात अनेक महत्वपूर्ण विधेयक संमत झाले. विरोधी पक्षाला चिंता वाटलेली नाही.इंग्रजांनी दिल्लीत प्रशासकीय कामासाठी जी इमारत उभारली होती ती इमारत ''संसद भवन' वापरली जातेय!.या इमारतीला ९६ वर्ष झाली आहेत. ही ईमारत जीर्ण होत होत चालली आहे. भविष्यात लोकप्रतिनिधी संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोदी सरकारने भविष्याचा वेध घेत म्हणून नवीन संसद भवनाची भव्य वस्तु उभारली. पण काँग्रेसने उदघाटनावरुन विघ्न आणण्याचा प्रयत्न केला. देशाच्या दिल्ली राजधानीत अनेक मार्गाला मोगभ वंशजाची नावे आहेत! याची काँग्रेसला लाज वाटली नाही. परराष्ट्र विभागाच्या इमारतीला अकबर भवन असे नाव आहे ? मार्गाचे नावे औरंगजेब, तुघलग, हुमायन रोड अशी आहेत! काँग्रेस सरकारने गुलामीच्या खूणा का पुसल्या नाहीत ? याचेमागे कारण मुस्लिम समाज नाराज होईल!याचीच भीती हौती !काँग्रेसने तर प्रेमाचे दुकान उघडले म्हणे! !दुसरीकडे तेलंगणा सरकार हे हैद्राबाद मुक्ती संग्राम दिन साजरा केला नाहीत. या राज्याचे मुख्यमंत्री निजामवंशाच्या दफनविधीला हजेरी लावली.ते निजामाचे गोडवे गातात!औरंगाबादचे छ. संभाजीनगर नामांतरावरुन बेगडी धर्मनिरपेक्षवाल्यांचे पोट दुखते!औरंगजेब हा क्रूर व धर्मांध राजा होता. पुरोगामी महाराष्ट्रात त्याचे उदात्तीकरण केले जात आहे.त्याच्या कबरीवर फुले वाहिली जात आहेत!तरी आपल्याला राग येत नाही.केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर कालबाह्य बाराशे कायदे रद्द केले.इंग्रजाचे कायदे आजही लागू आहेत! मराठवाड्यात हैद्राबाद संस्थानचे जमिनीचे कायदे लागू होते. ब्रिटीश राजवटीतील थॉमस मैकले हा कायद्याचा जनक मानला जातो,तो इतिहासकार व राजकारणी होता.तो अत्यंत बुध्दीवान होता.त्याचाच अध्यक्षतेखाली १८३४ मध्ये लॉ. कमीशन गठीत करण्यात आले होते. शकमिशनने इंडियन पीनल कोडचा प्रस्ताव तयार केला. इंग्रजांनी १९७२ ते १९४७ पर्यंत भारतात ५५ कायदे अमंलात आणले.इंडियन पीनल कोड कायद्याची १ जानेवारी १८६२ भारतात अमंलबजावणी सुरु झाली. पण काश्मिरमध्ये आर. पी. सी. म्हणजे रणबीर दंड संहिता लागू होती. आय.पी.सी मध्ये २३ भाग असून त्यात ५११ भाग आहेत. भारतात कायद्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. केंद्रिय गृहमंत्री शहा यांनी ११ ऑगस्ट २०२३ रोजी लोकसभेत १९६१ वर्षापासून चालत आलेला आय .पी.सी.(१८६० ) ॲक्ट जागी भारतीय न्याय संहिता २०२३ तर सी. आर. पी. सी. (१९७३) अपराधिक प्रक्रिया संहिता- २०२३आणि एव्हिंडेंस ॲक्ट (१८७२ ) भारतीय साक्ष्य अधिनियम २०२३ या नवीन नावाने प्रास्ताविक केले आहेत.या नवीन : कायद्यात ५३३ कलमे असणार आहेत.तसेच १६० कलमे बदलली असून ९ कलमे नव्याने जोडली,तर ९ कलमे रद्द करण्यात आली आहेत. नवीन कायद्यात शिक्षेत वाढ केली. मोदी सरकारने हे नवीन कायदे आणण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती,विधि विद्यापीठे,राज्याचे मुख्यमंत्री, खासदार, केंद्रशासित प्रशासकांना पत्र पाठवून शिफारशी मागितल्या होत्या. त्याकरिता गृहमंत्र्यांनी यांनी १५८ बैठका घेतल्या. त्यानंतर लोकसभेत तीन कायद्याचे विधेयक आणले गेले.देशात आता नवीन कायद्यानुसार फिर्यादीला कोणत्याही पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविता येईल. देशद्रोह कायदा रद्द करावा,अशी ओरड होती. देशद्रोह कायद्याला २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. न्यायालयाने भाजपा सरकारला याबाबत कठोर कारवाई न करण्याचे निर्देश दिलेले होते. पण आता देशद्रोह हा गुन्हा मानला जाणार नाही. पण नवीन कायद्यात कलम १५० अन्वये भारतापासून वेगळ होणे,अलिप्ततावादी भावना असणे, एकता व सार्वभौमत्व धोक्यात आणणे,हा गुन्हा ठरणार आहे. यासाठी जन्मठेप किंवा सात वर्षाच्या शिक्षेचे प्रावधान आहे. तसेच दहशतवादा- विरोधात मृत्यूदंडाची शिक्षेची तरतूद केली गेली. त्याप्रमाणे देशात महिला व अल्पवयीन मुलीवर बलात्काराचे प्रमाण वाढले आहे. याला आळा घालण्याच्या उद्देशाने सामुहिक बलात्कार प्रकरणात सद्या दहा वर्षे शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्यात वाढ करुन वीस वर्ष करण्यात आलेली आहे. अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार प्रकरणी मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाणार आहे. काँग्रेसने 'मॉब लिचिंग च्या नावाने शिमगा करत तुष्टीकरण राजकारण सुरू केले होते. पण मोदी सरकारने आता धर्माच्या आधारावर पाच किंवा त्याहून अधिक लोकांकडून हल्ला झाल्यास'मॉब लिचिंग' मध्ये समावेश केला आहे. तसेंच संघटीत गुन्हेगारी व बॉम्ब बनविणे हा गुन्हा मानला जाईल. त्याच प्रमाणे इलेक्ट्रानिक माहिती पुरावा मानला जाईल. संघटीत गुन्ह्यात मृत्यूदंडाच्या शिक्षा व संपतीजप्त करण्याची तरतूद केली गेली. गुन्ह्याच्या प्रकरणात साक्षीदार, पीडित व आरोपीला इलेक्ट्रानिक पध्दतीने हजर राहता येईल. नवीन कायद्यात फारेन्सिक व ट्रायल करण्याची व कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सत्र न्यायालयात उलटतपासणी ६० दिवसात निकाल देणे व ६० दिवसात आरोप निश्चित करावे लागेल.व्हिडीओग्राफीचा नवीन कायद्यात समावेश करण्यात आलेला आहे. सरकारी कर्मचाऱ्याच्या विरोधात गुन्हा असेल तर १२० दिवसात परवानगी देणे बंधनकारक केले आहे.देशात दोषसिध्द प्रमाण खूपच कमी आहे.त्यामुळे फारेन्सिक सायन्सच्या मदतीने ते ९° टक्यापर्यंत नेण्याचे केंद्र सरकारची इच्छा आहे. तसेच निकालाची कालमर्यादा असणार आहे.अश्या अनेक महत्वपूर्ण तरतूदी नवीन कायद्यात आहेत.आता नवीन कायद्याचे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठविण्यात आले आहे. समितीतील विरोधी पक्ष त्यावर मत मांडतील. नंतर ते विधि आयोगाकडे पाठविले जाईल. त्यानंतर पुन्हा ते तीन नवीन कायद्याचे विधेयक संसदेत येईल. काँग्रेस व विरोधी पक्ष पुन्हा या कायद्याचा विरोध करतीलच! संसदेत हा नवीन कायदा संमत होईलच याची खात्री आहे. तेंव्हा त्यावर विरोध करत आहेत! भाजपा व मोदी सरकार देशाचा इतिहास बदलत आहे,असा आरोप केला जातोय. पण केंद्रातील मोदी सरकार आल्यानंतर भारताची सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे.आर्थिक बाबतीत देश जगात आज पाचव्या स्थानावर आहे. तर २०२४ मध्ये भारत आर्थिक क्षेत्रात जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचा प्रयत्न चालू आहे. भारताचे चंद्रायान- ३ हे दक्षिण ध्रुव्रावर उतरण्यात यशस्वी झाले आहे! याचेही श्रेय काँग्रेस घेण्याचा प्रयत्न करत आहे. काँग्रेसने श्रेय घेण्याबरोबर देशात जे काळे करनामे केले तेही कबूल करावेत. इस्त्रोचे नामवंत शास्त्रज्ञ यांना १९९८ मध्ये केरळ पोलिसांनी अंतराळ कार्यक्रमाची माहिती पुराव्यालाच्या खोट्या आरोपाखाली अटक करुन होती. त्यांना गद्दार ठरविले होते शेवटी २०१८ सर्वोच्च न्यायालयाने त्यांचेवरचे आरोप खोटे असल्याचा निर्णय दिला.इतकेच खोटे आरोप ठेवल्याबद्दल पोलिसावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते! इतकेच नव्हे,केरळ सरकारला शास्त्रज्ञाला ५० लाख रुपये देण्याचे निर्देश दिले! शास्त्रज्ञाच्या या अत्याचारावर 'रॉकेट्री' हा चित्रपट निघाला होता. शेवटी या शास्त्रज्ञाचा मोदी सरकारने पद्म पुरस्कार देऊन सन्मान केला. भाजपा सरकारने नामवंत भारतीय शास्त्रज्ञाचा गौरव केला. नामवंत शात्रज्ञ ए.पी.जे अब्दुल कलाम यांना भारताचे राष्ट्रपतीपदाचा मान दिला. त्यांचा धर्म पाहिला नाही!ते सच्च देशभक्त होते!हे काँग्रेस सरकारला माहित नाही काय ? भारताच्या चंद्रयान- ३चे कामगिरीचे जग कौतूक करत आहे.पण काँग्रेस व विरोधी पक्षाला तेपचनी पडत नाही. असे दिसतेय! विरोधी पक्ष मोदींचा कितीही व्देष करत असला तरी पंतप्रधान मोदी यांचे नेतृत्वाखाली भारत नवा इतिहास रचत आहेत! हे मान्य करावे लागेल.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

### आधुनिक केसरी

भारतात १९६१ वर्षापासून फौजदारी न्यायालीय व्यवस्था ही ब्रिटीश कालिन कायद्याच्या आधारावर चालत आहेत. गुलामगिरीचे प्रतिक असलेले हे कायदे गाढून टाकावेत, असे काँग्रेसला कधी वाटलेले नाही. त्यांना भारतात मोगल, इंग्रजाचा गुलामगिरीच्या खूणा जपण्यात भूषण वाटते! याच मानसिकतेतून मोदी सरकार इतिहास बदलत आहेत, असा आरोप केला जातोय! पण स्वतंत्र गुलागिरीच्या खूणा हव्यात कशाला ? आता केंद्रात मोदी सरकार देशातील गुलामीगरचे प्रतिक असलेले वास्तु, नावे, कायदे पुसून टाकत आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत नुकते तीन नवीन कायदे, इंडियन पीनल कोड ( आ.पी. सी.) व क्रिमीनल प्रोसिजर कोड ( सी.आर.पी. सी.) आणि एव्हिडन्स ॲक्टच्या नावात बदल केला आहे. त्याजागी भारतीय आत्मा असलेले तीन कायदे आणले यामुळे फौजदारी भारतीय न्याय व्यवस्थेत फार मोठे बदल होतील. यावर मोदी विरोधक गप्प बसला आहे!





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्याने इंग्लंडच्या पार्लमेंटसमोर सांगितलं की मी सारा भारत फिरलो पण मला कुठेही एकही व्यक्ती चोर, गरीब किंवा बेरोजगार आढळली नाही. भारत हा व्यापारी, औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्ट्या आपल्यापेक्षा प्रगत देश आहे. भारतात प्रचंड श्रीमंती मी पाहिलेली आहे. आणि एखाद्या श्रीमंत व्यक्तीला गुलाम बनवणे कठीण असते. भारतीयांना गुलाम बनवणे, इंग्रजी सत्तेचे अंकित बनवणे म्हणूनच कठीण आहे. ' भगवानराव म्हणाले.
' काय आश्चर्य आहे काका, भारत खरंच एवढा श्रीमंत देश होता आणि तिथे एकही व्यक्ती गरीब किंवा भिकारी नव्हती ? ' राजेश म्हणाला.
'हो, राजेश. मेकॉले म्हणतो, मी ज्या ज्या घरी गेलो, त्या त्या ठिकाणी भरपूर श्रीमंती आणि समृद्धी पाहिली. एखाद्या शेतकऱ्याच्या घरी जसा गहू, हरभऱ्याची रास असावी असावी, तसा सोन्याच्या नाण्यांचा ढीग मी पाहिला आहे. मी त्या माणसांना विचारले की ही किती नाणी आहेत ? तर ती माणसे म्हणायची की आम्ही ती मोजत नाही. आमच्याकडे तेवढा वेळ नाही. त्यावेळी सोने हे विनिमयाचे साधन होते. आणि लोक तराजूच्या साहाय्याने किलोने सोने मोजत. ' ' बापरे, एवढे सोने होते भारतात ! ' पिंकी म्हणाली. ' हो, म्हणून तर इंग्रज भारताला ' सोने की चिडिया ' म्हणत. भारतात मंदिरे सुद्धा सोन्याची होती. मंदिरातील देवदेवांच्या मूर्ती,दरवाजे, कळस यासारख्या सगळ्या गोष्टी सोन्याचांदीच्या होत्या. मूर्तींच्या मुकुटात आणि अंगावर असलेल्या दागिन्यांमध्ये मौल्यवान रत्ने आणि जडजवाहिर होते. भारतात सोन्याचा धूर निघत होता असे आपण म्हणतो ही गोष्ट अक्षरशः खरी होती. तुम्हाला माहितीच असेल की गझनीच्या महम्मदाला सोरटी सोमनाथाचे मंदिर लुटण्यासाठी १७ वर्षे लागली होती. भारत केवळ कृषीच नव्हे तर व्यापारी आणि औद्योगिक दृष्ट्याही प्रगत होता. ' पिंकी म्हणाली, ' काका, किती वैभवशाली होता आपला प्राचीन भारत नाही ? '
' अहो मुलांशी बोलतच बसणार आहात की जेवायला पण येणार आहात ? जेवायची तयारी झाली आहे, ' आतून श्यामलाताईंनी आवाज दिला.' हो हो आलोच. भगवानराव, आता जरा ब्रेक घ्या. आपण सगळे जेऊन घेऊया. श्यामराव हसत हसत म्हणाले. ' हो बाळांनो, आणखी काही माहिती मी तुम्हाला नंतर सांगेन बरं का, ' भगवानराव म्हणाले. मग स्वयंपाकघराकडे वळली. ( क्रमशः )


## समृद्ध प्राचीन भारत


## आनंदी पहाट

## सजगता व सतर्कता दोन्हीही आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजगता, सतर्कता आणि

सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते.

## मूर्ती...

आधुनिक केसरी

मरावे परी किर्ती रुपी उरावे... असे आपल्याकडे म्हणतात. माणसाची ही मूर्ती कशी का असेना ,कशी म्हणजे लहान मोठी उंच बुटकी काळी गोरी सावळी सुस्वरूप कुरुप डोळस अंध जाड बारीक जशी असेल तशी शेवटी ती एक व्यक्ती असते. ती माणूस असते .मग त्या माणसाने असे जगावे की मृत्यूलाही त्याचा हेवा वाटावा. अशी कीर्ती या मूर्तीने मागे करून ठेवावी.. पण अपकीर्ती असू नये. ज्याप्रमाणे एखाद्या ओबडधोबड दगडातून मूर्तिकार आपल्या कौशल्याने सुंदर सुंदर मूर्ती घडवतो व त्या मूर्ती अजरामर होतात. दगडाची ओळख पुसल्या जाते .तिथे देवाची मूर्ती तयार होते .तो मूर्तिकार देखील मूर्तीच्या रूपाने आपली कीर्ती मागे ठेवून जातो .तसेच माणसाने देखील इतके चांगले कार्य करावे की त्याच्या कार्याची कीर्ती मागे अमर व्हावी. दगडाची एखादी आकर्षक मूर्ती असेल तर आपल्याला ती घेण्याचा मोह होतो .किंवा त्या मूर्तीला पाहाताच आपल्या मुखातून सहज उदगार बाहेर पडतात,,"वा किती सुंदर मूर्ती आहे!!!!! तसेच कार्य आपल्याकडून व्हावे. आपल्या कार्याचा सुगंध इतक्या दूरवर पसरावा की देवालाही आपल्या निर्मितीचा हेवा वाटावा. जन पळभर म्हणतील हाय हाय....
मी जाता मागे राहिल काय....? माणूस गेल्यानंतर मागे काहीच राहत नाही. त्याने कमावलेली संपत्ती मुलं वाटून घेतात व वर्षाला वडिलांच्या फोटोला एक हार घालतात. राहिले लक्षात तर ........ त्यासाठी संपत्तीपेक्षा चांगली संतती घडवू या. गरजूंना मदत करू .सर्वांशी प्रेमाने आदराने बोलू. जिभेवर नेहमीच सरस्वतीचा वास असतो तिचा आदर करू.काही समाज हिताची कामे करता आली तर नक्कीच करू .काही चांगले करता आले नाही तर निदान कोणाचे वाईट तरी करू नये. मूर्ती गेली तर मागे कीर्ती राहण्याऐवजी अपकीर्ती राहील . लोकांचे शाप आपल्याला लागू नये इतपत तरी चांगले वागण्याचा प्रयत्न नक्कीच करता येईल .....

संस्कारधन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.१३

## श्री नवनाथ माहिती....

आधुनिक केसरी

मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ, हे नऊ नाथ आहेत. इतर नावे : योग संप्रदाय, सिद्ध संप्रदाय, अवधूत संप्रदाय, दर्शनी पंथ, गोरख पंथ, गोरखनाथी संप्रदाय, कानफाटा संप्रदाय, गुरू संप्रदाय नाथ संप्रदाय हा भारतातील एक शैव संप्रदाय आहे. "नाथ" या संज्ञेचा अर्थ रक्षणकर्ता अथवा स्वामी असा होतो. आदिनाथ म्हणजेच शिव वा महादेव यांच्यापासून या संप्रदायाचा उगम झाला म्हणून त्याला "नाथ संप्रदाय" असे नाव मिळाले, असे सांगण्यात येते. या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर व्यक्ती आपल्या नावानंतर "नाथ" हा शब्द जोडता येतो. तांत्रिकदृष्टया दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्व असले तरी दोन्ही संप्रदायांकरिता पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. मध्ययुगीन भारतामध्ये अनेक नव्या संप्रदायांचा उदय झाला. त्यापैकी नाथ संप्रदाय हा एक प्रमुख आणि महत्त्वाचा संप्रदाय होय. या संप्रदायाचा उद्गम नेमका कसा, कोठे आणि कधी झाला याविषयी अनेक संशोधकांनी विविध मते मांडली आहेत. त्याविषयी माहिती घेण्यापूर्वी नाथांच्या संप्रदायाची पाश्ववभूमी पाहणे आवश्यक आहे. इसवी सनाच्या प्रारंभापासून नवव्या-दहाव्या शतकापर्यंतच्या सुमारे हजार वर्षांच्या काळात शैव, वैष्णव, बौद्ध, जैन असे अनेक संप्रदाय भारतामध्ये नांदत होते. पाचव्या शतकानंतरचा इतिहास पाहता असे दिसते की, शैवांच्या श्रीकुल आणि कालीकुल या दोन्ही शाखांमध्ये आणि बौद्धांच्या महायान पंथातून पुढे आलेल्या वज्रयान अथवा तंत्रयान परंपरेमध्ये अनेक वाममार्गी साधना पद्धतींचा अंतर्भावही हळूहळू होऊ लागला. श्रीशैल हे अशा तांत्रिक साधनांचे ख्यातकीर्त केंद्र असल्याचे रा. चिं. ढेरेंसारख्या अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. या पंथांमधूनच स्वतंत्र होत होत सिद्ध परंपरेचा जन्म झाला, ज्यामध्ये अशा तांत्रिक आणि वामाचारी उपासना पद्धतींना फाटा देऊन, बाह्याचारावर भर न देता तत्त्वानुभूती, भक्ती, योग इत्यादी साधनांवर भिस्त ठेवून मोक्षमार्गाची वाट चोखाळणारा सिद्ध संप्रदाय विकसित झाला.

## निरुपण


आधुनिक केसरी

सुकरो हि भवेन्मार्गः कृपया तव रेणुके|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७६ || हे रेणुके, तुझ्या कृपेने मार्ग सुकर व्हावा. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्तर स्थिर नाम में, बाहर तन का काम ।
पनिहारी शिर गागरी, त्यों अविचल रह नाम
।।१५।।(स्वर्वेद पंचम मण्डल षोडश अध्याय) ०५/१६/१५ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : आतून नामामध्ये म्हणजेच भगवंतात स्थिर आहे आणि बाहेर शरीराने कार्य होत आहे तसेच ज्याप्रमाणे पाणी घेऊन जाणारी महिला डोक्यावर पाण्याची घागर आहे आणि इतरांशी गप्पा-गोष्टीही करत आहे, त्याचप्रमाणे संतजन जगत् व्यवहार करत असतांना आपली चेतना परमेश्वरामध्ये स्थिर ठेवतात.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी


जीवन जगत असताना प्रत्येक गोष्टीचा "निदिध्यास"असणे गरजेचे असते.सततच्या ध्यासाने साधक आत्मस्वरूप बनतो.आणि आत्मस्वरूप अवस्था एकदा का समजली की तो सायूज्यमुकक्ति मिळवतो.संत पदी किंवा अत्यंत विचारवंत लोकांना आपल्या देहासकट संपूर्ण विश्वाचे ज्ञान मिळाले. की सगळीकडे आत्मस्वरूपाच्या दर्शनाचा ला्भ होतो. जे जे खोटे आहे त्याच्या खोटेपणा जाणून जर पाहिले तर व अनुभवास आले म्हणजे आत्मज्ञान झाले असे समजावे.यालाच मोक्ष असे समजावे. जे खरे आहे ते स्वतः सिध्द असते. ते काही नवीन निर्माण करावे लागतं नाही. किंवा खोटेपणा लपवण्या साठी दुसरा खोटेपणा दाखवावा लागतो. खोटेपणा वर झाकण घातले तर समाज तो खोटेपणा ओळखु शकतो.त्यामुळे खोटे समाज जीवन कधी ही जगु नये.त्यामुळे आपली सभ्यता नष्ट होते.समाजात पत रहात नाही. मोक्ष मिळवण्यासाठी खोट्याच्या अंमलातुंन सुटले पाहिजे. सद्गुरूचे वचन जो आपल्या या देहात घट्ट धरून ठेवतो तोच मोक्षाच्या अधिकारी हातो.तो सद्गुरूच्या विचारात सतत समरस होतो.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंतावर अकारण प्रेम करावे

आधुनिक केसरी

खरोखर, जगात आणि लौकिकांत आपण अडाणी राहिलो तर काही वाईट नाही. भगवंताच्या मार्गामध्ये त्याचा फायदाच होईल. आपण अडाणी झाल्याशिवाय, म्हणजे आपली विद्या आणि मोठेपण विसरल्याशिवाय, परमार्थ साधत नाही. मुलगा गावाला जाताना ज्याप्रमाणे आई त्याला फराळाचे देते, त्याप्रमाणे परमात्मा आपल्याला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्या परिस्थितीत राहण्यासाठी लागणारे समाधानही तो आपल्याला देत असतो. ते घ्यायची आपली लायकी मात्र पाहिजे. जिथे असमाधान फार, तिथे दुष्ट शक्तींना काम करायला वाव मिळतो. याच्या उलट, जिथे खरे समाधान आहे, तिथे चांगल्या शक्ति मदत करतात. आपण नामाला चिकटून राहिलो तर बाहेरची वाईट परिस्थिती बाधणार नाही. देहाचा मनाशी संबंध आहे, आणि मनाचा हृदयाशी संबंध आहे; म्हणून मन नेहमी अगदी समाधानात ठेवावे, म्हणजे प्रकृती चांगली राहून आयुष्य वाढेल. स्वार्थ सुटताना पहिल्या पहिल्याने मनुष्य व्यवहाराच्या चौकटीत बसणार नाही. जो येईल त्याला तो आपलाच म्हणेल. पण परमार्थ मुरला की तो व्यवहार बरोबर करून शिवाय निःस्वार्थी राहील. खरोखर, परमार्थ हे एक शस्त्र आहे; त्यामध्ये सुसूत्रपणा आहे. व्यवहार न सोडावा; पण विषयाकडे गुंतणारी आपली वृत्ती भगवंताच्या आड येते, म्हणून तिला भगवंताकडे गुंतवावे. भगवंताची खरी आवड उत्पन्न झाली पाहिजे. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ. परमार्थाला डोके शांत पाहिजे. एका गृहस्थाला सगळीकडे रामाची मूर्ति दिसू लागली. झाले ! त्याला वाटले की देव आपल्याला भेटला. पण हे काही खरे भगवंताचे दर्शन नव्हे. तो सर्व ठिकाणी आहे अशी भावना झाली पाहिजे. परमार्थाची काळजी करू नये; ती काळजीच प्रगतीच्या आड येते. वय वाढू लागले की आपले सर्व अवयव जसे प्रमाणात आपोआप वाढतात, तसेच परमार्थाला लागणाऱ्या गुणांचे आहे. आपण साधन करीत असताना, आपली प्रगती किती झाली हे सारखे पाहू नये. समजा, आपण आपल्या परसात एक झाड लावले, आणि ते किती वाढले हे पाहण्यासाठी रोज त्याच्या मुळ्या उपटून आपण जर पाहू लागलो, तर ते झाड वाढेल का ? अगदी तसेच परमार्थाच्या प्रगतीचे आहे. मनुष्याला परमार्थ किती साधला हे त्याच्या बोलण्यावरून आणि दृष्टीवरून ओळखता येते.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

आणि त्याकरिता नामस्मरणात राहणे हेच साधन आहे. कोणी बारा अन बारा चोवीस वर्षे साधनात राहूनही काही काम झाले नाही असे म्हणतात, आणि यात काही अर्थ नाही म्हणून सोडूनही देतात; तेव्हा अशा लोकांतच अर्थ नसतो, की गुरूत काही नसते ? तर आपले आपणच याला कारणीभूत असतो हे पक्के समजावे. संन्यास घ्यायचा असेल तर बायकोला बरोबर घेऊन संन्यास घेता येईल का ? त्या प्रमाणे , विषय बरोबर घेऊन गुरूकडे गेलो, तर गुरूची खरी भेट होईल का ? ती शक्य नाही. या करिता, ते(गुरु) सांगतील ते साधन आधी करावे म्हणजे चित्त शुद्ध होते, आणि ते झाल्यावर त्यांची खरी भेट होते. म्हणून आपण त्यांच्या जवळ खरे समाधान मागावे. आणि ते मिळाल्यावर आणखी काय मिळवायचे राहते ? मग तो ज्या स्थितीत ठेवील त्यातच समाधान होते. देहभोगाची अशा वेळी काहीच किंमत राहात नाही, आणि मग त्याला कंटाळण्याचे ही कारण उरत नाही. गुरुवर्या अजून किती लांब आहात ?


विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

तुष्यन्ति भोजनैर्विप्रार यूरा घनगर्जितैः । साधवः परसन्तापैः खलाः परविपत्तिभिः ॥सरलार्थ – भोजन वाढल्याने विप्र संतुष्ट होतात. आकाशात मेघगर्जना होऊ लागली म्हणजे मोर आनंदित होतात. साधुजन दुसऱ्याच्या सुखाने सुखी होतात आणि खल, दुर्जन दुसऱ्याच्या विपत्तीत आनंद मानतात. स्पष्टीकरण – या श्लोकाचा रोख आहे साधुजन आणि दुर्जन यांच्या स्वभावावर. दुसऱ्याचे भले झालेले, दुसऱ्याचा उत्कर्ष झालेला पाहून सत्प्रवृत्त लोकांना आपलेच भले झाले, या स्वरूपाचा आनंद होतो. आणि दुर्जनांना दुसऱ्याचे भले बघवतच नाही. ते दुसऱ्याच्या आपत्तीतच सुख मानतात. 'बरा पडला, बरा आपटला,' असे म्हणून ते टाळ्या पिटतील. म्हणूनच एका सुभाषित चरणात म्हटले आहे– 'परदुःखेन दुःखिता विरलाः ।' दुसऱ्याच्या दुःखाने स्वतः दुःखीकष्टी होणारे लोक फार विरळा असतात.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, २७ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 27 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-30 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# धावत्या एसटीचे चाक निखळले; प्रवाशी बचावले

## चालकाचे प्रसंगावधान : रिसोड आगाराचा भंगार कारभार चव्हाट्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम : रिसोड आगाराची एम-एच-४०-वाय- ५६ १३ या क्रमांकाची एसटी बस सकाळी ७:३० वाजता रिसोड वरून लोणी, लोणार मार्गे संभाजीनगर साठी निघाली होती. सदर बस जेमतेम वीस किलोमीटर अंतर पार करून लोणी बु. गावाजवळ पोहोचली असता, अचानक धावत्या बसचे समोरील उजव्या बाजूचे चाक निखळले. चालक संतोष खडसे यांनी वेळीच सतर्क होऊन प्रसंगावधानाने एसटी बसचा वेग काबू करून बस सुरक्षित ठिकाणी उभी केली. परिणामी पुढील अप्रिय घटना टळून, बसमधील ४० प्रवासी सुखरूप बचावले.**

रिसोड आगाराची शिवशाही बस सकाळी संभाजीनगर कडे निघाली असता, तालुक्यातील तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाणाऱ्या लोणी बुद्रुक गावाजवळ ही घटना घडली. अचानक एक्सल तुटल्याने बसच्या समोरील बाजूचे चाक निसटून रस्त्यालगतच्या शेतात जाऊन पडले. परंतु सदर घटना घडण्याआधी किंचीत अंतरावर चालक संतोष खडसे व वाहक देवकर यांना काहीतरी जळत असल्याचा जळकट असा वास आल्याने सतर्क होत प्रसंगावधान दाखवत, चालक खडसे यांनी धावत्या बसचा वेग नियंत्रित करून बस सुरक्षित उभी केली. अन्यथा अपाततग्रस्त बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात पलटी मारून, जवळच उभा असलेल्या विद्युत खांबावर आदळली असती. चालकाच्या सतर्कतेमुळे खूप मोठा अपघात टळला असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे. सुखरूप बचावलेल्या प्रवाशांनी सुद्धा वाहक देवकर व चालक संतोष खडसे यांच्या प्रति समाधान व्यक्त करत धन्यवाद दिले आहेत.



मी रिसोड इथून जालना येथे जाण्यासाठी सदर बसणे प्रवास करत होतो. लोणी गावाच्या जवळपास बस असताना अचानक समोरील टायर तुटून लांब जाऊन पडला. परंतु चालकाच्या सतर्कतेमुळे आमचे प्राण वाचले..! बसमधील खिळखिळी झालेली आसन व्यवस्था व आपातकालीन प्रथमोपचार करावयाची पेटी बसमध्ये नसल्यामुळे रिसोड आगाराचा भोंगळ कारभार प्रवाशांच्या जीवाशी खेळत असल्याचे प्रकर्षाने जाणवले..!

**सीताराम किसन सावसुंदर, ( रा. रत्नापूर, प्रवाशी )**

रिसोड आगार व्यवस्थापक दराडे यांच्याशी माध्यमांच्या प्रतिनिधीने सदर घटनेबाबत भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता कालच एम.एच.०९एम २११९ क्रमांकाची बस अकोला येथील विभागीय वर्कशॉपमधून दुरुस्त करून आणली आहे. तर आज पुन्हा ही दुर्घटना घडली. विभाग नियंत्रकांनी दोन साध्या बस इतर आगाराला दिल्यामुळे आम्हाला शिवशाही बस वापराव्या लागत आहेत..! असे तथ्यहीन कारण पुढे करून, सदर घटनेची माहिती वरिष्ठांना कळविण्यात येईल असे बोलून आगार व्यवस्थापक यांनी जबाबदारी झटकली. यापूर्वी सुद्धा रिसोड आगाराच्या शिवशाही बसणे सुलतानपूर नजिक पेट घेतला होता. पण प्रवाशांच्या समय सूचकतेमुळे तेव्हाही खूप मोठा अनर्थ टळला. यावरून रिसोड आगाराचा भंगार कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असल्याचे प्रवासी बोलत आहेत.



# खरिपासाठी पाण्याच्या दोन आवर्तनांचे नियोजन करा : समितीची शिफारस

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाची स्थिती पाहता विभागातील नांदूर मधमेश्वर जलद कालवा प्रकल्पामधून सध्या उपलब्ध पाणीसाठ्यातून खरिप हंगामासाठी दोन आवर्तने देण्याचे नियोजन करावे. तसेच जायकवाडी प्रकल्पातूनही आवर्तन देण्यात यावे, अशी शिफारस आज कालवा सल्लागार समितीने केली. पावसाच्या उर्वरित कालावधीत पडणाऱ्या पावसाचे प्रमाण पाहून पुढील आवर्तनांचा निर्णय घ्यावा, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली आज कालवा सल्लागार समितीची बैठक खरीप हंगाम 2023 साठी पार पडली. बैठकीत पालकमंत्र्यांनी निर्देश दिले की, पुरेशा पावसाअभावी खरीपाचा हंगाम अडचणीत आला असतांना पीक वाचवण्यासाठी त्वरीत पाणी सोडून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या सिंचन भवनातील सर विश्वेश्वरैय्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस आ. राजेश टोपे, आ. प्रशांत बंब तसेच मुख्य अभियंता जयंत गवळी, अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे, अधीक्षक अभियंता महेंद्र आमळे, कार्यकारी अभियंता म.सु. जोशी, कार्यकारी अभियंता जालना सु.भि. कोरडे, कार्यकारी अभियंता जायकवाडी प्रकल्प बीड श्रीमती रुपाली ठोंबरे, अपर जिल्हाधिकारी बीड डॉ.त्रिगुण कुलकर्णी तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. मराठवाडा विभागातील जायकवाडी व नांदूर मधमेश्वर जलद कालवा प्रकल्प या दोन प्रकल्पांतून पाटबंधारे विभागामार्फत कालव्यांद्वारे होणाऱ्या सिंचनाची माहिती देण्यात आली.



**दोन आवर्तने देण्याचे नियोजन करा :** अद्याप पावसाळ्याचा दीड महिना कालावधी शिल्लक आहे. पावसाने ओढ दिल्याने खरिपाचे पिके धोक्यात आली आहेत. ती हातातून जाऊ नये म्हणून नांदूर मधमेश्वर जलद कालवा प्रकल्पातून दोन आवर्तने देण्याचे नियोजन करावे. पहिले आवर्तन तातडीने द्यावे व पावसाची स्थिती पाहून पुढील आवर्तनाचे नियोजन करावे, असेही पालकमंत्री भुमरे यांनी सांगितले. तसेच जायकवाडी प्रकल्पातुनही आवश्यकतेनुसार पाणी सोडण्याचे नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

**दि.1 सप्टेंबरपासून पाण्याची आवर्तने देण्याचे नियोजन करा :** आतापर्यंत झालेल्या पावसामुळे पुरेसा पाणीसाठी उपलब्ध असतांना खरिपाच्या पिकांसाठी पाण्याची आवर्तने देण्यात यावी, अशी भूमिका पालकमंत्री भुमरे, आ. बंब व आ. टोपे यांनी मांडली. त्यासाठी दि.1 सप्टेंबर पासून नियोजन करावे. शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचले पाहिजे, यापद्धतीने आवर्तन असावे. खरीपाची पिके तरी हातात आली पाहिजे; यादृष्टीने पाटबंधारे विभागाने नियोजन करावे, अशी सुचना त्यांनी मांडली.

**पाटचाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी सर्व्हेक्षण करा :** पाटबंधारे विभागामार्फत ज्या पाटचाऱ्या, वितरिका, कालव्यांमधून पाणी सोडले जाते त्यांचे सर्व्हेक्षण करावे. हे सर्व्हेक्षण पाणीवापर संस्थांच्या सोबत प्रत्यक्ष पाहणी करुन करावे. त्यानंतर दुरुस्तीकामांचे अंदाजपत्रक तयार करुन निधी मागणीचा प्रस्ताव द्यावा, असे निर्देशही पालकमंत्री भुमरे यांनी दिले. जिल्ह्यासाठीचे पाणी वितरणाचे नियोजन हे स्थानिक पातळीवर व्हावे, अशी सुचना आ. बंब यांनी मांडली तर आ. टोपे यांनी पाण्याच्या अनिर्बंध वापरावर नियंत्रण असावे, अशी सुचना मांडली.

# 'त्या' पाँईटला शिवशक्तीच्या नावाने ओळखले जाईल

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : महिला शास्त्रज्ञांचेही केले विशेष कौतुक

**नवी दिल्ली :** स्पेस मिशनच्या टच डाऊन पाँईंटला एक नाव देण्याची वैज्ञानिक परंपरा आहे. चंद्राच्या ज्या भागावर आपले चांद्रयान उतरले आहे, भारताने त्या जागेच्या नामकरणाचा निर्णय घेतला आहे. ज्या जागेवर चांद्रयान ३ चे मून लँडर उतरले आहे, त्या पाँईटला शिवशक्तीच्या नावाने ओळखले जाईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

चांद्रयान ३ मोहिमेत सहभागी झालेल्या महिला शास्त्रज्ञांची भेट घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. यावेळी त्यांनी नारीशक्तीचा उल्लेख करत शास्त्रज्ञांनी केलेल्या असामान्य कामगिरीचा सन्मान केला.

चांद्रयान ३ मोहिमेअंतर्गत २३ ऑगस्ट रोजी यानाचे चंद्रावर लँडिंग झाले. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिक्स परिषदेसाठी दक्षिण अफ्रिकेला गेले होते. त्यांनी तेथूनच हा उपक्रम दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून पाहिला. त्यामुळे भारतात येताच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इस्रोच्या वैज्ञानिकांची बंगळुरूत येऊन भेट घेतली. तसंच, त्यांना संबोधितही केले. यावेळी त्यांनी इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांना मिठी मारली. तर, महिला वैज्ञानिकांचंही विशेष कौतुक केले. उपस्थित वैज्ञानिकांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ज्या मनाने आपण कर्तव्य कर्म करतो, विचार आणि विज्ञानाला गती देतो आणि जे सर्वांमध्ये उपस्थित आहे, ते मन शुभ आणि कल्याणकारी संकल्पाशी जोडलेले राहावे. मनाच्या या शुभ संकल्पांशी जोडले राहण्यासाठी शक्तीचा आशिर्वाद अनिवार्य आहे. ही शक्ती आपली नारी शक्ती आहे.

# वाटचाल 'नवीन लातूर पॅटर्न' घडविण्याकडे !

## संवाद ज्ञानस्तंभाशी

**लातूर म्हटलं की, सर्वात आधी डोळ्यासमोर येतो तो म्हणजे 'नवीन लातूर पॅटर्न' ! मागील अनेक दशकांपासून देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात लातूरचे अनन्यसाधारण महत्व आहे, तेही वृद्धिंगत होणारे. लातूर येथील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि असे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्थाही नावाजलेल्या आहेत. मात्र, आजमितीला बदलत्या काळानुसार लातूर पॅटर्नमधील शिक्षणाचा दर्जा केवळ उंचविण्यासाठीच नव्हे तर यापुढे एक पाऊल टाकत शिक्षण क्षेत्रातही नाविन्यपूर्ण बदल घडविण्याची, त्यात अपडेशन आणण्याची गरज आज निर्माण झाली आहे. तर यासाठी नावीन्यपूर्ण संकल्पना काय आहेत? होणाऱ्या बदलाचे महत्व काय? या बदलांचे लातूर पॅटर्न आणि पर्यायाने लातूरला शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांवर कसा प्रभाव पडेल? यासंदर्भात 'लातूर पॅटर्न'चे ज्ञानस्तंभ प्रा. चिराग सेनमा' यांच्याशी साधलेला संवाद.....**



चिराग सेनमा

**राजधानी दिल्ली येथे एका पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित होतो. शैक्षणिक क्षेत्रात माझ्या परीने जे शक्य आहे ते करायचा प्रयत्न करत असल्याने माझेही नाव पुरस्कार्थीमध्ये होते. जेंव्हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर गेलो तेंव्हा, मी लातूर वरून आल्याचे मान्यवरांना सांगितले. लातूरवरून आलोय म्हणताचं, ते मान्यवर म्हणाले 'लातूर...लातूर पॅटर्न...' मी ओळखतो, शैक्षणिक लातूरचे सर्वत्र खूप नाव आहे' असे ते म्हणाले. ते असे म्हणताच अभिमान वाटला आणि लातूर पॅटर्नमुळे माझी वेगळी ओळख निर्माण झाल्याचा मनोमन आनंद तर होताच! लातूर येथे मागील अनेक दशकांपासून शिक्षणात क्रांती घडतेय. लातूर शहरातील राजर्षी शाहू महाविद्यालयात, दयानंद महाविद्यालयात, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात तर केशवराज विद्यालय, देशीकेंद्र विद्यालय, राजस्थानी मारवाडी विद्यालय याशिवाय वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणासाठी अनिवार्य असलेल्या NEET, JEE, MHT-CET या प्रवेश पूर्व परीक्षांसाठी मार्गदर्शन करणाऱ्या खासगी कोचिंग क्लासेस आहेत. या प्रसिद्ध महाविद्यालये, विद्यालये आणि कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक संस्कार रुजविले जात असल्यामुळे लातूरच्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि अलौकीक प्रतिभा निर्माण होते. 10 वी, 12 वी त्याचबरोबर NEET, JEE, MHT-CET चा निकाल जाहीर झाल्याबरोबर देशभरात एकच चर्चा असते म्हणजे लातूरचा निकाल काय आहे'? लातूर पॅटर्नचा किती मोठा लौकिक देशात आहेत हे समजते. 10 वी, 12 वी मध्ये 100 पैकी 100 टक्के मिळविणारे सर्वाधिक विद्यार्थी हे लातूरचे असतात, हीच गुणवत्ता NEET, JEE, MHT-CET निकालाची असते. एकट्या लातूरमधून हजारो विद्यार्थी हे एम्स मेडिकल कॉलेज, IIT इन्स्टिट्यूट आणि नामांकित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशित होत आहेत हे विशेष. मात्र, राजस्थान येथील कोटा पॅटर्नला आजही सर्वोत्तम शैक्षणिक पॅटर्न म्हणून ओळख आहे. जर लातूर पॅटर्नला देशातील सर्वोत्तम शैक्षणिक पॅटर्न म्हणून उदयास यायचे असेल तर पारंपरिक पद्धतीतीला सोबत घेत आता नवीन कालानुरूप बदल घडवत 'नवीन लातूर पॅटर्न' घडविण्याकडे वाटचाल करणे आवश्यक आहे... (क्रमशः)**

**भाग-१**




# विवेकाची पेरणी



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**काही माणसे जात्याच हेकेखोर असतात अशा मंडळींना वगळून जाणत्या लोकांनी समाजप्रबोधन चालूच ठेवले पाहिजे. ऐहिकदृष्ट्या हे त्यांचे काही कर्तव्य नव्हे, परंतु जाणत्याने शांत बसणे समाजाला एकप्रकारे अधोगामी नेणेच ठरते. कारण समाजात चालत आलेल्या परंपरागत धारणा बदलून त्याजागी नव्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणे आणि समाजाला सन्मार्गाला लावणे बुद्धिवंतांच्या विवेकीपणाचे लक्षण होय. समाजातील बदल हा नेहमीच बौध्दिक्याने घडून येतो असे नव्हे तर समूह मनाला केलेल्या आवाहनातूनही बदल घडत असतात. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचे प्रयोग या दृष्टीने आपणास पाहता येतील.**



## क्षितिजापल्याड

बहुतांश समाजसुधारक किंवा बुद्धिवादी विवेकाचा अर्थ प्रखर बुद्धिवाद असा काढतात, परंतु जे जाणून घ्यायचे आहे आणि ज्यांना जाणून घेण्यास प्रवृत्त करायचे आहे ते कधी कधी आपल्या बुद्धीच्या पलीकडचे असते. त्यास आपण अव्याकृत प्रश्न म्हणून सोडून देऊन चालेलही. पण प्रश्न सोडून देण्याने आपल्यापुरते ते प्रकरण संपले तरी मन नेहमी तिकडेच धाव घेते. शेवटी विवेक म्हणजे काय तर चांगले अथवा वाईट याची स्पष्ट ओळख. समाजधारणेस कोणत्या बाबी चांगल्या हे सामूहिकपणे ठरवत असताना व्यक्तिगत मान्यतेला कितपत किंमत द्यायची हे समाजाने ठरवले पाहिजे. कारण समाजातील व्यक्तींची मूल्यात्मक नीतीचा स्तर कसा आहे यावरून ते ठरत असते. कारण बऱ्यावाईट कर्माची पारख केवळ बुद्धीलाच नव्हे तर इंद्रियाला देखील होते. आणि हे तेव्हाच घडून येते जेव्हा आपला मूल्यस्तर उंचावलेला असतो. म्हणून माऊली ज्ञानेश्वरीत म्हणतात, तेवीं दोषादोषविवेकी | इंद्रियेंचि होती पारखी | नियमु वारे पायिकीं | वोळगे तैं || भारतीय तत्त्वज्ञानात जे तीन प्रकारचे गुण सांगितले आहेत त्यातील सत्त्वगुणाची वाढ केल्यास माणसातील विवेकीवृत्ती वाढीस लागू शकते. केवळ पुराणातील वांगी पुराणात अशा हेतूने किंवा वृत्तीने आपलेच नुकसान होणार. आधुनिक भारतातील खऱ्या अर्थाने विवेकवादी माणूस म्हणून आपण महात्मा गांधी यांच्याकडे पाहू शकतो. कारण निरहंकार, निर्वैर आणि निरपेक्षता या अंगाने गांधीजी आपण समजून घेतल्यास या गोष्टीचा प्रत्यय येईल. स्वतः ईश्वरवादी असूनही कधी निरीश्वरवाद्यांचा त्यांनी द्वेष केला हे ऐकिवात नाही. कारण त्यांच्याकडे केवळ वैराग्यच नव्हे तर त्यासोबतच विवेक देखील होता. समर्थ रामदासांचे या संदर्भात सुंदर विवेचन आहे. समर्थ म्हणतात, विवेके अंतरी सुटला, वैराग्ये प्रपंच तुटला, अंतर्बाह्य मोकळा जाला, निःसंग योगी. असे हे समाजब्रह्माशी एकरूप होणे यास विवेक म्हणतात. आजच्या परिस्थितीत आपण जो विवेकाचा अर्थ काढतो तो म्हणजे निरीश्वरवादी पद्धतीने काढतो. व्यक्तिगत मत म्हणजे आस्था.

आपली आस्था आणि समूह आस्था यात भिन्नता निर्माण झाली की कलह वाढतो. समाजाला कलहाच्या खाईत ढकलायचे की त्यात बदल घडवून आणायचा हे स्पष्ट झाल्याशिवाय समाजात बदल होणे शक्य नाही. समर्थ रामदासांनी राजकारणाला अध्यात्माची जोड देऊन जी एक नवचेतना निर्माण करण्याचा प्रयत्न केला तो विलक्षण प्रयोग होता. अगदी तसाच प्रयोग आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधी यांनी केला. परिवर्तनाच्या चळवळीत विवेकवादाने लढा देत असताना वरील दोन्ही विभूती अत्यंत त्याज्य ठरविले जातात, हे दुर्दैव आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात आपल्यासमोर कोणतेही सामुहिक ध्येय नाही, अशी एक कुणकुण नेहमी ऐकायला मिळते.

खरेतर विवेकसंपन्न समाजाची निर्मिती हे आपले सामुहिक ध्येय असायला हवे. यासाठी आपण कोणत्या मार्गाचा अवलंब करू त्यावर चर्चा झाली पाहिजे. संपूर्ण समाजाला कवेत घेण्याची शक्ती ज्या साधनात असेल ते साधन स्वीकारून मार्गक्रमण केल्यास अल्पावधीतच आपण उन्नत होऊ, यात शंका नाही. आपण राजकारणाशिवाय पुढे जाऊ शकत नाही हे सत्य असेल आणि विवेक आपले लक्ष्य असेल तर विवेकवादी राजकारण पुढे नेत असताना राजकारणात अध्यात्म आणले असता आपली काही हानी होत नसल्यास काय हरकत आहे. ज्या प्रचंड इंग्रजी सत्तेशी दोन हात करताना महात्मा गांधींनी अध्यात्माची सांगड घालून एक नवी वाट आपणास दाखवून दिली. केवळ निर्देश करून न थांबता त्यात आपण यशस्वी होऊ शकतो, हे सिद्ध केले. त्या वाटेने आपले जाणे श्रेयस्कर ठरणार नाही का? गांधीजी अजूनही शिल्लक असण्याचे कारण आपल्यात अध्यात्म शिल्लक आहे. तोच धागा पकडून त्यास तुम्ही विवेक म्हणा, अध्यात्म म्हणा किंवा काहीही संबोधन वापरा, त्याचा विकास झाल्याखेरीज समूहचेतना जागविता येणार नाही, हे नक्की.

आमच्या विवेकवादाच्या धारणेत एक उणीव अशी की आम्ही फक्त बुद्धीला आवाहन करतो, परंतु कोणत्याही काळात बहुसंख्य समाज हा बुद्धिपेक्षा मनाच्या जवळ असतो. ज्याचा शोध अजून लागलेला नाही, विज्ञानाने ते सिद्ध करता येत नाही अशी वस्तू गृहीत धरायची कशी? हा आपल्यासमोरील मोठा प्रश्न असतो. परंतु हे गृहीत धरल्याशिवाय आपणास पुढे जाता येत नसेल आणि आपण किती बुद्धिवादी आहोत यापेक्षा समाज बदल घडून यावा असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर समूह मनाला आवाहन केल्याखेरीज आपल्यासमोर दुसरा पर्याय काय? आपण कदाचित नियमाकडे अंगुलीनिर्देश करू. नियमाने बुद्धीवर अंकूश ठेवून कृतिकार्यक्रम राबविता येतील, पण मनाने आपण नामानिराळेच असू हेही लक्षात घेतले पाहिजे. आज ज्या गतीने ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित झाले आहे, ते पाहता केवळ बौधिक्य वाढले म्हणून आपल्यातील चांगुलपणा का वाढत नाही हा कळीचा प्रश्न आहे. त्यासाठी केवळ बुद्धीवर अवलंबून न राहता मनामनात विवेकाची, अध्यात्माची पेरणी केल्यास चांगुलपणाची फळे समाजवृक्षाला लगडतील. संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, म्हणोनि विवेके, काही करणें ते निके, तुका म्हणें ते फिके, रुचि नेदी मिष्टान्न. जे काही करायचे ते चांगले करायचे. कारण आपण जे काही करू ते केवळ सुटेपणाचे लक्षण नसते तर त्याचा प्रभाव समाजावर होतच असतो. समाज, राष्ट्र आणि एकूण मानवता लक्षात घेऊन विवेकपूर्ण कृतीच आपणास पुढे जाण्यास मदत करेल.

# भक्त



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**भक्ति न लगे । भाव ना लगे ।देव न लगे आम्हासी । आम्ही पोटाचे पाईक ।, खरंच रामदास स्वामींनी किती पोट तिडकीने सांगितले आहे की जो फक्त पोटाच्या मागे लागतो, दोन वितीच्या पोटासाठी दिवस रात्र धाव धाव करतो, देहाकडे दुर्लक्ष करतो, भक्ती करत नाही, त्याला दोन वेळचे अन्न मिळालं की त्याला वाटते आपलं जीवन सफल झालं. जणू फक्त खाण्यासाठीच माणूस जन्माला आलेला असतो. म्हणून त्याला भक्तीचे महत्त्व कळत नाही. खरंतर भक्ती केल्यानंतर मिळणाऱ्या देवाच्या रूपाने आपल्याला कामधेनू मिळत असते, पण पोटाच्या नादी लागून जणू आपण अंगणात गाढवी बांधून ठेवतो आणि कामधेनुकडे दुर्लक्ष करतो. जगद्गुरु तुकाराम महाराजांसारखे परखड संत तर कोणी शोधून सापडणार नाही. ते म्हणतात जो हरीची भक्ती थोडकी करतो आणि विषयाच्या ठिकाणी फार गोडी धरतो म्हणजे सुखाच्या ठिकाणी जो जास्त गोडी धरतो.**

त्याला मनुष्य न म्हणता त्याला गाढवच समजावे आणि त्याला गरगर फिरवून ,गचांड्या मारून वैष्णवातून बाहेर घालवावे. इतके परखड मत त्यांनी आपल्या अभंगातूनच मांडले आहे. ते म्हणतात, तुका म्हणे त्याला भोवंडून बाहेर घाला

मग कोणी म्हणेल भक्ती भक्ती म्हणजे नेमके करायचे तरी काय....?आम्ही रोज पूजा करतो,देवाची आरती करतो.षटी सहामासी कधीतरी मंदिरात पण जातो हो.... खरच म्हणजे देवाच्या डोक्यावर उपकारच नाही का आपले.....? की आपण मंदिरात जातो. याला आपण भक्त म्हणायचं का.....? या गोष्टीला आपण भक्ती म्हणायचे का..... बिलकुलच नाही ....यासाठी तुकाराम महाराज भक्ताची लक्षणेच सांगून टाकतात. ती लक्षणे बघून आपणच आपले ठरवूया की आपण भक्त आहोत का आणि खरंच आपल्या मनामध्ये भक्ती आहे का...? तुकाराम महाराज म्हणतात भक्त ऐसे जाणा जे देही उदास । गेले आशापाश निवारुनी ॥१॥

विषय तो त्यांचा झाला नारायणा । नावडे जन धन माता पिता ॥२॥

निर्वाणी गोविंद असें मागें पुढे । काहीच साकडे पडो नेदी ॥३॥ तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य । घातलीया भय नरका जाणे ॥४॥

महाराज अभंगात म्हणतात भक्त कसा ओळखावा....? जो देही उदास असतो..... देही उदास म्हणजे कसा? कृश का....? बारीक, ज्याच्या अंगात काही जीव राहिलेला नाहीये ....असा उदास का ....?साधारणताः जनमानसात अशीच एक धारणा असते जो तब्येतीने बेजार, पैशाने बेजार ....तो आपला देव देव करतो... जो रिकामा आहे तो देव देव करतो ... पहिले म्हणजे देव देव करणे म्हणजे भक्ती नव्हे आणि दुसरे म्हणजे परिस्थितीने बेजार म्हणून देव देव करतो ही धारणा अत्यंत चुकीची.

उलट जो भक्ती करत नाही तो जगण्यास लायक नसतो.

मग उदास म्हणजे काय....? तर उदास म्हणजे तो आपल्या देहाचा विचार करत नाही ....तर आपला देह चांगला कशाने टिकवता येईल की ज्यायोगे त्याला आयुष्यभर देवाची भक्ती करता येईल ....याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री समर्थ रामदास स्वामी. त्यांनी देहाला मंदिर मानले. देहात देव वसतो असे मानले आणि देहाची नित्य काळजी घेतली. सुदृढ शरीर हा त्यांनी दागिना मानला. कारण त्यांचे म्हणणे की जर आपल्या अंतःकरणात देव असेल तर तो आपण किती उत्तम स्थितीत ठेवायला पाहिजे. आपण बघतो देवळामध्ये किती स्वच्छता असते ,प्रसन्नता असते मग जर आपले शरीरच हे एक मंदिर आहे, अंतःकरणात देव आहे तर मग आपली प्रकृती कशी हवी....? आपले मन कसे हवे...? आपला पूर्ण देहच असा हवा की आतल्या देवाला प्रसन्न वाटेल. हेच तुकाराम महाराज म्हणतात की, भक्त देहाबद्दल उदास आहे. म्हणजे तो देहाला लागणाऱ्या सुखांपासून अलिप्त आहे. तो देहाची नक्की काळजी घेतो पण सुखापासून लांब राहतो. आपल्या पंचेंद्रियांसाठी आपल्यापुढे सुखाची व्याख्या काय असते हो .....?चविष्ट जेवण ,उत्तम उत्तम कपडे ,उत्तमातले उत्तम अत्तर ,कानासाठी म्हणजे श्रवणासाठी गझल ऐकतो, शास्त्रीय संगीत ऐकतो .डोळ्याच्या सुखासाठी चांगले चित्रपट पाहायला जातो. त्वचेच्या सुखासाठी उत्तम उत्तम प्रसाधन वापरतो. पण एखाद्या भक्ताचे लक्षण बघायचे असतील तर तो या पाचही इंद्रियांना फक्त देवाच्या प्रती ठेवतो. म्हणजे त्याचा विषयच नारायण होतो. डोळ्याने तो फक्त विठ्ठलाचे रूप बघतो. भजनाने श्रवण तृप्त करतो. गोपीचंदनाने घाणेंद्रिय परिपक्व करतो. त्वचेला विठ्ठलाच्या पायाचा स्पर्श घेतो. असा तो भक्त असतो. त्याला विठ्ठला व्यतिरिक्त कशाचीच आवड नसते. बर अशा भक्ताला देव पण कधी एकटं सोडत नाही. त्याच्यावर कुठलेही संकट येऊ देत नाही. तो करत असलेल्या चांगल्या कामांमध्ये जर कोणी काही विघ्न आणले तर त्या माणसाला भगवंत नरकात पाठवतो. परंतु आपल्या भक्ताला मात्र काहीही होऊ देत नाही. असा तो भक्त असतो. ज्ञानेश्वर माऊली तर भक्ती योगा मधे भक्ताचे अशी काही लक्षणे सांगतात की वाचताना दिङ्मूढ होऊन जातो आपण.

भगवंत अर्जुनाला भक्ताची लक्षणे सांगतात ती लक्षणे माऊली अमृताच्या भाषेत लिहिताना म्हणतात जो मातेचीया ये उदरा । तो मातेचा सोयरा ।केतलू पा ॥८३॥ज्ञा.गा.अ१२

भगवंत म्हणतात की भक्ताला मी माझे मुलच मानलेले आहे. माझे लेकरू असते ते. मग एकदा माझं लेकरू म्हणून माझ्या भक्तांनी जन्म घेतला की ते माझे किती आवडते होत असेल याचा विचार तूच कर. भक्त तोच असतो जो आपली चित्तवृत्ती मला समर्पित करतो. स्वतःला माझा छंद जळवून घेतो. मला हृदयस्थ करून घेतो. माझ्याच स्वरूपामध्ये सामावून जातो. मग सरुपता आपोआपच येते. तुकाराम महाराज म्हणतात भक्ताविण देवा । कैचे रूप घडे सेवा॥ म्हणजे भक्ता खेरीज देवाला पण साकारत्व येत नाही. एखाद्या सोन्याच्या अंगठीच्या कोंदणात हिरा असावा तसे देव आणि भक्त परस्परांच्या योगा योगाने शोभिवंत असतात.

आणि हे भगवंताला पण अगदी मनापासून मान्य असते. कारण भगवंत म्हणतात *तो पहावा हे डोहळे। म्हणोनी अचक्षूसी मज डोळे। .... आहाहा...!!!किती सुंदर आहे हे बघा.... देव म्हणतो की भक्ताला बघण्यासाठी मला डोळे यावे. अगदी साधं बघा माहेरवाशीण घरी यायची असेल तर घरामध्ये अगदी उत्सव येतो. आई डोळ्यात तेल घालून सगळी तयारी करते. तिच्या उत्साहाला इतके उधाण आलेले असते की तिला दोन हात नाही तर चार हात आहेत की काय असे वाटायला लागते. अगदी तसेच भगवंत म्हणतात की भक्ताच्या दर्शनासाठी मला डोळे यावे. तो हातात कमळ घेतो ते भक्तांसाठी आणि त्या भक्ताला आलिंगन देण्यासाठी दोन हात पुरणार नाहीत की काय म्हणून म्हणतो मला चार हात असतात. भगवंत पुढे म्हणतात भक्ताची संगत मिळावी, ते सुख मला मिळावे म्हणून माझे निर्गुण रूप टाकून मी शरीर धारण करतो. म्हणजे सगुण रूप धारण करतो. इतका मला तो आवडतो. त्याच्या माझ्यात मैत्र असते. ते मला प्राणापलीकडे प्रिय असते.

भगवंत म्हणतात तयाचे आम्हा व्यसन म्हणजे भगवंताला भक्तांचे व्यसन असते. आता तुम्ही विचार करा व्यसन लागणे म्हणजे त्या गोष्टीशिवाय माणूस जगू शकत नाही. मग भगवंताला जर भक्ताचे व्यसन असेल तर भक्ताने कसे असायला हवे....?

जसे तुकाराम महाराज म्हणतात विषय तो त्यांचा झाला नारायण म्हणजे दोन्हीकडून जेव्हा एवढी ओढ असते तेव्हाच भक्त आणि देव एकमेकांमध्ये सामावून जातात. पण त्याचबरोबर तुकाराम महाराज हेही म्हणतात, भक्ती तों कठीण शुळावरील पोळी ।निवडे तो बळी विरळा शूर ॥१॥ तु.गा. ९८५ म्हणजे भक्ती ही सुळावर ठेवलेल्या पोळी प्रमाणे असते. म्हणजे तुकाराम महाराजांना नक्की काय म्हणायचे बरे.. .?तर त्यांचं म्हणणं की दिखाव्याची भक्ती नसावी. ती भक्ती आतून असावी. असं बघा... आपण एखाद्या मोठ्या हॉटेलमध्ये जातो. असंख्य मसाले वापरून जी भाजी तयार झालेली असते. त्यानेही आपले कधीकधी समाधान होत नाही. पण आईच्या हातचं लसणाच तिखट आपल्याला तृप्त करून जातं. कारण का तर नुसते साहित्य वापरून पाकसिद्धी होत नसते. म्हणजे स्वयंपाक चांगला होत नसतो. तर तो मनःपूर्वक करावा लागतो. म्हणजे त्या स्वयंपाकास गोडी येते आणि मग त्याला, त्या पदार्थाला श्रेष्ठत्व मिळते. म्हणजे त्या पदार्थाचे कौतुक होते, तो पदार्थ तृप्ती देतो. हॉटेल मधला कारागीर हा पैशासाठी अन्न बनवत असतो आणि आई आपल्या लेकरासाठी, त्याला आवडते म्हणून बनवत असते. तेव्हा त्यात तिचा भाव उतरलेला असतो. तिने ते मनःपूर्वक बनवलेले असते आणि म्हणूनच ते चविष्ट बनलेले असते. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात भक्ती ही सुळावरची पोळी आहे त्याच्यात तुमचा भाव नसेल तर भगवंताला ही ती भक्ती कळते हो....!!! कस्तुरी मध्ये माती मिसळली तर ती कस्तुरीच होऊन जाते आणि कस्तुरी पण माती होऊन जाते. एखादी नदी समुद्रापर्यंत पोहोचल्यानंतर तिचे स्वरूप वेगळे राहत नाही ती समुद्रच होऊन जाते. तसेच शुद्ध भावाचे प्रयोजन आहे की तो भाव इतका शुद्ध हवा की त्या भावाच्या संयोगाने तुम्ही देवामध्ये सामावून जावे आणि भगवंत तुमच्या हृदयात. असे जो वागतो तो भक्त असतो. भक्त म्हणजे काय संतांनी असे विशद केलेले आहे. एकदा भगवंतांनी जेव्हा सांगितले आहे की भक्त माझे लाडके असतात मीच त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेला असतो. मग आपण कसे म्हणावे बरे ....?की माझा आवाज देवापर्यंत पोहोचत नाही. खूप वेळेला संकटांमध्ये असे वाटते की माझ्यासाठी का ....?मीच का....? देवाचे माझ्याकडे लक्ष नाही. आपण छोट्या छोट्या गोष्टींसाठी देवाला त्रास देतो. देवाला नवस करतो तो पण कसा .....? पाचशे रुपयेची पावती फाडतो आणि म्हणतो लेकीचे लग्न होऊ दे.... आपण किती हास्यास्पद वागतो नाही....? तरीदेखील देव आपल्याकडे बघत असतो. निर्मळ मनाचा भाव असेल तर आपली प्रार्थना देवापर्यंत नक्कीच पोहोचते. देवाचे सगळ्यांकडेच बारीक लक्ष असते. कबीरजी तर म्हणतात चिटी के पग मे बाजे घुंगरू तो भी साहब सुनता है॥ अहो इतकीशी ती मुंगी आणि तिच्या पायातले इतकेसे घुंगरू तरी त्याचा सुद्धा आवाज भगवंतला ऐकू जातो. मग आपण भक्तीभावाने केलेली प्रार्थना काय त्याच्यापर्यंत पोहोचणार नाही का....? आपल्या आयुष्यात जे काही चांगले घडत असते ती म्हणजे निव्वळ भगवंताचीच कृपा असते.फक्त आपल्याला त्याची जाण नसते. ही जाण करून घ्यायची म्हणजेच भक्ती करायची.... आणि खरा भक्त व्हायचे.बस इतकेच....!!!!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कार्यकर्त्यांनी घराघरापर्यंत पोहचण्यासाठी परिश्रम घ्यावे

## भाजपाच्या चिंतन बैठकीत हंसराज अहीर यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संघटन समृध्द मतदार संघ, कार्यकर्त्यांचे समर्पण व विजयाचे धेय हेच पक्षाच्या यशाचा मुलमंत्र असल्याने आगामी सर्व निवडणुकात भाजपाला निर्भेळ यश मिळवुन देण्यासाठी भाजपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संपुर्ण जिल्ह्यात चिकाटीने कामाला लागावे, घरोघरी भेटी द्याव्या, बूथ सक्षम करावे, केंद्र व राज्यसरकारच्या लोकहितैषी योजना, विकास योजना प्रत्येक घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी परिश्रम घ्यावे असे आवाहन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी भाजपाच्या चिंतन बैठकीस उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करतांना केले.

चंद्रपूर येथील वनराजिक महाविद्यालयाच्या सभागृहात दि. 25 ऑगस्ट 2023 रोजी पार पडलेल्या पक्षाच्या चिंतन बैठकीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या उद्घाटन समारोहास आ. रामदास आंबटकर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, यवतमाळ जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, माजी आ. संजय धोटे, माजी आ. अतुल देशकर, माजी आ. सुदर्शन निमकर, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, जेष्ठ नेते विजय राऊत, भाजपा महानगर अध्यक्ष राहुल पावडे, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोगळे, माजी महागनर जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, प्रदेश महामंत्री महिला आघाडी अल्काताई आत्राम, माजी जि.प. अध्यक्षा संध्याताई गुरनूले आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या संबोधनात हंसराज अहीर यांनी भाजपाच्या चैतन्यशील संघटनेला अनेकांचे अमुल्य योगदान लाभले आहे. त्यांच्या संघर्ष व परिश्रमामुळेच आज आपण संघटनात्मक दृष्ट्या सक्षम होत सत्तेच्या सोपानापर्यंत पोहचू शकलो त्यात स्व. ॲड. दादासाहेब देशकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, चंदनसिंह चंदेल, विजय राऊत यांच्यासारख्या अनेक कर्मयोगी राजकारण्यांचे फार मोठे योगदान व अभूतपूर्व असे कार्य असल्याने त्यांच्या या कार्यातून बोध घेत पक्षाला जिल्ह्यात व संपूर्ण लोकसभा क्षेत्रामध्ये संघटनात्मकदृष्ट्या उंचीवर नेण्यासाठी सर्वांनी परिश्रमाची पराकाष्ठा करावी असेही अहीर म्हणाले. पाच वर्षांपूर्वी पक्ष जिल्ह्यात वैभव संपन्न होती. भाजपाचे पाच आमदार सेनेचा एक आमदार जि.प. पासून तर पं.स. पर्यंत नगरपालीका, महानगरपालीका, ग्रामपंचायती, भाजपाच्या ताब्यात होत्या मात्र लोकसभेत पक्षाला अपयशाचा सामना करावा लागला हे दुर्दैव असले तरी हे अपयश कायम नाही या निर्धाराने आपणास पराभवाचा वचपा काढण्यासाठी पुन्हा नव्या जोमाने लोकांच्या पुढे जाऊन भाजपाच्या जिल्ह्यातील वैभवशाली वारश्याला भक्कम करावे लागणार असल्याने पक्षाने दिलेल्या संघटनात्मक कार्याची जबाबदारी उचलुन पक्षीय कार्यक्रम ज्यात घर चलो अभियान, सरल ॲप व मोदी सरकारच्या 9 वर्षांच्या राष्ट्र व समाजोध्दारक उपलब्धी प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रत्येकांनी परीश्रमपुर्वक कार्य करावे डॉ. शामा प्रसाद मुखर्जी, पं.दिनदयाल उपाध्याय, अटलजी यांच्या स्वप्नपुर्तीच्या दिशेने मा. मोदीजींच्या सरकारची वाटचाल सुरु आहे. त्यामुळे हे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर असल्याचे अहीर यांनी कार्यकर्त्यांना उपदेशून केलेल्या भाषणातून सांगीतले. या चिंतन बैठकीस चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील चिमुर ब्रम्हपूरीसह सहाही विधानसभा क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## अशैक्षणिक कामांमुळे गुणवत्ता ढासळली : बबन जंजाळ

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** जिल्हा परिषद शाळेतुन गोरगरीब,



कष्टकरी आणि वंचीत समाजातील मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. परंतु वर्षभर शिक्षकांकडून निवडणुक कार्यक्रम, मतदार नोंदणी, जनगणना, नवभारत साक्षरता कार्यक्रम, ऑनलाईन तसेच ऑफलाईन माहिती देणे, आधार कार्ड अपडेट करणे, शाळाबाह्य सर्वेक्षणे नियोजनासाठी सतत चालणाऱ्या बैठका यासारखी अशैक्षणिक कामे लादली जातात.त्यामुळे अध्यापणाकडे दुर्लक्ष होऊन गुणवत्ता ढासळत आहे. याविरुद्ध महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघासह अन्य संघटनाही आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे मत राजूर जिल्हा परिषद शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक बबन जंजाळ यांनी सांगितले. पुढे बोलताना जंजाळ म्हणाले की शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये शिक्षकांना निवडणूका,जनगणना यासारखे राष्ट्रीय कार्यक्रम वगळता इतर अशैक्षणिक कामे देऊ नये असे नमुद असताना देखील शालेय शिक्षण विभाग यावर गांभीर्याने विचार करत नाही.त्यामुळे दिवसेंदिवस जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी संख्येत मोठ्या प्रमाणात घट होत असल्याचे दिसून येत आहे. शैक्षणीक सर्वेक्षणाच्या नावाखाली शिक्षकांकडून वर्षभर अशैक्षणीक कामे करून घेतली जातात.राज्याच्या शालेय विभागाने नवभारत साक्षरता कार्यक्रमा अंतर्गत निरक्षकांची सर्वेक्षण कामाची जबाबदारी सोपवली आहे. यासारखी अनेक शाळाबाह्य कामे शिक्षकांना करावी लागतात. त्यामूळे अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. अशैक्षणिक कामे बंद करा अशी मागणी महाराष्ट्र राज्य जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाने केली आहे. एकीकडे शाळाबाह्य कामे दिली जातात तर दुसरीकडे शाळेची पटसंख्या घटली की शिक्षकांना जबाबदार धरले जाते. शिक्षण विभागाचा हा सावळागोंधळ असाच चालू राहिला तर जिल्हा परिषदेच्या शाळा कशा टिकणार व गुणवत्ता कशी वाढीस लागणार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अशैक्षणिक कामामुळे शेतमजुर, शेतकरी, कष्टकरी पाल्यांच्या मुलांचे शैक्षणीक नुकसान होत असून याविरुद्ध जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ आंदोलन करणार असल्याचे जंजाळ यांनी सांगितले.

## मृत अर्भकाची विल्हेवाट लावणाऱ्यावर कारवाई करा : अलका आत्राम

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** भद्रावती पोलीस स्टेशन येथे अल्काताई आत्राम यांचे नेतृत्वात भाजपा महिला मोर्च्याच्या वतीने भद्रावती शहरात मागील वर्ष भरात 3 अर्भके सापडली. परवा सुद्धा मृत नवजात अर्भक कुत्र्याने रस्त्यावर आणल. कुठे तरी ही नवजात अर्भक अनधिकृत खाली करणारी टोळी किंवा लोक तर हे करत नसतील कशा वरून कारण अर्भक ही कुठेही फेकल्या जात आहेत म्हणजेच अनधिकृत काही तरी काळेधदे मानवी कृतीला लाजवेल अशी विकृत लोक नवजात अर्भकांची हत्या करून फेकत असावीत. म्हणून या निवेदन द्वारे आपण शहरात जर अशी ठिकाण असतील तर आपण त्याचा शोध घेऊन नवजात अर्भक त्यांचा कुठलाही दोष नसताना या जगात येण्या आधीच कुणी तरी असल्या प्रकारे त्यांची हत्या करण्याचं काम करत आहेत असल्या लोकांवर लवकरात लवकर कळक कार्यवाही करावी अन्यथा अजून एक जीव जाणार नाही याची दक्षता घ्यावी नाही तर यापुढे निवेदन नाही तर मोठा आंदोलन भाजपा महिला मोर्च्याच्या वतीने इथे करण्यात येईल. यावेळी अल्का आत्राम प्रदेश महामंत्री, अर्चना जिवतोडे कोषध्यक्ष, प्रणिता शेंडे उपाध्यक्ष, लता भोयर उपाध्यक्ष, बंदना सिन्हा उ भा महिला अध्यक्ष, सुनंदा माणुसमारे सचिव, रक्षिता निरंजने, ममता राजभर, इंदू कुमारी, प्रभा राजभर, रूम राजभर, ख़ुशी दीदी, साधना दीदी आणि सर्व महिला कार्यकर्ते उपस्थित होते.





महाराष्ट्र Business Katta












# ब्रिक्स : नव्या जागतिक व्यवस्थेचा शोध



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**सध्या सारे जग नविन व्यवस्थेच्या शोधात धडपडत आहे. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग या शहरात 15 वी ब्रिक्स शिखर परिषद सपंन्न झाली. या परिषदेमध्ये ब्राझील, रशिया, भारत आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या नेत्यांनी भाग घेतला. 2009 साली स्थापन स्थालेल्या या परिषदेची ही 15वी शिखर बैठक होती. मध्यंतरी कोरोना महामारीमुळे 3 वर्ष परिषद झाली नव्हती, या परिषदेचे यजमानपद दक्षिण आफ्रिकेकडे होते. दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील मोरो फासा यांनी उत्तम व्यवस्था ठेऊन ही परिषद यशस्वी केली. परिषदेतील विचारमंथनाचे सार, हे सध्या जगाला नवीन अर्थिक व्यवस्था विकसित करण्याची गरज आहे, या मुद्यावर भर देणारे आहे. जगातील 5 दिग्गज राष्ट्रांनी 2009 या वर्षी ही संघटना स्थापन केली. हा जागतिक अर्थव्यवस्थेतील बड्या पाच राष्ट्रांचा एक समुह आहे.**

अमेरिका आणि युरोपला प्रतिशह देण्यासाठी ही संघटना आस्तित्वात आली तथापी आपण पश्चिमेच्या विरोधात नाही, असे ही संघटना सांगते. 2001 साली गोल्ड मॅन सॅक्स या कंपनीचे अर्थ शास्त्रज्ञ जिन ओनील यांनी जगातिल अर्थ व्यवस्थेवर एकत्रित अस्तित्व गाजविणाऱ्या वेगाने वाढणाऱ्या उभरत्या अर्थ व्यवस्थांचे वर्णन करण्यासाठी ब्रिक्स हा शब्द वापरला. त्याचा अर्थ जगाला पर्यायी व्यवस्था देणे असा होतो. आतापर्यंत 15 परीषदा झाल्या परंतु ही संघटना जगाला ठोसपणे पर्याय देऊ शकली नाही, हे कटू सत्य आहे.

**अशी ब्रिक्स ची ओळख :** या 5 राष्टांचे एकत्रित क्षेत्रफळ सुमारे 26.7 टक्के एवढे आहे आणि जागतिक लोकसंख्येच्या प्रमाणात या भागात 41.5 टक्के लोक राहतात तसेच या देशांचा एकत्रित जीडिपी मोठा असून या देशांना उदयमुख आर्थिक महासत्ता असे म्हणले जाते. त्यांचा एकूण जीडिपी 26 टक्के पैक्षा जास्त आहे म्हणजे जगातील हा फार मोठा दबाव गट आहे, ही गोष्ट मान्य करावी लागेल. परस्परांच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न करणे आणि सामुदायिक हितासाठी झटणे हा उद्देश समोर ठेऊन जीब्रॅड पोर्ट डमिल यांनी इतिहासाचा शोध घेऊन असे नमूद केले की, या देशांचा विकास वेग प्राचीन काळात सुद्धा लक्षणीय व अदभूत होता. 2005 पासून हे देश आर्थिक विकासाच्या क्षेत्रात नवी गरूड झेप घेत आहेत. त्यांच्यामध्ये पर्यायी आर्थिक व्यवस्था तयार करण्याची क्षमता आहे. या देशातील मनुष्यबळ आणि एकूण देशांतर्गत उत्पादन ही त्यांची क्षमता आहे. ब्रिक्स च्या जोहान्सबर्ग परिषदेत रशियाचे अध्यक्ष ब्लाजीमोर पुतीन हे अभासी मार्गाने उपस्थित होते. या परिषदेतील आर्थिक विकास विषयक तसेच राजकीय स्थैर्य शांतता व विकास या प्रश्नांवरील विचारमंथन अत्यंत उपयुक्त व दिशा दर्शक ठरले. पाचही राष्ट्र प्रमुखांनी जगापुढील ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी परस्पर सहकार्यावर भर दिला.

**भारताची ठोस भूमिका :** या परिषदेमध्ये पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी केलेले भाषण अत्यंत सुत्रबद्ध आणि भारताच्या प्रगतीचा आलेख स्पष्ट करणारे होते. त्यांनी कोरोना काळात भारताने केलेली जगाची सेवा, कृषी व उद्योग क्षेत्रात भारताची झेप, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता भारताने बाजवलेली भूमिका शिक्षण व आरोग्यातील नवी प्रगती तसेच चांद्रयान मोहीमेचे यश इत्यादी पैलूवर प्रकाश टाकला. व सैद्धव कुटुंब ही भारतीची भूमिका असून जागतिक शांतता व प्रगतिसाठी भारत वचन बद्ध आहे. या मुद्यावर त्यांनी विशेष भर दिला सर्व सदस्य राष्ट्रांनी भारताशी थेट रूपयांमध्ये व्यवहार करावा असे आव्हान ही त्यांनी केले. ब्रिक्स परिषदेच्या विस्ताराला सहमतीच्या आधारे भारताचा संपूर्ण पाठिंबा आहे असा पुर्नुरूचार त्यांनी केला. भारत हा अल्पित राष्ट्रांचा नेता असून अमेरिका, रशिया, आफ्रिका व युरोप या सर्वांशी समतोल भूमिकेत वागत असतो. असे असले तरी जगाच्या उपेक्षित अशा दक्षिण भागाचा विकास करण्यावर भारताचा भर आहे, हे त्यांनी नमूद केले. आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आफ्रिकन युनियनला ब्रिक्स परिषदेचे कायम सदस्य म्हणून निमंत्रित करण्याची योग्य सुचना केली आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :** ब्रिक्स परिषदेची ऐतिहासिक पार्श्वभूमी संपन्न व अर्थ पूर्ण आहे कारण या परिषदेची आजवरची वाटचाल पाहता भविष्य काळात तिची भूमिका निर्णायक ठरणार आहे. जेव्हा भारत या परिषदेचा सदस्य झाला तेंव्हा भारताचे त्यामध्ये नुकसान होईल असे भाकीत काही विदेशी समिक्षकाकडून केले जात होते परंतु पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाचे सूत्र लक्षात घेता असे दिसते की भारत या परिषदेत एक प्रभावी नेता म्हणून उदयास आला आहे आणि जगाच्या भावी आर्थिक व्यूरचेनेत भारताला महत्वाची भूमिका पार पाडवी लागणार आहे. या परिषदेला स्थापनेच्या वेळी गोल्ड मॅन सॅक्स या व्यवस्थापनेचे तत्कालीन अध्यक्ष जिम ओलीन यांनी ब्रिक्स या शब्दाची फोड करताना "बिल्डिंग बेटर ग्लोबल इकॉनॉमिक ब्रिक्स" असा विस्तार केला होता मुळचा हा शब्द रूका पुरूषोत्म या भारतीय व्यक्तीने तयार केल्याचे म्हटले जाते. ते या सस्थेमध्ये संशोधन सहाय्यक होते ब्रिक्स च्या स्थापनेचा हेतु लक्षात घेता असे दिसते की, गुंतवणुकीची क्षमता असलेल्या उभरत्या अर्थ व्यवस्थांच्या सहाय्याने जगाच्या अर्थ कारणाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या पार्श्वभूमीवर दक्षिण अफ्रिकेत जोहानबर्ग येथे झालेल्या शिखर परिषदेचे महत्त्व अधिक आहे. सुरूवातीला या बैठकीमध्ये ब्राझील, रशिया आणि चीन या चार देशाचे परराष्ट्र मंत्री सप्टेंबर 2006 मध्ये न्युयॉर्क येथे संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेच्या बैठकीच्या वेळी एकमेकाना भेटले. दि. 16 जून 2009 रोजी रशिमधील येकाते रिनबर्न शहरामध्ये पहिली परिपुर्ण राजनैतिक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे 16 जून हा ब्रिक्स चा स्थापना दिवस मानला जातो. या पहिल्या बैठकीस ब्राझीलचे लुईझ डिसील्वा रशियाचे दिमित्री मेदवेदेव भारताचे तेव्हाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि चीनचे हुजिनताओ, हे उपस्थित होते. शिखर परिषदेमध्ये म्हटल्याप्रमाणे या संघटनेचा उद्देश जागतिक, आर्थिक परिस्थिती सुधारणे आणि वित्तीय संस्थाची सुधारणा करणे हा होता. या चारही देशांनी भविष्यात विकासासाठी सक्रीय पणे सहकार्य करण्यावर भर दिला. विकसनशील देशापुढे भेडसावणाऱ्या कवीच्या प्रश्नावर या परिषदेत चर्चा झाली. जागतिक घडामोडी मध्ये सहभागी होतांना पायाभूत विकासावर भर देण्याचे एक मताने ठरले. रशियातील पहिल्या परिषदेनंतर ब्रिक्स देशांनी विकासासाठी जागतिक पातळीवर समान राखीव चलनाची गरज आहे, असे प्रतिपादन केले, ही गरज वैविध्य पूर्ण, स्थीर आणि भक्कम अंदाज करण्यायोग्य असावी, असा आग्रह धरला. या ठरावामध्ये अमेरिकेच्या डॉलर वर्चस्वावर थेट टिका केली नव्हती तथापी रोख मात्र अमेरिकेवर होता. तेव्हापासून आजपर्यंत ब्रिक्स संघटना डॉलच्या वर्चस्वाला आव्हान देऊन डी- डॉलराइजेशन या तत्त्वाचा पुरस्कार करत आहे. 2010 मध्ये दक्षिण आफ्रिकेने ब्रिक्स संघटनेत सामिल होण्याची विनंती केली व ऑगस्ट 2010 मध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली. 24 डिसेंबर 2010 या दिवशी दक्षिण आफ्रिका या संघटनेस जोडला गेली. त्यानंतर चीनने सदस्यत्त्वाची प्रक्रिया पूर्ण केली अशा प्रकारे ब्रिक या भक्कम विटेमध्ये एस हा शब्द जोडला गेला आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष जेकेल झुमा हे 2011 मध्ये चीनमधील सान्या शिखर परिषदेत आफ्रिकेला पूर्ण सदस्यत्व देण्यात आले.




**विस्ताराला हिरवा कंदिल :** ब्रिक्स संघटनेचा वाढता दबदबा पाहून आर्जेटिना, इराण, सौदी आरेबिया, संयुक्त अरब अमीरात, इच्छीओपीया या पाच देशांना या परिषदेत सदस्यत्व देण्यात आले. उरलेल्या राष्ट्रांना सहभागी भागीदार म्हणून घेण्यात आले असून त्यांच्या सदस्यत्त्वाचा विचार रशियामध्ये होणाऱ्या पुढील परिषदेत केला जाणार आहे. तसेच इतर अनेक आशियाई, युरोप प आफ्रिका खंडातील देश ब्रिक्सचे सदस्य होण्यास उत्सुक आहेत. त्यांच्या यादीमध्ये सतत भर पडत आहे. 20 पैक्षा अधिक देशांनी आपणास सदस्यत्व मिळावे अशी मागणी केली आहे. त्यांच्या प्रस्तावांचा गुणवत्तेवर विचार व्हावा तसेच ब्रिक्सच्या विस्तारात भारताने संपूर्ण पणे सहमतीच्या आधारावर पाठिंबा दिला आहे. अनेक विकसनशील देशांना दक्षिणेचा आवाज बुलंद करण्यासाठी या संघटनेत सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे. कारण अमेरिका व पाश्चीमात्य राष्ट्रांच्या दबावा विरूद्ध आवाज बुलंद करण्यासाठी जगातील 20 पैक्षा अधिक राष्ट्रे उत्सुक आहेत. कारण त्यांना विकास व व्यावसायिक प्रश्न, सांस्कृतिक सहकार्य या बाबींना प्रोत्साहान देण्यासाठी रचनात्मक कार्य करण्याची इच्छा आहे. 2012 मध्ये आंतरराष्ट्रीय नाने निधीने 75 अब्ज डॉलर्स कर्जाचे वचन दिले हा ही ब्रिक्स चा विजय होता. 2013 मध्ये चीनने ब्रिक्स समुहासाठी 41 अब्ज डॉलर देण्याचे मान्य केले तसेच ब्राझील, भारत आणि रशिया यांनी प्रत्येकी 18 अब्ज डॉलर आणि दक्षिण आफ्रिकेने 5 अब्ज डॉलर योगदान दिले. चीनला या बाबतीत संपूर्ण व्यवस्थपकांची भूमिका पार पाडावयाची आहे. ब्राझील व भारताला समान भांडवल वाटून घ्यावयाचे आहे. अशा प्रकारे ब्रिक्स देश चलन रिजर्व पूर्ण तयार करत आहे त्यांच्या स्वप्नातील ब्रिक्स डेव्हलपमेंन्ट बँक 2014 मध्ये स्थापन झाली व 2015 मध्ये चीनमधील शाघांय शहरात अस्तित्त्वा आली. भारताचे केव्ही कामत हे बँकेचे पहिले अध्यक्ष बनले. ब्रिक्स समुहाचे आर्थिक एकत्रिकरण करून चीन आपले महत्त्व वाढवूण घेत आहे अशी टिका ही केली जात आहे. जगातील अनेक महत्त्वाच्या पश्नांच्या बाबत ब्रिक्सने अनेक वेळा विचार विनीमय केला आहे. 2015 मध्ये ब्राझील येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत 100 अब्ज डॉलर्स ची नवीन विकास बँक तयार करण्यासाठी दिर्घकालीन अपेक्षित कागद पत्रावर सह्या केल्या हा एक नाविन्य पूर्ण सहकार्य करार होता. त्यातून न्यू डेव्हलप मेन्ट बँकेचे स्वप्न साकार झाले. या बँकेने पायाभूत सुविधा विकास क्षेत्रात मोलाचे कार्य बजावले आहे. 2015 नंतर भारत, इडोनेशिया, दक्षिण आफ्रिका या देशांनी आपली आर्थिक परिस्थीती सुधारली आर्थिक संकटांना सामोरे जाण्यासाठी ब्रिक्स संघटनेचे पाटबळ उपयोगी ठरले. 2019 मध्ये उद्‌भवलेल्या कोरोना महामारीनंतर बहुपक्षीय आर्थिक सुधारणा थोड्याश्या मंदावल्या पण त्या थांबल्या नाहीत ब्रिक्स देशांनी आता डेटा प्लॅटफार्म तयार केला आहे आणि परस्पर सहकार्याने विकास प्रश्नांची सोडवणूक करण्यावर भर दिला जात आहे.

**ब्रिक्स यशाचा कळस :** 2023 मध्ये नुकतीच जोहान्सबर्ग येथे झालेली 15 वी ब्रिक्स शिखर परिषद म्हणजे यशाचा कळस होय. ब्रिक्स बँकेच्या स्थापनेनंतर विकसनशील जगात या संघटनेचे आकर्षन वाढले आहे. बाग्लादेश, इजिप्त, सयुक्त अरब अमिरात आणि उराग्वे हे ब्रिक्सच्या नवीन विकास बँकेचे सदस्य आहेत. जोहान्सबर्ग परिषदेमध्ये सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासावर सकारात्मक चर्चा घडून आली. विकासाच्या पश्नांवर ब्रिक्स देश सक्रीय झाले आहेत नवीन विकास बँक ही बहुपक्षीय पातळीवर विकासाला गती देण्याचे काम करते पायाभूत सुविधाच्या विकासासाठी कार्य करत आहे. दक्षिण आफ्रिकेत या बँकेचे प्रादेशिक केंद्र कार्यरत झाले आहे या ब्रिक्स बँकेचे आतापर्यंत 15 अब्ज डॉलर किमतीचे 53 विकास प्रकल्प कार्यरत आहेत. अनेक संकटावर मात करून विकासाच्या प्रकल्पांना प्रत्यक्ष गती देण्याची योजना महत्त्वाची आहे. ब्रिक्स पेमेंन्ट सिस्टम ही एक नवी व्यवस्था आहे. ब्रिक्स देश संभावितः सर्वासाठी सामान्य चलन विकसीत करण्याचा विचार करत आहे परंतु भौगोलिक विविधता आणि अनेक अडचणीमुळे ही योजना अद्याप कृतित आलेली नाही. भारताने ब्रिक्स देशांना थेट रूपयामध्ये व्यवहार करण्याची संधी दिली आहे. विजय प्रसाद यांच्या मते ब्रिक्सच्या मर्यादा राजकीय आणि आर्थिक स्वरूपाच्या आहेत. तथापी नाटोच्या वर्चस्वाला आव्हान देण्याची क्षमता ब्रिक्स मध्ये किती आहे असा प्रश्न पडतो. जोहान्सबर्ग घोषना पत्रावर नरेद्र मोदी यांच्या सिद्धांताचा प्रभाव पडला आहे. तसेच परिषदेच्या पहिल्याच दिवशी भारताने चाद्रयांन मोहिम यशस्वी केल्यामुळे पंतप्रधान मोदी यांच्या यशामध्ये आणखी एक यशाचा सिरपेच रोवण्यात आला आहे.

या सर्व चर्चेचे सार असे की ब्रिक्स संघटनेची उपयुक्तता आणि समरर्पकत्ता वाढत आहे.

नाविन्य पूर्ण सहकार्यासाठी अर्थकारणात समृद्ध व न्याय तत्त्वावर आधारित वाढ अपेक्षित होती आता भविष्य काळात विज्ञान तंत्रज्ञान, संस्कृती आणि नव उपक्रमातील सहकार्य तसेच डिजीटल अर्थ व्यवस्थेचा विकास या बाबतीत सहकार्याला भरपूर वाव आहे. दहशतवाद, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी तष्करी अप प्रवृत्ती रोखण्यासाठी ब्रिक्स संघटना भक्कम कार्य करू शकते. तसेच पायाभूत सुविधाच्या विकासासाठी गुंतवणूक, ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्य लघु व मध्यम उद्योगांचा विकास, शेती व अन्न धान्य पुरवठा विकास, प्रगत शिक्षण व तंत्रज्ञानातील आदान प्रदान या बाबतीत ब्रिक्स देश एकमेकांना सहाकार्य करू शकतात. जोहान्सबर्ग परिषदेमध्ये स्वतंत्र महिला व युवक संमेलन घेण्यात आले. ही जम्येची बाजू होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे नव्या जगाच्या आशा आकांक्षा पल्वीत करण्यासाठी मुल्य पेरली पाहिजेत व वसुधैव कुटुंबकम् म्हणजे एक जग एक कुटुंब आणि एक संस्कृति असा सर्व समावेशक विकास होऊ शकेल.

# मनाला ध्यानाने जिंकता आले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपलं मन हेच आपल्या जीवनातील अनंत दुःखांच मुळ असतं मात्र हेच मुळ कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी मनाला ध्यानात गुंतवता आलं पाहिजे. मन जिंकता आल तर शिल्लक कहिच उरत नाही, मनुष्य ते ईश्वर ही जी यात्रा आहे त्याचा पहिला अध्याय म्हणजे मन जिंकणे अथवा मनावर प्रभुत्व निर्माण करणं हाच आहे .पण हेच महत्वाचं कार्य करण्यापासून आपण आयुष्यभर दुर राहतो. मनाला जिंकण्यासाठी ध्यान हिच सर्व श्रेष्ठ अशी साधना आहे. मानवी जीवनाचं एकंदरीत मुल्यमापन पाहिलं तर आपल मन हेच आपला मुख्य शत्रु आणि मित्र असल्याने आपलं मन हे आपल्या चांगल्या वाईटासाठी त्याच बरोबर हित अहितासाठी होण्यासाठी जबाबदार असत.**

आपल्या मनावर आपलं नियंत्रण प्रस्थापित असेल तर मग जीवनात कोणत्याही प्रकारच्या अडचणीला सामोरे जाण्याची आवश्यकता आपल्याला भासत नाही.आपलं मन जर अनियंत्रित असेल तर मग अखंड जीवन फक्त ताण तणाव, अनंत दुःख या मध्येच अडकून पडत . त्या सोबत अनेक अडथळ्यांची शर्यत देखिल पार करावी लागत असल्याने अनियंत्रित मन हेच कारणीभूत ठरत असल्याने ते क्षणोक्षणी आपल्याला अस्थिर ठेवत. प्रत्येकाला मन शांती हवी आहे .मन शांती नको आहे अस शोधून देखिल आपल्याला कोणी सापडणार नाही.पण मन हे तर मन आहे मग ते प्रचंड अति चंचल,अति वेगवान,वायु वेगाला सुद्धा मागे टाकणार या मध्ये शंका नाहीच इतकं बलाढ्य शक्तिशाली मन मग शांत कसं राहिल. म्हणून मनाला शांत करण खुपच कठिण असतं .पण प्रयत्न केला तर अशक्य अस काहीच नसतं .संबंध आयुष्य आणि अंतिम साध्य याचा सारासार विचार ज्ञान सदृश अवस्थेतून केला तर जीवनात अर्जित करण्या सारख काय आहे. तर अंतिमतः आपल्या मनावर आपलं नियंत्रण असण अथवा आपलं मन नियंत्रित असण हेच जीवनातील सर्व श्रेष्ठ असं साध्य आहे. अनियंत्रित मन हेच दुःखाचं मुळ व आपलं जीवन प्रभावित होण्याचं मुख्य कारण असतं .मन हे मोह मायेच मृगजळा असल्यामुळे ते आपल्याला घेऊन धावणारच आहे. या मध्ये अजिबात शंका नाही.आपण त्या सोबत किती धावायचं हे आपण ठरवलं पाहिजे. आपल्या मनाची अवस्था चंचल अस्थिर असेल तर जीवनात आपोआपच अशंतात निर्माण होते .जीवनातील अशंती म्हणजे आपल्या अस्थिर मनाची एक प्रकारे फल प्राप्तीच असुन दैनंदिन जीवनात आपण किती हि प्रयत्न केला तरी सुद्धा आपलं मन हे स्थिर होत नाही.मनाल स्थिर करण्यासाठी व नियंत्रित करण्यासाठी ध्यान हेच



आवश्यक आहे.जगात जिंकण्यासाठी सगळ्यात मोठी अवघड आणि कठिण बाब हि आपलं मन आहे.मनाल जिंकल त्याने जग जिंकल कारण जग जिंकता येईल पण मन जिंकता येत नाही. मानवी मनाला जिंकण हि जीवनातील सगळ्यात कठिण गोष्ट आहे. पण ती तितकीच सोपी आणि सहज देखिल गोष्ट आहे.मनाला जिंकण्यासाठी आपण अंनत प्रयत्न करत असतो. पण शेवटी सगळे प्रयत्न निरर्थक ठरतात पण मन काही नियंत्रित होत नाही. आपल मन नियंत्रित असलं पाहिजे हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते .पण तसं होत नाही सगळ्या दुःखाचं मुळ मन आहे.जीवनातील सगळे चांगले वाईट प्रसंग हे आपल्या मनाची देणं असते .आपलं मन आपल्या अधिपत्याखाली अथवा नियंत्रणात रहिल पाहिजे हि साधारणतः प्रत्येकाची मनोमन इच्छा असते ज्याला मनावर ताबा मिळवता आला त्याला सगळं काही शक्य झालं. हेच कठीण कार्य सोपं होतं ते ध्यानाने ध्यान केल तर अगदी सहजपणे आपण आपलं मन जिंकु शकतो .

जसं आपलं मन असतं त्या दिशेने आपलं जीवन मार्गक्रमण करत असत.मनावर आपलं नियंत्रण किती मजबूत आहे. अथवा सैल आहे त्यानुसार आपली दिशा ठरत असते. त्या अनुषंगाने प्रत्येक जण आप आपल्या पद्धतीने आपलं मन कसं नियंत्रित करता येईल या साठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतो .अनेकजण मन नियंत्रित करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या नशेच्या साधनांचा देखिल उपयोग वापर करत असतात. तो क्षणिक आणि घातक विनाशकारी आणि तात्पुरता मार्ग आहे. परंतु सगळ्यात सोपा सुलभ आणि सहज उपाय ध्यान हाच आहे. दैनंदिन जीवनात नियमित पणे ध्यान धारणा अथवा साधना केली तर निश्चितच मनावर नियंत्रण प्रस्थापित होण्यासाठी फारसा वेळ कालावधी लागत नाही.ज्ञान हा पाया मजबूत असेल तर मनाला जिंकण्यासाठी ध्यान करण्याची कला शिकण्यासाठी फार वेळ लागत नाही.

# चांद्रयान ३ चे खरे नायक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**चंद्रायान ३ च्या यशस्वी  सफलतेनंतर भारतात या यशस्वी लँडिंग  वरून राजकारण सुरू झाले आहे. काँग्रेसने याचे श्रेय नेहरूंनी स्थापन केलेल्या इस्त्रोला दिले तर भाजपने मोदींना.यशस्वी अभियानावरून राजकारण होत असले  तरी या यशस्वी अभियानाचे खरे हिरो इस्त्रोचे वैज्ञानिक आहे. भारताने पाठवलेलं चांद्रयान-३ हे अंतराळयान बुधवारी (२४ ऑगस्ट) चंद्रावर यशस्वीरित्या उतरलं. विक्रम लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या सॉफ्ट लँडिंग केलं. इस्रोने चंद्रावर आपलं यान उतरवून भारताला एलिट स्पेस क्लबमध्ये स्थान मिळवून दिलं आहे. या कामगिरीमुळे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अंतराळयान उतरवणारा भारत हा पहिलाच देश ठरला आहे.**

युनायटेड स्टेट्स, चीन आणि पूर्वीच्या सोव्हिएत युनियनने चंद्रावर पाऊल ठेवलं आहे. त्यापाठोपाठ भारत हा चंद्रावर उतरणारा चौथा देश ठरला असून यासाठी आपल्याला इस्रोच्या वैज्ञानिकांचे आभार मानायला हवेत. चांद्रयान-३ मोहीम यशस्वी करण्यासाठी ज्या शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिकांनी मेहनत घेतली त्यात एक मराठमोळी महिला संशोधक आहे. त्यांचं नावं तनुजा पत्की असून विक्रम लँडरच्या लँडिंग टीमचा त्या महत्त्वाचा भाग आहेत.

चांद्रयानच्या यशस्वी लँडिंगमध्ये इस्रोच्या मोठ्या टीमने काम केले आहे. देशभरातील अनेक होतकरू शास्त्रज्ञांना टीमचा भाग बनवण्यात आले होते, भारतातली वेगवेगळ्या भागातील शास्त्रज्ञांनी आपले मोठे योगदान दिले.. या संघांमध्ये यूपीतील अनेक शास्त्रज्ञांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कुणी उपकरणे तयार केली तर कुणी चांद्रयानावर प्रत्येक क्षणी नजर ठेवून होते. भारताच्या या यशात मुरादाबाद, अलिगढ आणि बुदौन यांसारख्या छोट्या शहरांमधून बाहेर पडलेल्या या शास्त्रज्ञांचे मोठे योगदान आहे.गाझीपूर जिल्ह्यातील रेवतीपूरचे रहिवासी असलेले कमलेश शर्मा आणि मिर्झापूरचे तरुण शास्त्रज्ञ आलोक कुमार पांडे हे चांद्रयान-३ टीमचा भाग आहेत. याशिवाय विदर्भातील नागपूर व हिंगणघाट येथील.शास्त्रज्ञांचा देखील चांद्रयान ३ च्या प्रक्षेपणात महत्त्वाचे योगदान आहे.नागपूर येथील  अद्वैत दरणे व हिंगणघाट येथील कोमल करवा हीचे देखील मोठे योगदान आहे.

अद्वैत दवने हा नागपूरकर चांद्रयन 3 मोहिमेत सेन्सर टेस्टिंगची जबाबदारी असलेल्या टीममध्ये होता.

23 ऑगस्ट रोजी संध्याकाळी 6:04 वाजता, भारताने अंतराळात अशी कामगिरी केली जी आतापर्यंत इतर कोणत्याही देशाने मिळवली नाही. पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेल्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) च्या चंद्र मोहिमेअंतर्गत, पूर्णपणे स्वदेशी चांद्रयान-3 चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवण्यात आले, त्यानंतर उपग्रहाच्या पृष्ठभागाच्या भौतिक, रासायनिक, जैविक आणि इतर पैलूंचे विश्लेषण देखील सुरू झाले आणि त्याच्याशी संबंधित आहे. ISRO. अहवाल प्राप्त करत आहे. इस्रोच्या चांद्रयान-३ मोहिमेच्या यशात शास्त्रज्ञांच्या संपूर्ण टीमने भूमिका बजावली.

अवकाश क्षेत्रात नवा इतिहास रचत इस्रोने बुधवारी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'विक्रम' आणि रोव्हर 'प्रज्ञान' या लँडरने सुसज्ज लँडर मॉड्यूलचे सॉफ्ट लँडिंग करण्यात यश मिळवले.

चांद्रयान 3ः हा भारतासाठी अतिशय ऐतिहासिक क्षण आहे, जेव्हा आपला तिरंगा चंद्रावर फडकत आहे. चांद्रयान-3 चे लँडर विक्रम चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरित्या उतरले आहे. पण तुम्हाला माहित आहे का ते कोण आहेत ज्यांनी हे मिशन यशस्वी केले आहे. चांद्रयान-३ मध्ये मिशन डायरेक्टर मोहन कुमार आणि रॉकेट डायरेक्टर बिजू सी. थॉमस आहेत. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) च्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, चांद्रयान-3 मोहिमेत सुमारे 54 महिला अभियंता/शास्त्रज्ञ आहेत ज्यांनी थेट काम केले आहे. ती सहयोगी आणि उपप्रकल्प संचालक आणि विविध केंद्रांवर काम करणाऱ्या विविध यंत्रणांच्या प्रकल्प व्यवस्थापक आहेत.

डॉ. एस. सोमनाथ, अध्यक्ष, इस्रो

भारताचे मून लँडर यशस्वीरित्या सॉफ्ट-लँड पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. एक तरुण अभियंता म्हणून, सोमनाथ आणि त्याच्या दोन वरिष्ठांनी उड्डाणासाठी तयार असलेल्या पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV) मधील विसंगती सुधारली. सामान्यतः अशा परिस्थितीत रॉकेट प्रक्षेपण पुढे ढकलले जाते. दुसरा पर्याय म्हणजे रॉकेटमध्ये इंधन भरल्यावर समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणे - एक धोकादायक प्रस्ताव. मात्र, तरुण



सोमनाथसह तीन धाडसी अधिकाऱ्यांनी ही समस्या दूर केली. रॉकेटने सुरक्षितपणे उड्डाण केले आणि मोहीम यशस्वी केली. सुमारे दोन दशकांनंतर, इस्रोचे प्रमुख म्हणून, सोमनाथ यांनी भारताच्या पहिल्या चंद्र लँडर विक्रमच्या क्रॅश लँडिंगला कारणीभूत असलेल्या समस्यांचे निराकरण केले आहे. हिंदी शिक्षकाचा मुलगा सोमनाथला विज्ञानात रस होता. नंतर त्यांनी मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये बी.टेक केले पण त्यांना रॉकेटमध्ये सक्रिय रस होता. 1985 मध्ये, सोमनाथला इस्रोमध्ये नोकरी मिळाली आणि तिरुवनंतपुरममधील विक्रम साराभाई स्पेस सेंटर (VSSC) मध्ये सामील झाले, जे रॉकेटसाठी जबाबदार होते.

सोमनाथने कोल्लमच्या TKM कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बीटेक आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथून एरोस्पेस इंजिनिअरिंगमध्ये स्ट्रक्चर्स, डायनॅमिक्स आणि कंट्रोलमध्ये स्पेशलायझेशनसह पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. इस्रोचे अध्यक्ष होण्यापूर्वी सोमनाथ व्हीएसएससीचे संचालक म्हणून कार्यरत होते.


डॉ. एस. उन्नीकृष्णन नायर, संचालक, विक्रम साराभाई स्पेस सेंटर ते भारतातील रॉकेट सेंटर विक्रम साराभाई स्पेस सेंटर चे प्रभारी एक प्रतिष्ठित शास्त्रज्ञ तसेच मल्याळम लघुकथा लेखक आहेत. डॉ. एस. उन्नीकृष्णन यांनी केरळ विद्यापीठातून यांत्रिक अभियांत्रिकीमध्ये बीटेक, बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून एरोस्पेस इंजिनीअरिंगमध्ये एमई आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी-मद्रासमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये डॉक्टरेट केली आहे.

उन्नीकृष्णन यांनी 1985 मध्ये व्हीएसएससी येथे आपली कारकीर्द सुरू केली आणि भारतीय रॉकेट - पीएसएलव्ही, जीएसएलव्ही आणि एलव्हीएम 3 साठी विविध एरोस्पेस सिस्टम आणि यंत्रणा विकसित करण्यात त्यांचा सहभाग होता. 2004 पासून ते ह्युमन स्पेस फ्लाइट प्रोग्रामच्या अभ्यास टप्प्याशी निगडीत होते आणि प्री-प्रोजेक्ट तंत्रज्ञान विकास उपक्रमांसाठी प्रकल्प संचालक होते. ह्युमन स्पेस फ्लाइट सेंटरचे संस्थापक संचालक म्हणून, ISRO मधील सर्वात तरुण केंद्र, उन्नीकृष्णन यांनी गगनयान प्रकल्पासाठी टीमचे नेतृत्व केले आणि बेंगळुरूमधील HSFC येथे अंतराळवीर प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली.

डॉ. पी. वीरमुथुवेल, चांद्रयान-3 प्रकल्प संचालक रेल्वे कर्मचाऱ्याचा मुलगा, डॉ. पी. वीरमुथुवेल यांचे नेहमीच आकाशाला स्पर्श करण्याचे ध्येय होते. तामिळनाडूच्या विल्लुपुरम जिल्ह्यातील वीरमुथुवेलने मेकॅनिकल इंजिनीअरिंगचा डिप्लोमा पूर्ण केला आणि अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी आयआयटी-मद्रासमधून पीएचडी केली. ते 2014 मध्ये इस्रोमध्ये रुजू झाले.

एम. शंकरन, संचालक, यू आर राव उपग्रह केंद्र एम. शंकरन, एक प्रतिष्ठित शास्त्रज्ञ, यांनी 1 जून 2021 रोजी UR राव उपग्रह केंद्र (URSC), सर्व ISRO उपग्रहांच्या डिझाईन, विकास आणि अंमलबजावणीसाठी देशातील प्रमुख केंद्र, संचालक म्हणून पदभार स्वीकारला. ते सध्या दळणवळण, नेव्हिगेशन, रिमोट सेन्सिंग, हवामानशास्त्र आणि आंतर-ग्रहीय शोध यासारख्या क्षेत्रात विविध उपग्रहांचे नेतृत्व करत आहेत.URSC/ISRO मधील त्यांच्या 35 वर्षांच्या अनुभवादरम्यान, त्यांनी मुख्यतः लो अर्थ ऑर्बिट (LEO) उपग्रह, भूस्थिर उपग्रह, नेव्हिगेशन उपग्रह आणि बाह्य अवकाश मोहिमेसाठी ऊर्जा प्रणाली, उपग्रह पोझिशनिंग सिस्टम आणि आरएफ कम्युनिकेशन सिस्टीम या क्षेत्रात योगदान दिले. चांद्रयान, मार्स ऑर्बिटर मिशन (MOM) आणि इतर. 1986 मध्ये तिरुचिरापल्ली येथील भारतीदासन विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर, ते ISRO उपग्रह केंद्र (ISAC) मध्ये सामील झाले, ज्याला सध्या URSC म्हणून ओळखले जाते.

# ये रे घना...



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**खरंतर यावर्षी पाऊस खूप कमी आहे. आपण सगळेच पावसाच्या प्रतीक्षेत आहोत. पण असं असलं तरी या लेखातील शब्दांच्या वर्षावात काही क्षण तरी भिजण्याचा आनंद घेऊ या. आपल्याला हा लेख नक्कीच आनंद देईल. जुलै महिन्यातील एक संध्याकाळ. पाच वाजले असतील. गॅलरीतून बाहेर डोकावलं आणि बाहेरचा निसर्गाचा कॅनव्हास पाहून मन एकदम प्रसन्न झालं. पावसाळी वातावरण असलं तरी आज स्वच्छ ऊन पडलं होतं. पण उन्हं आता कलली होती. पण भवतालची सगळी सृष्टी पावसात न्हाऊन निघाल्याने सगळं कसं स्वच्छ वाटत होतं. माझ्या उजव्या बाजूला लांबवर डोंगरांची एक रांग दिसत होती. माझ्या समोर ऊन आणि डोंगराकडच्या भागावर पाऊस भरलेला दिसत होता. विस्तीर्ण आकाशातले काळे ढग डोंगराला टेकले होते.**

जणू काही क्षणांची विश्रांती ते घेत होते. पण कोणत्याही क्षणी त्यांना पाझर फुटेल आणि बरसणाऱ्या जलधारांचा एक पडदा तयार होईल. डोंगरावर बरसणारे मेघ हळूहळू माझ्याकडेही येतील आणि सृष्टीला पर्जन्याभिषेक सुरु होईल.

इकडे आकाशाच्या विस्तीर्ण पटावर खूप हालचाली सुरु असतात. मध्येच काळे ढग आकाश व्यापून टाकतात तर सूर्यदेव मी अजून आहे अशी जाणीव करून देतात. आकाशाच्या मध्यभागी एक मोठ्ठा काळा ढग जणू सांडलेल्या शाईचा ठिपका कागदभर पसरावा तसा पसरलेला असतो. कुठे कुठे रुपेरी ढगही असतात. ऊन, पाऊस, रुपेरी ढग, काळे ढग आकाशात एक मनोहर चित्र करतात. पावसाळ्यात निसर्गाचे रंग असे क्षणोक्षणी बदलत असतात. मनात येतं कोण बरं रंगवत असेल हा आकाशाचा पट ! एखाद्या शोभादर्शकातल्या प्रतिमा जशा ते कसेही फिरवले तरी सुंदरच भासतात तसे हे आकाशाचे रंग ! कसाही बदल झाला तरी त्यांची शोभा अवर्णनीयच असते.  अशा वेळी मनात मग पावसाची गाणी रुंजी घालू लागतात. कवी मग तो मराठीतला असो की हिंदीतला, मानवी मनातील तरल भावभावना अचूक पकडतो निसर्ग आणि भावभावना, मानवी जीवन यांचा सुंदर मेळ घालतो. अशा वेळी ' अरे संसार संसार ' चित्रपटातील गाणं आठवतं. त्यात पावसाचं वातावरण किती सुंदर उभं केलंय कवीनं ! कवी म्हणतो चाले ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ
लोणी पायाला भासती मऊ भिजली ढेकळं
काळ्या ढेकळात डोळा हिरवं सपान पाहतो
हिरवं सपान पाहतो, काटा पायात रुततो.

पावसाळ्यात ऊनपावसाचा जणू पाठशिवणीचा खेळ सुरु असतो. शेतात पडलेल्या पावसानं मातीची ढेकळं भिजून मऊ झाली आहेत. शेतकऱ्याच्या पायाला ही भिजलेली माती म्हणजे जणू लोण्याचा स्पर्श वाटतो. पडलेल्या पावसानं आता या शेतकऱ्याच्या डोळ्यात हिरवं स्वप्न पेरलं आहे. त्याचं ते स्वप्न मातीत उगवून साकार होण्याचे दिवस जवळ आले आहेत. हिरवं स्वप्न पाहताना काटेही पायात रुतणारच ! त्याचीही तयारी ठेवावीच लागणार. मानवी जीवन म्हणजे ऊनपावसासारखा सुखदुःखाचा पाठशिवणीचा खेळ आहे. या गाण्याचे शब्द, संगीत मनात रुंजी घालू लागतं.  एव्हाना डोंगरावर सुरु असलेला पाऊस आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेला असतो. निसर्गराजा वरून बरसात करत असतो. धरती जणू आपल्या हातांची ओंजळ करून या मंगलधारा सामावून घेते. अशा वेळी सुमन कल्याणपूर यांनी गायिलेल्या गीताची ओळ मनात घर करते. त्या गीतात कवी म्हणतो  रिमझिम झरती श्रावणधारा धरतीच्या कलशात आकाशातून झरणाऱ्या श्रावणधारा धरतीवर तर पडताहेत पण कुठे ? कवी फार सुंदर कल्पना करतो. ही सगळी धरती जणू कलशस्वरूप होते आणि निसर्गाचं देणं आपल्या कलशात सामावून घेते. खरं तर पाऊस पडताना जागा पाहत नाही. तो कुठेही पडतो.

जमिनीवर, समुद्रावर, नदीत सुद्धा. पण ही सगळी धरतीचीच रूपे आहेत. धरती जणू चहुबाजूनी आपल्या हातांची ओंजळ पसरते आणि ही आभाळमाया आपल्या ओंजळीत सामावून घेते. या हातांची ओंजळच या गीतात कलशाचे रूप घेते. हा प्रसंग कवीला विरहिणीची भावना व्यक्त करायला योग्य वाटतो. आपला प्रियकर जवळ नसल्याने ती झुरते आहे. ती म्हणते. रिमझिम झरती श्रावणधारा धरतीच्या कलशात  प्रियाविण उदास वाटे रात बरस बरस तू मेघा रिमझिम आज यायचे माझे प्रियतम आतुरलेले लोचन माझे बघती अंधारात रात्रीचा अंधार दाटला आहे. त्या अंधारात तिचे आतुरलेले डोळे प्रियाला शोधताहेत. ती पुढे म्हणते प्रासादी या जिवलग येता,कमल मिठीमध्ये भृंग भेटता बरस असा की प्रिया न जाईल माघारी दारात या ओळी वाचल्या की मला मुकेश यांनी गायिलेल्या एका हिंदी गीताची आठवण होते. तेही याच अर्थाचे आहे. त्यात कवी म्हणतो  बरखा रानी जरा जमके बरसो मेरा दिलबर जा न पाये, झुमके बरसो  तसंच हे आपलं मराठी गीत. या गीतात ती विरहिणी म्हणते मेघा असशी तू आकाशी, वर्षातून तू कधी वर्षसी वर्षामागुनी वर्षती नयने, करती नित बरसात हे मेघा तू आकाशात असतोस. वर्षातून कधीतरी वर्षतोस. पण तुला वर्षामागून वर्षे वर्षणारे माझे नेत्र



दिसत नाहीत का रे ? या ओळींमध्ये वर्षा, वर्षणे या शब्दांचा सुंदर उपयोग केलेला आपल्याला दिसतो. आणखी एक वेगळ्या चालींचं अन वेगळ्या ढंगाचं गाणं म्हणजे आशा भोसलेंनी गायिलेलं ' झुंजूर मुंजूर पाऊस माऱ्यानं अंग माझं ओलंचिंब झालं रं...' या गाण्यातही विरहीणीची आपल्या साजणासाठीची ओढ आहे. अशी अनेक ' वर्षागीते ' आठवत जातात. हिंदी चित्रपटात तर खूपच बहारदार गीते आहेत. ' मंझिल ' चित्रपटातील लता मंगेशकर यांनी गायिलेले ' रिमझिम गिरे सावन ' हे सुंदर गाणं मला आठवतं. यात सुरु असणारा पाऊस, अंगावर उडणारे पावसाचे तुषार आणि उसळत्या दर्याच्या लाटांचे तुषार आणि त्यात चिंब भिजलेली अमिताभ आणि मौसमी चॅटर्जी यांची जोडी आपल्याला दिसते. या गाण्यात अवखळपणे बागडणाऱ्या मौसमीच्या चेहऱ्यावरील आनंद आपल्यालाही आनंदित करतो. अशीच सुंदर गीते ' छायी बरखा बहार ...', ओ सजना बरखा बहार आयी आहेत. अशी अनेक गीते हिंदी चित्रपटात आहेत. सगळ्यांचा उल्लेख करायचा म्हटला तरी लेख खूप लांबेल. असंच माझं अत्यंत आवडतं गाणं आहे कविवर्य मंगेश पाडगावकरांचं ' श्रावणात घननीळा बरसला...' या अप्रतिम गीतावर मागे मी एक स्वतंत्र लेख लिहिला आहे. ' घन ओथंबून येती, वनात राघू ओघीरती ...' आहे. शेवटी तो घन आपल्यापर्यंत येऊन पोहोचतो आणि आपल्यालाही चिंब भिजवतो. मग आपोआपच ओठांवर शब्द येतात, ' येरे घना येरे घना, न्हाऊ घाल माझ्या मना...'



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

# मग महापुरुषांच्या 'त्या' बदनामीवर गप्प का ?

आधुनिक केसरी

**समाज माध्यमांवर महापुरुषांच्या विषयी वादग्रस्त आक्षेपार्ह व बदनामीकारक लेखन केले जात आहे. उघडपणे वादग्रस्त विधाने केली जात आहेत. यातून वादंग निर्माण होऊ लागले आहेत. जातीय आणि धार्मिक द्वेषाच्या ठिणगीने सामाजिक वातावरण प्रदूषित होत चाललं आहे. महापुरुषांच्या बाबतीत चुकीचं बोललं जातंय, चुकीचं लिहिलं जातंय, एवढंच नव्हे तर देशाचा अपमान करणारी वक्तव्य सुद्धा पुढे येऊ लागली आहेत. मानवतेचे हक्क नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे समर्थन केलं जातय तर हक्क देणाऱ्या संविधानाचा अपमान होतोय, पण यावर कायदेशीर कारवाई व्हायला हवी ना? सरकार मात्र गप्प राहून जणू समर्थन केल्या सारखं वागतय.**

महापुरुषांची बदनामी करणारी विकृत व्यक्ती छोटी असो किंवा लोकांच्या हृदयात जाऊन बसलेली असो दोन्ही व्यक्तींना शासन तर व्हायलाच हवे ना ?.महाराष्ट्रात महापुरुषांच्या बाबत चुकीची वक्तव्य करीत महापुरुषांची बदनामी करणारे महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात भाषणे देत सुटलेले आहेत.अशा भाषणांना विरोध होतोय मात्र समर्थन करणारे सुद्धा रस्त्यावर आंदोलनाने येऊ लागलेले आहेत. महापुरुषांची बदनामी केली जात आहे.हे उघड्या डोळ्याना सुद्धा दिसत आहे.परंतु शासनात शासन करण्याची धमक उरलेली दिसत नाही.त्यामुळे विरोधात आंदोलन होणारच.परंतु ज्यांच्याकडून महापुरुषांची वारंवार बदनामी केली जात आहे.अशा व्यक्तींच्या समर्थनार्थ केले जाणारे आंदोलन हे समर्थन नक्की कशासाठी ? ही खेदाची बाब आहे. समाज सुधारकांनी महाराष्ट्रात केलेले परिवर्तन अशा लोकांना मान्य नाही का ? म्हणून डोळे झाकुन महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांवर अंध विश्वास ठेवला जात आहे.सोशल मीडियातून भावना दुखावल्याने एखाद्याला चोप देणे,

आंदोलने करणे,त्यावर कायदेशीर कारवाई करणारी जन भावना अगदी ज्वालामुखी सारखी बाहेर पडत असते.पडायला हवीच.जो आक्रमक पणा दाखविला जात असतो तो दिसायला हवाच.परंतु महाराष्ट्रात ज्यांच्याकडून वारंवार महापुरुषांची बदनामी करणारी वक्तव्ये केली जात असतात.अशा वक्तव्यांचा व अशा व्यक्तींच्या विरोधात सुद्धा आक्रमकपणा यायला हवा. परंतू अशी लोकं मात्र मोकाट फिरताना दिसतात.


अशा लोकांवर सुद्धा कारवाई व्हावी.म्हणून यावेळी आक्रमकपणा का येत नाही ?उलट संरक्षण दिलं जातय,कौतुक केलं जातय,समर्थन मिळतंय...याला तर महापुरुषांच्या बाबतीतला दुप्पटी पणा म्हणायला हवा ना ? वक्तव्य कुणी केली ? का केली ?महापुरुषांची बदनामी कोण करतय ?हे समस्त महाराष्ट्र जाणून आहे.हेच तर पाहून वक्तव्याना वा व्यक्तींना समर्थन करायचं की नाही हे ठरविले जातय.इथे आदरणीय पुज्यनिय समजल्या गेलेल्या व्यक्ती ला केंद्रबिंदू मानून व्यक्तिच्या इशाऱ्यांवर चालणाऱ्या अशा समर्थकांना महापुरुषांचं काहीच देणे घेणे नसल्याचंच दिसून येतंय.जे महापुरुषांचे अपमान करत सुटलेले आहेत.अशांवर कारवाई करण्याची कोणतीही ठोस भूमिका घेऊन धाडस का दाखविले जात नाही ? ही वक्तव्य समाज मनाला बदनामीची वाटत नाहीत का ? राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे आपले आदर्श आहेत.

परंतु यांची बदनामी कोणी केली ? कोण करत आलय ? कशासाठी केली गेली ? हे जाणून न घेणारे मेंदू जातीय आणि धार्मिक दंगलीत गहाण पडलेले आहेत.त्यामुळेच खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करणारी विकृती समाजात कार्यरत असल्याने नक्की खरं आणि खोटं काय यापासून लोकं दूर ठेवली गेलेली आहेत.महापुरुषांनी जातव्यवस्था, धर्माच्या चुकीच्या रूढी परंपरा यांवर आघात केल्याने धर्म धर्म करणारी लोकं महापुरुष बदनामच करणार ना ? महापुरुष समजून घ्यायचे नाही व द्यायचे ही नाहीत.धर्मच श्रेष्ठ असल्याचे सांगणे,राजकारणाच्या



पटलावर हाच मुद्दा पुढे रेटत घेऊन जाताना महापुरुषांच्या बदनामीतून कटकारस्थान व राजकारणाच्या खेळी तर खेळल्या जात नाहीत ना ? यांसारखी अनेक कारणे समोर येत असतील... अलीकडच्या कालखंडात महापुरुषांची बदनामी करण्याचं प्रमाण खुपच वाढलं आहे.समाज मन दूषित करणाऱ्या विचित्र घटना घडवून आणल्या जात आहेत. वादग्रस्त बोलुन जणू ठरवूनच षडयंत्र सुरू चाललेलं आहे.चढाओढ पाहायला मिळते. एकाचं झालं की दुसरा सुद्धा जणू स्वतःला इतिहासाचा संशोधक समजूनच संशोधन केल्यागत वक्तव्ये करत आहेत.हे सगळं का ?आणि कुणासाठी चाललंय ?ही वक्तव्य नसून महापुरुषांना कसं बदनाम केलं जाईल यातून कसं हित साधलं जाईल याचाच प्रयत्न हा अधून मधून सारखा केला जात असतो. स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ म्हणून महात्मा फुले,सावित्रीबाई फुले यांच्या कार्याकडे पाहिले जाते. इथल्या वर्ण व्यवस्थेच्या विरोधात जाऊन कर्मवीर भाऊराव पाटील,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भीक मागून नव्हे तर शिक्षण देऊन शैक्षणिक चळवळ गतिमान केली. परंतु आजही यांच्या बाबत सुद्धा मुद्दामपणे चुकीची बदनामी कारक वक्तव्य करण्यात आली. समाजातील विषमतेला नष्ट करणाऱ्या समा सुधारकांनी,महापुरुषांनी स्वतःचे जीव धोक्यात घातले.सनातनी छळवादी प्रवृत्तीच्या विरोधात संघर्ष केला.सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी परिवर्तनवादी चळवळ जन्मास आणली.मानवता, समता,बंधुता नाकारणाऱ्या समाजात धर्माचं वर्चस्व असलेल्या लोकांना मानवतेची व्याख्या समजून सांगणे सोपे नव्हते. त्यासाठी संघर्षच करावा लागणार होता. महापुरुषांचा,समाजसुधारकांचा हा संघर्ष लढवय्या प्रमाणे लढणारा होता.त्या काळात ते लढले म्हणून तर आजचा आपला काळ सुकाळ बनला आहे.त्यामुळे त्यांनी केलेला संघर्ष, त्यांचे विचार,त्यांचे कार्य आजच्या कोणत्याच व्यक्ती समवेत तुलना होऊ शकत नाही.मनी कोणताच स्वार्थ नसलेले हे समाज सुधारक समाजाच्या उद्धारासाठी लढली.समाज सुधारकांनी,महापुरुषांनी परिवर्तनाची लढाई लढली.त्यांच्या मुळेच मानवतेचा सूर्य उगविला. म्हणून तर त्यांना महापुरुष म्हटले जाते.परंतु राजकारण,सत्ताकरण,धर्मकारण हे सामाजिक द्वेषगिरी पेरणारे बनू लागल्याने महापुरुषांच्या बदनामीचे पेव फुटू लागले आहेत.हे महापुरुष बदनाम करत जातीय आणि धार्मीक तेढ नेमकं कोण करत आहे.या मागचं मास्टर माईंड नक्की कोण आहेत.हे सुजाण नागरिकांनी समजून घ्यायला हवे. डोळ्यांना सर्व काही दिसत आहे. परंतु डोळ्यांवर एकमेकांच्या द्वेषाची झालर तयार झाल्याने द्वेष करण्याशिवाय दुसरं काहीच काम नाही.महापुरुष समजून घेण्यासाठी वेळच उरलेला नाही. महापुरुषांचा इतिहास हा सोशल मीडियातून नव्हे तर पुस्तकातून अभ्यासण्याची गरज आहे. कोणतं पुस्तक हातात पडलं पाहिजे. इतिहासाचे जुने दाखले देऊन खरं काय आणि खोटं काय यावर सुद्धा महापुरुषांच्या बाबतीत वादंग पुढे आणले जात आहेत. दाखल्यांची शहानिशा करायला हवी.खरं,खोटं ओळखले पाहिजे.

समाजात द्वेष निर्माण करणाऱ्या व्यक्तीपासून सावधानता बाळगली पाहिजे.महापुरूषांची बदनामी करून समाजात वादंग निर्माण करणाऱ्या लोकांच्या विरोधात कठोर कारवाईची भूमिका व्हायला तर हवीच.आज अनेक ज्ञानी लोकं आपलं ज्ञान समाजात पाजळवत आहेत.तेच खरं मानून लोकांचे मेंदू सुध्दा ब्रेन वॉश झाल्यासारखी वागू लागली आहेत.आज लोकांमधून समर्थन,विरोध दर्शवित आंदोलने होत असली तरी ज्या महाराष्ट्रात महापुरुषानी बदल घडवून आणले त्याच महाराष्ट्रात महापुरुषांच्या बाबतीत बदनामी करण्याचं एवढं धाडस वाढल्याने जिथे जातीय व धार्मिक रंग वाढेल तिथे तर जास्तच आक्रमकता दिसून येत आहे.हे भयानक स्वरूप असून हा आक्रमक पणा समाजाला घातक ठरणारा आहे.यातूनच द्वेषाची बीजे एकमेकांच्या विरोधात उभी राहिलेली आहेत. लोकांनीच आता अशा परिस्थितीतून बाहेर पडले पाहिजे.हे समाजाला परवडणारे नाही.हे कळायलाच हवे.महापुरुषाची बदनामी जे करत आहेत,जे जातीय धार्मीक तेढ निर्माण करतील त्यांना कायदेशीर मार्गाने शासन करण्यासाठी प्रयत्न करायला हवेच. जिथे विरोध व्हायला हवा,जिथे महापुरुषांची बदनामी केली जात आहे. अशांच्या विरोधात लोकांनी कायदेशीर मार्गच पत्करला पाहिजे.ज्यांना महापुरूषांच्या विचारांचा, त्यांनी केलेल्या कार्याचा सन्मानच करता येणार नसेल अशांनी महापुरुषांचे नांव घ्यायलाच हवे का ?अशांनी महापुरुषांचे नांव घेऊन बोलण्याची गरजच नाही.परंतु यांच्या शिवाय राजकारण, सत्ताकारण, धर्मकारण साध्य होणार नाही.म्हणून महापुरुषांचे कर्तृत्व,त्यांच्या कार्याला कमी लेखत बदनामीचे षडयंत्र उदयास आणले जात आहे.ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना आजच्या नेत्यांबरोबर केली जात असते. महापुरुषांच्या खऱ्या इतिहासाला बगल देत खोटा इतिहास सांगण्याची खोटी प्रवृत्ती जी इथल्या समाजव्यवस्थेत विकृतांच्या मानसिकतेतून येऊ लागली आहे. ती अनेकांच्या स्वार्थाच्या पोळ्या भाजत असतील...परंतु महापुरुषांची जी बदनामी केली जात असते.ते अजिबात योग्य नाही. राजकारण करत असताना एखादया कार्यक्रमातून बोलत असता तेव्हा महापुरुषांच्या कार्याबद्दल सांगितले जाते.संदर्भ दिले जात असतात.परंतु त्याच महापुरुषांबद्दल चुकीच वक्तव्य येणार असेल तर खरच महापुरुषांबद्दल बोलायलाच हवं का ? जर महापुरुषांबद्दल चांगलं बोलता येत नसेल तर महापुरुषांचे नांव घेऊन चुकीचे बोलता तरी कशाला ? असा सवाल महापुरुषांच्या बदनामी वरून विचारण्याची वेळ आलेली आहे.वादग्रस्त विधान ठरले की पुन्हा सारवा सारव करण्याचा जो केविलवाणा प्रयत्न ही केला जात असतो.हे उशीरा सुचलेले शहाणपण असले तरी अशा वक्तव्यांच्या विरोधात लोकांची आक्रमकता कुठे गायब होते.अशावेळी गप्प का ? महापुरुषांना घेऊन समाजा समाजात जी अशांततेची बीजे पेरली जात आहेत.यातून मोठा उद्रेक होऊ शकतो.याचे तारतम्य नेत्यांनी वा बेताल वक्तव्य बोलणाऱ्यांनी पाळण्याची गरज आहे.सोशल मीडियातून तर वारंवार काही ना ही उपद्व्याप करणारी विकृत लोकं असतातच.त्यातून तर मोठ्या प्रमाणात उद्रेक होत आहेत.महापुरुषांच्या बाबतीत सोशल मीडियातून जे काही बदनामी कारक लिखाण केलं जात असतं. अशा विकृत मानसिकतेचा जेवढे विरोध होत असतोय तेवढाच विरोध हा गल्ली गल्लीतून व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून महापुरुषांची बदनामी करत सुटलेल्या त्या वक्तव्यांचा तसेच अशा वक्तव्यांना खतपाणी घालणाऱ्या विधानांचा सुद्धा समाचार घेण्याची गरज आहे.एकवेळ महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाता नाही आले तरी चालेल परंतु जिथे ज्या विकृतीकडून महापुरुषांची बदनामी होत असेल त्या प्रत्येक विकृतीच्या विरोधात असलेच पाहिजे. मग ती व्यक्ती छोटी असो की लोकांच्या हृदयात स्थान मिळविलेली आदरणीय वा पूज्यनिय असो....



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# चांद्रयान-3 : शून्यातून विश्व उभे

आधुनिक केसरी

**भारतीय वैज्ञानिक शुन्यातून विश्व उभारू शकते हे चांद्रयान-3 च्या माध्यमातून जगाला दाखवून दिले. भारत भूमी अशी आहे की हजारो वर्षांपासून थोर साधुसंत, महाज्ञानी, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ,आयुर्वेद शास्त्रज्ञ यामध्ये तर्बेज आहेत त्याचीच प्रतिकृती आज आपल्याला चांद्रयान -3 च्या सफल मोहीमेवरून दिसून येते.चांद्रयान -3 च्या यशस्वी मोहीमेसाठी भारतातील संपूर्ण धर्माच्या लोकांनी ईश्वराजवळ प्रार्थना केली व ईश्वराने प्रार्थना स्विकारली. त्याचप्रमाणे भारत भुमि अनेक धर्मांनी आणि संस्कृतीनी परिपक्व आहे त्यामुळे चंद्रासह संपूर्ण सृष्टी भारतीयांसाठी पुज्यनिय आहे. त्याचेच फलस्वरूप आज आपल्या शास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. परंतु भारत कोणतीही गोष्ट किंवा निर्णय घाईगडबडीत घेत नाही.**

त्यामुळे सश्याच्या धुर्त गतीपेक्षा कासवाची चाल नेहमीच भारत पसंत करतो. कोणत्याही गोष्टीला वेळ लागला तर चालेल.परंतु विजय निश्चित झाला पाहिजे याचं पध्दतीचे भारतीय वैज्ञानिकांचे असल्यामुळे आज आपण जगाला मागे टाकून चंद्रावर प्रवेश केलेला आहे.भारताचा इस्रो जगाला लय भारी झालेला आहे हे मोहिमेवरून दिसून येते ही स्वागतार्ह व आनंदाची बाब आहे. दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत पहिला देश आहे.कारण इस्रोने जगात इतिहासरचुण विक्रम लॅंडर,प्रग्यान रोव्हरचे यशस्वी सॉफ्ट लॅंडिंग झालेले आहे.दिनांक 23 ऑगस्ट 2023 रोज बुधवार सायंकाळी ठिक 6 वाजून 4 मिनिटांनी चांद्रयान-3 यशस्वीपणे उतरल्याने जगाच्या पाठीवर भारताचे व भारतीय वैज्ञानिकांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. त्यामुळे देशाच्या संपूर्ण वैज्ञानिकांना कोटी कोटी प्रणाम.याच काळात नुकतेच एकीकडे रशियाची चांद्रयान मोहीम अयशस्वी ठरली चंद्राच्या दक्षिण ध्रुवाचा अभ्यास करण्यासाठी रशियाने "लूना 25" हे अवकाशयान चंद्रावर पाठवले असता अनियंत्रित होऊन दिनांक 19 ऑगस्ट 2023 रोज शनिवारला नजीकच्या कक्षेत जात असतांनाच यानाचा नियंत्रण कक्षाशी असलेला संपर्क तुटला व चंद्राच्या पृष्ठभागावर कोसळले.यामुळे सुमारे गेल्या 46 वर्षांनंतर काढलेली चांद्रयान मोहीम रशियाची अयशस्वी ठरली. शास्त्रज्ञांच्या मते असे सांगितले जाते की दक्षिण ध्रुवावर कायम अंधार असतो.त्यामुळे चंद्राच्या या भूभागावर फारशी माहिती शास्त्रज्ञांना नाही. मात्र येथे असलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पाणी असण्याची शक्यता आहे. भविष्यातील मोहिमांमध्ये येथील खडकांमध्ये गोठलेल्या स्वरूपात असलेल्या पाण्याचा वापर करून ऑक्सिजन आणि रॉकेटसाठी इंधन तयार करता येईल, असा शास्त्रज्ञांना विश्वास आहे. त्यामुळेच अवकाशयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरच उतरविण्यासाठी जगातील शास्त्रज्ञ प्रयत्नशील असतात. परंतु यात अनेक देश अयशस्वी झालेत. परंतु तेच काम जगातील कोणत्याही देशांनी केले नाही ते भारतमातेच्या पुत्रांनी करून दाखविले ही अत्यंत स्वाभिमानाची व गौरवास्पद बाब आहे.त्यामुळे शास्त्रज्ञांच जितकं कौतुक कराल तीतक कमीच आहे. भारत अनंतळापासुन संघर्ष करीत आहे. परंतु भारताने नेहमीच संघर्षाचे मंथन करून नेहमीच अमृत काढले. याच संघर्षामुळे आपण चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्यास सफल झालो. या मोहिमेत देशाच्या महान शास्त्रज्ञांनी आपल्या चमू सोबत अहोरात्र मेहनत घेऊन चांद्रयान मोहीम यशस्वी केली. यात मुख्यत्वे करून एस.उन्नीकृष्णन नायर संचालक विक्रम साराभाई



स्पेस सेंटर यांनी चांद्रयान -3 ची विविध कार्याची जबाबदारी स्वीकारली, पी.वीरमुथ्थुवेल प्रोजेक्ट डायरेक्टर चंद्रावरील अनेक संशोधनाच्या बाबतीत ख्याती,डॉ.एस.सोमनाथ इस्रो प्रमुख चंद्रयान-3 च्या बाहुली रॉकेटला डिझाईन केले, डॉ.के.कल्पना असोसिएट प्रोजेक्ट डायरेक्टर, एम.शंकरन डायरेक्टर यूआर राव सॅटेलाईट सेंटर( युआरएससी ) यांनी इस्त्रोच्या सेटलाईटला डिझाईन केले,ए.राजराजन डायरेक्टर लॉंच अथोरायझेशन बोर्ड ( एलएबी ) कंपोझिट क्षेत्रातील तज्ज्ञ,एस.मोहनकुमार मोहीम डायरेक्टर इत्यादींच्या महत्वपूर्ण अथक प्रयत्नाने आपण दक्षिण ध्रुव गाठु शकलो. हे आज चांद्रयान -3 च्या मोहिमेचे खरे शिल्पकार आहेत. चंद्रावर पाऊल ठेवणारे आतापर्यंतचे 4( चार ) देश झालेत सोव्हिएत रशिया ( 1966 ), अमेरिका ( 1966 ), चीन ( 2013 ), भारत ( 2023 ) परंतु दक्षिण ध्रुवावर लॅंड करणारा भारत हा जगातील पहिला व एकमेव देश आहे.आज भारत अनेक क्षेत्रांत प्रगती पथावर आहे.जागतीक विश्व गुरू, जगातील शांतीचे प्रतीक म्हणून भारताची जगात ओळख आहे आणि आता चांद्रयान मोहीम फत्ते झाल्यानें संपूर्ण विश्वाचे लक्ष भारताकडे लागले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भारतातील 140 कोटी जनता मग ती कोणत्याही धर्माची असो आकार-पाताळ-पृथ्वी,चंद्र-तारे-सुर्य यांची पुजाअर्चना करतात. त्याचप्रमाणे भारतातील प्रत्येक वृक्षांना, फळांना, फुलांना आगळेवेगळे महत्व आहे त्यामुळे याचीही जोपासना पुजेच्या माध्यमातून केली जाते. नदी,तलाव,समुद्र ही संपूर्ण सृष्टी भारतवर्षासाठी पुज्यनिय आहे.एक म्हण आहे "सब्र का फल मिठा होता है" तेच आज आपण चांद्रयान-3 यशस्वी मोहीमेवरून समजु शकतो.यांनंतरही पुढील कार्य व मोहीम यशस्वी होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. जय हिंद!


# राष्ट्रसंता आम्ही तुझी लेकरे अन्यायाविरुद्ध पेटून का उठत नाही ?

आधुनिक केसरी

**राष्ट्रसंत तुकडोजी बाबा तुमच्या निर्वानाला पन्नास वर्ष उलटलीत. तुमच्या निर्वानानंतर तुमच साहित्य घराघरात पोहचवीण्याच कार्य काही गुरूदेव सेवक स्वतःच्या आर्थीक कुवतीने करीत आहे. त्यांच्या कार्याला भरपूर मर्यादा आहे. राष्ट्रसंता आपल साहित्य मानवी जीवनाला बहुमोलाच आहे. ते लोकांपर्यंत पोहचावे हे सांगतांना, आपण एक कळकळीचे आव्हान एका आर्तसंदेशातून प्रसारीत केला होता. जे कोणी माझे स्नेही प्रेमळ। त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाळ। घरोघरी चालवावा प्रचार निर्मळ। ग्रामगीता वाचनाचा ॥१२७॥ग्रा.अ. ४१ यातची माझे समाधान। सुधारेल ग्रामाचे जीवन। पाखंड जाईल वितळोन। मतलबियांचे ॥१३४॥ ग्रा.अ. ४१ "आपल्या लोकांचे कर्तव्य आता हेच असू शकते की, ह्या वाङ्मयाला करोडो मुखी व कानी जाऊ द्यावे, हजारो भाविकांत ती भक्ती वाढवावी आणि त्या वाङ्मयाची जी किर्ती आहे ती स्वार्थपूर्ति न पसरविता 'परोपकारः पुण्याय पापाय पर-पीडनम्' ह्या प्रवृत्तीने समजून घेतली पाहिजे. वाढविली पाहिजे." : तुकड्यादास**

राष्ट्रसंता हा संदेश आम्ही वाचतो पण आमच रक्त सळसळत नाही. आपण गुरूकुंज आश्रम, कमलापूर आश्रम, सौंसर आश्रम, आदर्श आमगाव आश्रमशाळा, वडीगोदरी आश्रम, शाळा, हायस्कुल, अध्यापक विद्यालय, आयुर्वेदीक महाविद्यालय यांच्या नियंत्रनांसाठी अ.भा. श्रीगुरूदेव सेवा मंडळाचा मोठा पसारा उभा केला. याच संस्थेच्या माध्यमातून तुमच्या साहित्याचा प्रचार प्रसार सर्व भारतभर देशविदेशात होईल ही सार्थ अपेक्षा राष्ट्रसंता आपण केली होती. त्यावर मी भाष्य करणार नाही. आज प्रचाराची स्थीती काय आहे? कारण आपण स्थापन केलेल्या संस्थेला चिकटून असलेल्या अनेक महाभागांना आमच्या सुचना या जहरील्या टीका वाटतात. आम्ही श्रीगुरूदेव सेवा मंडळाच्या चळवळीला बदनाम करतो, असा ठपका सत्तेचे शहेनशा लोकांतात बोलतात. हेच ते जाहीर बोलण्याची हींम्मत करीत नाही. पण तेच राष्ट्रसंतां तुमच्या साहित्यावर हक्क सांगतात. शासकीय आणि विद्यापीठ स्थरावरून राष्ट्रसंता तुमच्या साहित्याचा प्रसार करतांना हे मात्र अडंगा आणन्याचा प्रयत्न करतात ही त्यांची गुरूदेवनिष्ठा, कारण आम्ही सत्ताधारी हा त्यांचा अहंकार. व्यक्तिगत द्वेष मात्र खालच्या पातळीवरून पसरवीतात. संस्थेच्या पैशावर कोर्टकचेऱ्यायातून त्यांना जेरीस आणून स्वर्ग सुखाचा कुश्चीत आनंद घेतात. त्यांच्या दिमतीला साम,दाम,दंडाची कुमक असते. लाचारांची फौज असते.

राष्ट्रसंता मोठ्या संघर्षातून अहिंसक मार्गाने आपले नाव नागपूर विद्यापीठाला बहाल झाले. श्रीगुरूदेव युवामंचाच्या प्रयासाने आपल्या नावाने अध्यासन आणि राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाला. तो होऊ नये असे प्रयत्न



वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

विद्यापीठ स्थरावर झाले. आजही राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा अभ्यासक्रमाला युजीची मान्यता नाही. आम्ही हा प्रश्न वारवांर उपस्थीत करतो प्रसीध्दी माध्यमातून कारण तेच शस्त्र आमचेकडे आहे. तुझे लेकर ढम्म सत्तेची घंटाखुर्ची खेळत असतात.

नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रसंता तुमच्या नावे नामविस्तार झाल्यावर प्रथम कुलगुरू डॉ. एस.एन. पठान यांनी विद्यापीठाला " या भारतात बंधु भाव नित्य वसु दे, दे वरची असा दे ॥" हे तुम्ही लिहलेले गीत विद्यापीठगीत म्हणून स्विकारले. पण राष्ट्रसंता आपल हे राष्ट्राप्रती समरपीत गीताचा वेळोवेळी अपमान विद्यापीठाच्या स्थरावरून केल्या जातो. मागे तुमच्या स्मृतिनिमीत्त विद्यापीठाने निर्माण केलेले 'ग्रामगीता भवन' ज्याचे १५ डीसेंबर २०१५ ला उद्घाटन तत्कालीन महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यासागर राव यांचे हस्ते करण्यात आले. त्या ऐतीहासीक सोहळ्यात विद्यापीठाने सन्मानाने स्विकारलेले विद्यापीठगीत गायलेच नाही. काय तर म्हणे राज्यपालाच्या प्रोटोकॉलमध्ये बसत नाही. सध्या विद्यापीठाचे स्थापना शताब्दीवर्ष सुरू आहे. ४ ऑगस्ट २०२३ ला शताब्दीवर्ष उद्घाटनाचा मोठा समारोह भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे उपस्थीतीत झाला. त्या ऐतीहासीक सोहळ्यात राष्ट्रसंता आपण रचललेल राष्ट्राला समर्पित विद्यापीठगीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने गायलंच नाही. प्रसीध्दी माध्यमातून श्रीगुरूदेव युवामंचाने आवाज उठवला. पण त्या आवाजाला प्रतीसाद राष्ट्रसंता ना तुझ्या गुरूदेव भक्तांनी दीला ना तुझ्या गुरूदेव सेवकांनी दीला. व्हॉटस-फेसबुकवर फोटोसेशन करणारे गुरूदेवभक्त रोज प्रार्थनेत म्हणतात, " हो चीड झूठी राह की, अन्याय की अभिमान की। सेवा करनको दास की, पर्वा नहीं हो जान की ॥" राष्ट्रसंता तुमच्या नावाचा जयजयकार करणारे तुमच्या साहित्यावर होणाऱ्या अन्यायावीरूध्द पेटून का उठत नाही? कारण ते लोकांमध्ये बोलतात गुरूदेवाची कृपा आहे म्हणून आम्हाला पद मीळाले. जे ते पद घेतात ते स्वतःच वाटून घेतात राजकारण्यांनसारखेच. मग ते एवढे गुरूदेव भक्त पेटून का उठत नाही हा प्रश्न पडतो. राष्ट्रसंता याचे उत्तर कोठे शोधू ? राष्ट्रसंता आपण निर्माण केलेली भारतातील पहीली आश्रमशाळा जी लोकश्रमदानातून निर्माण केलेली कमलापूर, जिल्हा गडचीरोली येथील धर्मरावबाबा आत्राम या राजकारण्याच्या भगवंतराव चॅरीटेबल ट्रस्टला सत्ताधारी शहान्यांनी वीकली तरी राष्ट्रसंता तुमचे गुरूदेवभक्त शांतच. राष्ट्रसंता सौंसर आश्रमच विचारू नका. त्याची अवस्था ते आश्रमच जांनो. आदर्श आमगाव आश्रमची शान आश्रमशाळेमुळे मात्र गावाचा सहभाग नाही. प्रचाराच कार्य या आश्रमातून नसल्यासारखेच. राष्ट्रसंता तुझ्या लेकरांना जागव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या कुलगुरूकडे निषेधाच्या पत्रांचा पाऊस पडू दें. गुरूदेव सेवक आणि गुरूदेव भक्तांना बोलत कर त्यांनी विद्यापीठाला आपल्या अपमानाबदल जाहीर जवाब विचारावा. तसेच विद्यापीठावर भव्य भजन आंदोलन करावे. त्यातून विद्यापीठ कुंभकर्णाना जागवीण्यासाठी पेटू दे सर्वांना. राष्ट्रसंतां कडक टोपी घालून जे दिखावा करतात त्यांना जनतेच्या दरबारात उघड पाड, पण तुझ्या विचाराने जगणाऱ्यांना ताकत दें. होऊ दे एकदा पुन्हा तुझ्या साहित्याचा जाणीवपूर्वकअपमान करणाऱ्या विकृतीवीरूध्द भजन आंदोलन.

ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
प्रवर्तक श्रीगुरूदेव युवामंच

# चंद्र सवैरा

आधुनिक केसरी

**काल सहज सायंकाळी दूरदर्शन समोर बसल्या बसल्या तुझी आठवण झाली. तो चंद्र ,ते चांदणे,अन् हा चंद्रमा...अन् तो शाळेत असताना सहावीत असताना लिहलेला निबंध...अरे चांदोमामा, तुला आनंदाची बातमी सांगू का? अरे आता लवकरच आमच्या शाळेची सहल निघणार आहे. कुठे ते माहित आहे का तुला? अरे तुझ्याकडेच येणार आहोत. तुला भेटण्याची आम्हा सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे आणि आम्ही सगळी मुले येणार आहेत बरं का तुझ्याकडे!**

मला आजही आठवते आहे, ते निबंधतील ती वाक्ये आज एका क्षणाला हवेत तरळत अलगद डोळ्यासमोरून गेल्याचा भास झाला. तुझी नि माझी ओळख तशी खूप जुनी. अगदी कळायला लागल्यापासून ची ते लिंबोनीचे झाड आणि त्याची नभांगनावर उमटलेली ती काल्पनिक प्रतिमा, तो भव्य दगडी चिरेबंदी वाडा, ते काल्पनिक हरीण, अंगणात तिन्ही सांजा होऊन गेल्यावर अंगणात लोळता लोळता कधीतरी अंगणातल्या तुळशीत लावलेली निरांजन आणि तुळशीची तुझ्यावर पडलेली सावट ती ही काल्पनिक अर्थात बाळ मनाच्या कल्पना अन्



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

कधीतरी शेतातून येताना अगदी शेतापासून घरापर्यंत येऊन अंगणात थांबायचा. आणि थोड्या वेळाने उद्या पुन्हा यायचे असे सांगून निघून जायचास. आणि उद्या उद्या पुन्हा ते वाट बघणं, त्यात तुझ्या प्रेमाची आगळीक किती अपूर्व अशीच असायची. मध्यरात्री मागाल दाराच्या बाभळी मागून चे तुझे ते डोकावणे, तसेच कित्येकदा पहाटेचे शेतात जाताना चा तो 'चंद्र सवैरां 'तुझ्या आणि माझ्या मनाची ती कितीतरी जुनी स्मरणे आजही स्मरतात. पुढे कितीतरी कवितेतून लेखातून आणि कळायला लागल्यापासून आजपर्यंतचे प्रत्येक दिवसाचे तुझे माझे नाते तुझ्या शुभ्र शीतल चांदण्या सारखे अगदी खरे आणि किती शीतल होते. आणि अजूनही असणार आहे. ते नाते होते,आहे आणि आज ते अजूनच घट्ट झाले! लहानपणी सहा-सात महिन्याचे असताना आईच्या हातावर बसून मी तुला पाहिलं ना तेव्हाच तुझ माझंच नव्हे तर इथल्या कित्येकांच आणि तुझ नात कितीतरी सुंदर होत. दररोज तुझ्याकडे पाहत कधी थोडा थोडा मोठा होताना दिसायचा. आणि एखाद्या रात्री तू अजिबात दिसायचा नाहीस. तेव्हा मात्र खूप वाईट वाटयाचे. अगदी स्वप्नात सुद्धा शोधण्याचा प्रयत्न व्हायचा. कुठे हरवला मामा म्हणून कधी कधी कावरी बावरी होऊन झोपेतुन जागे सुद्धा झाले. बोलता येऊ लागले तेव्हा **पहिलं गाणं म्हटलं ते ही तुझच.**

**चांदोबा चांदोबा भागलास का?**
**चांदोबा चांदोबा रुसलास का ,**
**असाच एकटा बसलास का?**

अशी किती गाणी पुन्हा कधीतरी मध्येच कळले, आमच्याकडचे अनेक लोक तुझ्याकडे जाऊन आले. त्यांनी तुझ्याविषयी अनेक हकीकती सांगितल्या. खरच का रे तुझ्याजवळ काहीच नाही अगदी पाणी सुद्धा. नुसती दगड आणि खाचखळगे आहेत का? असा प्रश्न ही पडला. एका क्षणाला रागही आला.अस काही नाही. खरचं ते नात किती सुंदर अगदी घट्ट असेच.अन् काल किती आतुरतेने 'विक्रम लैं ड र' चे लैडींग होतानाचे ते शेवटचे काही क्षण पाहताना अंगावर आलेले ते शहारे, एक मिनिट दोन मिनिट करता करता शेवटी तो अत्युच्च क्षण आला आणि जीव ओतून त्या ऐतिहासिक क्षणाचे ते शेवटी चे काही क्षण अनुभवताना आजपर्यंत टेलिव्हिजनवर मनापासून पाहिलेला कुठला क्षण असेल तर तो होता, बुधवार २३ ऑगस्ट २०२३ ची भारतीय वेळेनुसार सायंकाळची ती वेळ म्हणजे ६ वाजून ४ मिनिटे आणि त्या अगोदरच्या त्या काही मिनिटांची ती वेळ इतकी विलक्षनीय खूप काही देवून गेली. जे शब्दात सांगणे कठीण होय. प्रत्यक्ष असो अप्रत्यक्ष असो. ती शेवटची काही मिनिटे अगदी श्वास रोखून धरन्या इतपत तो काऊन डाऊन मोजता मोजता अखेर तो एक क्षण आला. अन् डोळ्याचे पारणे फिटले. फडकणारा तिरंगा पाहिला, आला अन् डोळा ओलवला. लिखाणातून लिहलेले आपलं किंवा आपल्या पुढच्या पिढीने चंद्रावर आपल्या प्लाटचा ताबा सांगावा. अंगणातली तुळस आज त्या चंद्रावर लावू ही वाक्ये सहज स्वप्नवत वाटू लागली. काही क्षणानंतर बाल्कनीत जाऊन आकाशातली ती अर्ध चंद्र कोर पहिली. काहीतरी जाणवतेय का? अर्थात काहीच नव्हते पण ..! नाहीच पण आजचं ते तुझ्याकडे पाहणे त्यात खूप काहीतरी जाणवत होत.मनाची ती चलबिचलता.. शेवटी मन च ते शब्दात शब्दबध्द करणे कठीणच, फक्त तुझ्याच साठी.. हे छोटेसे गीत..

तो शेवटचा अत्युच्च क्षण आला, अन् डोळा ओलावला,
भारताचा तो गौरव आज अभिमानाने तुझ्या प्रांगणात सजला.
तुझ्याकडे पाहताना तिरंग्याचा अभिमान तो माझ्या डोळ्यात
साठला. वाहूनिया पुन्हा तो, तुझ्या चांदण्यात गोठला.
तो चंद्र..ते चांदणे..अन् आज चा हा चंद्र आज मनाच्या त्या खोल कुपीत कायम साठी विसावला. बाहेर आल्यानंतर त्या चंद्र कोर वर सुवर्ण अक्षरांत कोरलेले भारत अशी एक सुंदर कलाकृती आकाराला आली. आणि डोळ्यासमोर दिसणाऱ्या त्या कलाकृतीतून ओठावर आपोआप 'माझा भारत माझा अभिमान ' असे शब्द उमटले.

काही वेळानंतर वाटले ही ऐतिहासिक घटना प्रत्येक भारतीयासाठी ही किती अभिमानाची गोष्ट आहे. आज इस्त्रोतल्या आणि चांद्रयान ३साठी हातभार लागलेल्या त्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाला कृतज्ञता त्या प्रत्येक बुद्धिकौशल्याला त्या प्रत्येक हाताला आणि त्या इतक्या वर्षाच्या प्रत्येक प्रत्येक क्षणाला मनापासून सलाम .... शब्दांनाही पडावं कोडं...! असच काहीसं खरचं मनापासून खूप खूप आभार, धन्यवाद आणि कृतज्ञता. ज्यांच्यामुळे मला हा अत्युच्च क्षण अनुभवता आला.

# चंद्र कवेत आला

आधुनिक केसरी

**काल सहज सायंकाळी दूरदर्शन समोर बसल्या बसल्या तुझी आठवण झाली. तो चंद्र ,ते चांदणे,अन् हा चंद्रमा...अन् तो शाळेत असताना सहावीत असताना लिहलेला निबंध...अरे चांदोमामा, तुला आनंदाची बातमी सांगू का? अरे आता लवकरच आमच्या शाळेची सहल निघणार आहे. कुठे ते माहित आहे का तुला? अरे तुझ्याकडेच येणार आहोत. तुला भेटण्याची आम्हा सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे आणि आम्ही सगळी मुले येणार आहेत बरं का तुझ्याकडे!**

२३ ऑगस्ट हा दिवस भारतासाठी ऐतिहासिक ठरला. भारताचे चांद्रयान-३ मिशन संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चंद्रावर लँड झालं. चांद्रयान-३ लँड होण्याच्या काही दिवसांआधी रशियाचं लुना-२५ हे यान चंद्रावर उतरण्याआधीच कोसळलं. रशियाची मोहिम अपयशी ठरली. जे रशियाला जमलं नाही ते भारताने करून दाखवल. भारतासह जगातील प्रत्येकाच्या नजरा या ऐतिहासिक घटनेकडे लागल्या होत्या. जसजसा लॅण्डिंगचा क्षण जवळ येत होता, तसतशी धाकधूक वाढत गेली... श्वास रोखले गेले... हात जोडले गेले आणि डोळे मिटले गेले... आणि बातमी आली... चांद्रयान-३ मोहीम फत्ते झाली... प्रत्येक भारतीयाच्या डोळ्यांत आनंदाश्रू तराळले... आणि मनात आनंदाचे धबधबे फुलून गेले... मी यशस्वीपणे चंद्रावर पोहोचलो आहे, आणि माझ्यासोबत संपूर्ण भारत याठिकाणी पोहोचला आहे असा आशयाचा संदेश चांद्रयानाने पाठवला आहे. भारताच्याच नाही तर संपूर्ण जगाच्या इतिहासात, जिथं जगातलं कुणीच गेलेलं नाही, अशा दक्षिण ध्रुवाच्या उंबरठ्याला भारताने गवसणी घातलीय. त्यामुळे हा क्षण फक्त भारताच्याच नाही तर, अखंड जगाच्या इतिहासात नोंदवला जाणार आहे. १४ जुलै २०२३ रोजी चांद्रयान-३ हे यशस्वीरीत्या चंद्राच्या दिशेने झेपावले होते. त्यानंतर एक-एक टप्पा पार करत चांद्रयान-३ हे चंद्राच्या कक्षेत दाखल झाले होते. चांद्रयान-३ च्या प्रपल्शन मोड्यूलमध्ये शेप नामक उपकरण देखील जोडण्यात आले आहे. शेप म्हणजे स्पेक्ट्रो पोलरोमेट्री ऑफ हॅबिटेबल प्लेनेटरी अर्थ. हे शेप उपकरण प्रपल्शन मोड्यूलसोबत चंद्राभोवती फिरत राहील आणि इतर दूरच्या ग्रहांचे स्पेक्ट्रोपोलारिमेट्रिक सिग्नलद्वारा निरिक्षण करेल आणि तिथे पृथ्वीसारखे जीवन आहे का याचा शोध घेईल. इस्रोचा अंदाज आहे की हे उपकरण तीन ते सहा महिने चंद्राभोवती प्रदक्षिणा घालेल. हे शेप उपकरण प्रोपल्शन मॉड्युलमध्ये बसवलेल्या एस बँक



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

पॉन्डरवर गोळा केलेली माहिती इंडियन डीप स्पेस नेटवर्क पर्यंत पोहोचविण्याचं काम करेल. चांद्रयान-३च्या लँडर मॉड्यूलमध्ये लँडर आणि रोव्हरचा समावेश आहे. ते दोघेही चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरल्यानंतर, त्यांचं आयुष्य केवळ एका दिवसाचं असेल. म्हणजे चंद्रावरील एक दिवसात त्याचं संशोधन केलं जाईल. चंद्रावरील एक दिवस हा पृथ्वीवरील १४ दिवसांच्या बरोबरीचा असतो. चांद्रयान-३ मोहिमेच्या यशाचा फायदा हा केवळ भारतालाच नाही; तर जगातील कित्येक देशांना होणार आहे. विशेष म्हणजे अमेरिकेला याचा सर्वात जास्त फायदा होणार आहे. चांद्रयान-३ हे चंद्रावर विविध गोष्टींचं संशोधन करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ पाण्याचे अंश मिळतात का याची तपासणी चांद्रयान-३ करेल. आपली सूर्यमाला ही सुमारे ४ अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली होती. यावेळी लघुग्रह, उल्काश्म हे सगळ्या ग्रहांवर आणि उपग्रहांवर आदळत होते. यातूनच आपल्या पृथ्वीवर जीवाची उत्पत्ती झाल्याचंही म्हटलं जातं. चंद्रावर वातावरण नसल्यामुळे यावेळी ज्या घडामोडी घडल्या होत्या, त्याचे पुरावे चंद्राच्या लपलेल्या भागात असण्याची शक्यता आहे. याचाही शोध चांद्रयान-३ च्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. चांद्रयान-३ चंद्राच्या ज्या भागात उतरणार आहे, तो आतापर्यंत मानवापासून लपून राहिला आहे. त्यामुळे या भागातून भारताला जी माहिती मिळेल, ती संपूर्ण जगासाठी नवीन असणार आहे. भविष्यात अंतराळ मोहिमा राबवण्याच्या आणि चंद्रावर मानव पाठवण्याच्या तयारीत असणाऱ्या देशांसाठी चांद्रयान-३ ने गोळा केलेली माहिती उपयोगी असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दक्षिण आफ्रिकेतून चांद्रयान-३;च्या लँडिंगचं थेट प्रक्षेपण पाहिलं. ही मोहीम यशस्वी झाल्यानंतर त्यांनी इस्रो, टीम चांद्रयान आणि देशातील सर्व नागरिकांना मनापासून शुभेच्छा दिल्या. भारतासाठी हा अविस्मरणीय क्षण आहे. हा क्षण भारतासाठी नव्या भारताच्या जयघोषाचा आहे. समस्यांचा महासागर ओलांडून आपण इथपर्यंत आलो आहोत. १४० कोटी लोकांचं स्वप्न आज पूर्ण झालं आहे. हा भारताचा शंखनाद आहे. आज प्रत्येक देशवासीयाप्रमाणेच माझंही मन या चांद्रयान मोहिमेकडेच जोडलं गेलं होतं. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं. तसंच सगळ्या वैज्ञानिकांचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कौतुक केलं. चांद्रयान-३ च्या यशस्वी लँडिंगमुळे भारताला तीन मोठे फायदे होतील. पहिला फायदा म्हणजे अंतराळ शर्यतीत भारत खूप पुढे जाईल. दुसरे म्हणजे, इस्रोवरील जगाचा विश्वास वाढेल, त्याचप्रमाणे अवकाश क्षेत्रातील गुंतवणूकही फायदेशीर ठरेल. भारताच्या इतिहासातली सर्वात मोठी, सर्वात अभिमानाची आणि सर्वात मोठ्या गौरवाची अशी ही गोष्ट. भारतातील १४० कोटी जनतेची मान अभिमानाने वर गेली, ऊर आनंदाने भरून आला. इस्रोचे १६,५०० शास्त्रज्ञ गेल्या चार वर्षांपासून करत असलेली मेहनत यशस्वी झाली आहे. प्रत्येकजण इस्रोच्या शास्त्रज्ञांना कडक सॅल्युट करत एवढचं म्हणतोय, गर्व आहे मला, मी भारतीय असल्याचा. कारण, भारताच्या चांद्रयानाने चंद्राला अलिंगन दिलंय. इस्रोचं यान चंद्राच्या कुशीत शिरलंय आणि महत्त्वाचं म्हणजे, आधीच्या चंद्रमोहिमांच्या अपयशाची जळमटं क्षणार्धात कुठल्या कुठं झटकून टाकली गेलीत. भारताच्या यशाचा सूर्य थेट चंद्रावर उगवला आहे.

# तेथें काय मी तें माझें । कोण वागवी ते ओझें ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

स्वतःत आणि भोवताल समाजात सातत्याने घडणाऱ्या घडामोडी लेखक, कवी, विचारवंत यांना सातत्याने अस्वस्थ करत असतात. त्यातून ते कधी मौन बाळगतात तर कधी व्यक्त होतात. कोणताही सृजन स्वतःसह आपल्या समकालीन बाबींना बदलवण्यासाठी प्रयत्न करत असतो. सामाजिक अधःपतनाच्या काळात माणसाला सर्वसमावेशक आत्मोन्नतीचा महत्वपूर्ण मार्ग दाखवण्याचे कार्य सर्वच समाजसुधारकांनी केले आहे. त्यात संत तुकाराम महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांचे संपूर्ण जीवनच खडतर संघर्षाने भरलेले असून पावलोपावली त्यांना अनेक संकटांनी घेरलेले दिसून येते. अत्यंत कमी वयात पडलेली संसाराची जबाबदारी आणि त्यातून उभे राहिलेले अनेक संसारिक प्रश्न आणि त्यातून भजन-भक्तीकडे वळलेला एक युवक तुकाराम!

**तुकारामनीती**
**भाग -63**

हे आपण सार्वांनीच थोडे काळजीपूर्वक पहिले की; आपल्या भोवताल उभी असलेली छोटीमोठी आव्हाने, संकटे आपल्याला शुल्लक वाटायला लागतात. माणसाला खायला-ल्यायला-रहायला नसणे हा सर्वात मोठा प्रश्न आणि त्यासाठी करावी लागणारी धडपड म्हणजे सर्वात मोठा संघर्ष! त्यापैकी तूकोबांनी भयंकर दुष्काळ अत्यंत जवळून अनुभवला होता. घरातील गाई-गुरंच काय स्वतःची पत्नी आणि मुलगा दगावतो! हे सगळं आपण पहिल्यानंतर प्रत्येकाने त्यांच्याशी आपले जीवन तुलना करून पाहिले पाहिजे. एवढे संकटांचे पहाड समोर असतांना तुकाराम नावाचा एक युवक सर्वांच्या पलीकडे जाऊन आपले दैनंदिन जीवन भजनासाठी देतो. त्यात त्याला आनंद मिळतो. भजनातून तो आपले संसारिक दुःख विसरतो. त्यातूनच त्यांना मग कविता सुचायला लागते. हळूहळू त्यांची एक एक कविता अभंग व्हायला लागते. अभंग होत होत एक एक शब्द त्यांच्या जीवनात मुरायला लागतो आणि मग तुकोबाराय बेडर बनतात. त्यांचे रोखठोक शब्द आणि त्यातून समाजातील अनिष्ठांची सडेतोड कान उघडणी करण्याचे धाडस त्यांच्याकडे यायला लागते. मग अगोदर ते लोकांच्या शिव्या झेलायला शिकतात. शिव्यांनी काही डगमगत नसल्यामुळे नतदृष्ट लोक अक्षरशः त्यांना मारतात. असे होऊनही तुकोबाराय कुणाला परतून शिवी देत नाहीत की; हात उगारत नाहीत. असा सामान्यातून असामान्यत्व पावलेला माणूस कुणालाही भिक घालत नाही. आपले करायचे ते कार्य अहोरात्रपणे सुरूच आहे. माणसाचे अनुभव, वय आणि लोकांचा संपर्क जसा जसा येत जातो तस तसा माणूस खोल-रुंद-आणि प्रगल्भ बनतो. असे होणे हेच चिंतनगर्भ व्यक्तीचे लक्षण! हा गुणधर्म सर्वच माणसांना लागू होतो. त्यातून तुकोबाराय सुद्धा अपवाद कसे असतील? त्यांना मानवी जीवन आणि शरीराची नश्वरता बऱ्यापैकी कळली होती. स्वतःच्या हाताने माय-बाप-पत्नी-मुलगा यांना निजधामी वाटे लावण्याचे दुःख अगदी खोलवर होतेच! त्यातूनच जीवन आणि भौतिक गोष्टी किती शुल्लक-फुटकळ आहेत(!) याची पुरती जाण तुकोबांना आली होती. त्यातूनच माणसांच्या कायिक-वाचिक-मानसिक स्तरावरील उठणाऱ्या विविध तरंग-अंतरंगांचे चित्रण

पंचभूतांचा गोंधळ । केला एकेठायीं मेळ । लाविला सबळ । अहंकार त्यापाठीं ॥१॥ तेथें काय मी तें माझें । कोण वागवी ते ओझें । देहा केवीं रिझे । हें काळाचें भातुकें ॥ध्रु.॥ जीव न देखे मरण । धरी नवी सांडी जीर्ण । संचित प्रमाण । भोग शुभा अशुभासी ॥२॥ इच्छा वाढवी ते वेल । खुंटावा तो खरा बोल । तुका म्हणे मोल । झाकलें तें पावेल ॥३॥ (१२१६)

तुकोबाराय अशा प्रकारे करताना सामान्य लोकांना भजन-कीर्तनातून भेटू लागले. लोकांना समजावण्याचा प्रयत्न करू लागले. माणसाच्या शरीराचे वर्णन करतांना प्रस्तुत अभंगात तुकोबाराय पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांचा मेळ लावतात. दुर्दैवाने माणूस या पाच तत्व आणि घटकांना विसरतो आणि सहावा अहंकार नावाचा शत्रू त्याला विळखा घालतो. मग माणूस हळूहळू शाश्वताकडून अशाश्वताकडे जातो. तसं पाहिलं तर, माणसाने जर या पंच घटकांची योग्य संगत आणि ओळख ठेवली तर त्याच्या जीवनात कोणतीच समस्या निर्माण होणार नाही. परंतु आपण त्यांच्या मागे अहंकार नावाचे भूत लावले आणि हे पाचही घटक कमकुवत करून टाकले. त्यासाठी माणसाने स्वतःतील पृथ्वीचे भारतत्व, अवकाश पोकळी, सूर्याचे तेज, हवेचा हलकेपणा आणि आकाशाची विशालता स्वतःमध्ये वृद्धिंगत केली तर आपल्याला कोणतीच समस्या त्रासदायक ठरणार नाही. माणसाचे जीवन विशालकाय विचारांनी ओतप्रोत होईल! सर्वत्र आपलेपणाचा ओलावा निर्माण होईल. सरळ सरळ माणसामाणसातील जात-धर्म-पंथ-लिंग-श्रेष्ठ-कनिष्ठ इत्यादी सर्वच भेद मिटून जातील. सगळी माणसं एकाच अद्‌भुत शक्तीची म्हणजेच वरील पाच तत्वांची लेकरे असून आपण सगळे एकच आहोत ही विश्वबंधुत्वाची संकल्पना माणसाच्या मनात रुजली जाईल. तमाम मानवजात एक होईल. देशादेशातील आणि माणसामाणसातील वाद-तंटे-भांडणे-युद्ध कायमचे थांबतील! त्यासाठी सर्वांना अहंकार नावाच्या शत्रूची संगत पडता कामा नये.

आज प्रत्येकजन मी, माझे यातच गुंतून गेला आहे. अति आत्मकेंद्रित व्यवहार माणसाला जास्तच खोलात घेऊन जात आहेत. तसं पाहिलं तर आपले शरीर पंच महाभूतांनी दिलेले आहे आणि शेवटी त्यालाच जाऊन मिळणार आहे. प्रत्येकाला काळाची भेट निश्चित ठरलेली आहे. असे असतांना इथले सारे काही माझे माझे म्हणून त्यात जास्तीचे गुंतत जाणे हे कितपत योग्य आहे? असा खडा सवाल तुकोबाराय करताना दिसतात. आईनस्टाईनच्या E = MC2 या सूत्राप्रमाणे उर्जा अमर आहे. आपल्या शरीरातील



उर्जा आसमंतात विलीन होते, शरीर मातीत मिसळते. असे हे सगळे काही जीर्ण म्हणजे जाणारे आहे याची सर्वांनीच नोंद घेण्याचे आवाहन तुकोबाराय करतांना दिसतात. त्यासाठी शेवटी तुकोबाराय महात्मा सिद्धार्थ गौतम बुद्धांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे 'इच्छा हे दुःखाचे मूळ आहे.' दुर्दैवाने इच्छा वेलीसारखी वाढतच जाते. तिला कुठे तरी बंधन घालावे लागेल. एका इच्छेतून दुसरी इच्छा निपजतच जाते आणि त्यामुळे ही इच्छाच खुंटणे गरजेचे असते आणि ती खुंटण्यासाठी हा 'बोल' म्हणजेच 'वाचेचा पसारा' आधी खुंटावा लागतो आणि असे जर का झाले तरच आयुष्याचे जे खरे सार आहे, जे मोलाचे आहे ते 'आत्मसुख' समोर येइल. म्हणजेच आतापर्यंत जे झाकलेले आहे ते अंती प्रकटते किंवा साध्य होते. त्यासाठी माणसाने आपली वाणी खंडित केली पाहिजे म्हणजे तिला आवरले पाहिजे. इथे सुद्धा जगद्‌गुरू तुकोबाराय आपल्या वाणीला म्हणजेच बोलण्याला विशेष महत्व देतात. याच अनुषंगाने, बोलणे थांबणे किती महत्वाचे आहे(?) हे संत ज्ञानेश्वर माऊली आपल्या ज्ञानेश्वरीमध्ये सांगतांना लिहितात, मग तो संकल्प । वाचेचिया द्वारा । मांडितो पसारा । बोलण्याचा ॥ ऐशापरी जेव्हा । वाचेचा तो दिवा । दाखवी आघवा । कर्ममार्ग ॥ तेव्हा कर्ता जीव । पार्था अवधारी । सापडे व्यापारी । कर्तृत्वाच्या ॥ (ज्ञानेश्वरी १८) वाचेचे संकल्प अत्यंत महत्वपूर्ण असून ते आपण व्यवस्थित केले पाहिजेत. आपल्या बोलण्याने पसारा वाढतो आणि कमी सुद्धा होतो. त्यासाठी सत्कर्म आणि वाचारूपी दिव्याने मानवाने आपापल्या जीवनाचा दिव्य मार्ग सुकर करून घ्यावा लागेल. संत तुकोबाराय यांचा एकेक अभंग अत्यंत मोलाचा आहे. कोणत्याही काळात आणि परिस्थितीत तुकोबांचे अभंग पथदर्शी आहेत. त्याच्यातील कालजयी तत्व दिवसेंदिवस निखरत जातात हे अत्यंत महत्वाचे आहे. त्यासाठी तुकोबांचा गाथा कोणत्याही धर्म अथवा केवळ एखाद्या पंथापुरता मर्यादित राहता कामा नये. संत तुकाराम बोवांच्या गाथ्यातील एकएक शब्द आणि अभंग अनमोल आहे. जीवनाचे सारतत्व सांगणारे ते सुभाषिते आहेत. त्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने तुकोबांचा गाथा किमान एकवेळा तरी वाचायलाच हवा. कुणी कितीही अडचणीत किंवा संकटात असेळ त्याने एकवेळ गाथ्याचे नक्की वाचन करावे. आपले जीवन आणि तुकोबांचे अभंग-जीवन याची थोडक्यात सांगड घालण्याचा प्रयत्न केल्यास आपल्याला त्यांच्या अभंगातील अजीवन तत्वांची जाण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी मागील एक वर्षापेक्षा जास्त काळापासून तुकाराम नीतीच्या माध्यमातून तुकोबांच्या अभंगांचा वर्तमान जीवनाशी अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न सुरु आहे. यातून वर्तमानातील तरुण, मध्यम वयाची आणि वृद्ध मंडळींनी हे अभंग नक्की वाचून आपले दैनंदिन जीवन आनंदी करावे. इथे कुणीही खचलेला, अडलेला, दुर्लक्षित राहू नये. त्यासाठी ही तुकाराम नीती आपण आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करूयात! जय तुकोबाराय!

# अध्यात्मिक क्षेत्राचे केंद्रबिंदू : शिऊरचे श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर



शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते या राज्यात अनेक संत होऊन गेले जगतगुरु तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य शिऊरचे श्री संत शंकरस्वामी महाराज. औरंगाबाद नाशिक महामार्गावर वसलेल्या श्री क्षेत्र शिऊर या गावात श्रीसंत शंकरस्वामी महाराज व त्यांचे सुपुत्र नारायणस्वामी महाराज यांचे भव्य दिव्य समाधी मंदिर आहे. वारकरी संप्रदायाचे प्रचार आणि प्रसाराचे कार्य करीत भक्तींचे विचार समाजातील सर्व लोकांच्या मनात रुजवत भागवत श्रवण करून मार्गशीर्ष वद्य अष्टमी शके १६६७ साली समाधी घेणारे श्री संत शंकरस्वामी महाराज यांचे पवित्र प्रणीता तीर्थाच्याच्याकडेला टोलेजंग समाधीस्थळ सध्या अध्यात्म क्षेत्राचे केंद्रबिंदु ठरत आहे.संतभूमी शिऊर येथे बांधण्यात आलेले १२८ फुटी मंदीर मराठवाड्यातील सर्वात मोठे मंदिर ठरले असुन अध्यात्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.**

औरंगाबाद -नाशिक 752 राष्ट्रीय महामार्गावार वसलेल्या वैजापूर तालुक्यातील शिऊर हे वीस हजार लोकसंख्येचे गाव. ऐतिहासिक , सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा जपणारे गाव अशी या गावाची ओळख आहे. त्यासोबतच मंदीरांचे गाव म्हणुन देखील शिऊर परिचित आहे. श्री संत बहीणाबाई पाठक, श्री संत शिवाई माता यांचे समाधी स्थळांबरोबरच जगतगुरु तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य श्री संत शंकरस्वामी महाराजांची समाधी देखील शिऊर गावी असल्याने भक्तीचा त्रिवेणी संगम येथे पहायला मिळतो.

**१२८ फुटी मंदीर मराठवाड्यातील सर्वात मोठे देखणे मंदिर** : श्री संत शंकरस्वामीं शके 1667 साली समाधीस्थ झाले त्यानंतर 1849 च्या दरम्यान, त्याकाळात प्रचंड नाणे टंचाई असताना भाविकांनी हातभार लावला होता. त्यावेळी मंदिराचे वाळु व चुणा एकत्र करत त्याला दगडी चाकाने रगडवून त्या मिश्रणातून दगडाचे बांधकाम केले होते. त्यानंतर वेळोवेळी त्यात पुर्नजिर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात येवून पुर्ण करण्यात आले. 2013 साली देखील नव्याने मंदीर बांधकामाचा निर्णय घेण्यात येवून तालुक्यातील सर्वपक्षीय पुढाऱ्यांच्या योगदानातून व भावीकांच्या देणग्यांच्या माध्यमातून मंदिर जर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात आले.मंदीरामध्ये विश्वस्त मंडळाचे कार्यालय,कीर्तनकार व प्रवचनकारांची राहण्याची सोय, अध्यात्म संस्कार केंद्र आदी व्यवस्था केली गेली आहे. या सोबत मंदिर परिसरात सुशोभीकरण करण्यात येत असून भव्य कीर्तन मंडप लक्षवेधी ठरला आहे श्री संत शंकरस्वामी महाराजांनी स्वतंत्र पंथ सुरू न करता समाज समानतेचा विचार करून तळागाळातील समाजास भक्ती मार्गाला लावण्याचे सांप्रदायिक कार्य केले. श्री क्षेत्र सराला बेटाचे सद्‌गुरू गंगागिरी महाराज हे देखील दर महिन्याच्या एकादशीला स्वामींच्या वारीला येत असत, श्री संत शंकरस्वामींचा आधिकार राज्यात मोठा असून स्वामींनी समाजाच्या उद्धाराकडे लक्ष दिले. सप्ताहाच्या माध्यमातून अन्नदान व ज्ञानदानाचा महाजागर करण्यात आला असून मन व बुद्धीचे शुद्धीकरण परमार्थमध्ये होते. वारकरी सांप्रदाय हा सगुण निर्गुणच्या पुढे असून संताच्या विचारात जगणे म्हणजेच सत्संग आहे.




श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या समाधी मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले असून शिऊरच्या वैभवात भर घालणारे हे भव्य मंदिर अध्यात्मिक क्षेत्राचे केंद्रबिंदू ठरले आहे. स्वामींच्या सप्ताहाची अध्यात्मिक अखंडीत सेवा असून यातून ज्ञानदान व अन्नदान घडत आहे. या परंपरेचा अभिमान आहे. भक्तीप्रेमाचा महासागर पंढरपूर मध्ये तर ज्ञानाचा महासागर आळंदी येथे बघायला मिळतो, वैराग्याचा देहू मध्ये शांतीचा महासागर पैठण येथे असून गुरु शिष्यांची परंपरा शिऊर येथे आहे.





## शेतकऱ्याचं जगणंही मान्य करा..

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून
'इंडियात' साखर पेरणी
'भारताचा' घोटून गळा
थडग्यांची पायाभरणी
टोमॅटो आणले नेपाळ वरून
कांद्यावर निर्यात शुल्क लावले
साखरेच्या निर्यात बंदीचे
फर्मान आज काढले
चौकीदार लुटतोय रात्रंदिन
करून देशभक्तीच्या बाता
जगणं झालं मुश्किल
काळया आईला लाथा
काँग्रेसला नावं ठेऊन
केलंय जनतेला इमोशनल
विरोधी पक्ष संपवले
केले ईडी कडून ब्लॅकमेल
धर्माची गोळी देऊन
हिंदू-मुस्लिम भिडवले
निवडणुकीवर ठेऊन डोळा
पुलवामा सुद्धा घडवले
जय जवान, जय किसान
नारा फक्त भाषणात
जवान मरतो सीमेवर
किसान जळतो म्हसणात
'इंडियाला' जगवा सुखाने
कूस भारत मातेची धन्य करा
'भारतालाही' जगू द्या सुखाने
शेतकऱ्यांचं जगणंही मान्य करा
ज्ञानेश्वर तासकर
रुई, ता. निफाड

## मोडकळीस आलेला जिना

आम्ही आयुष्यभर ज्यांचे साठी
"जिना" होऊन दिवस रात्र
जीवनाचे समर्पण समजून
दुसऱ्यांना उंचीवर नेण्यासाठी
अविरत उभे राहतो
वेदना सोसत सोसत
राबत असतो आयुष्य विकून.....
मात्र-
जिन्याचा वापर करून
उंचीवर पोहोचताच विसरतात
सहारा घेतल्याचा क्षण अन्
मोडकळीस आलेल्या जिन्याचे
रूप
कालांतराने अडगळ समजून
नकोसे वाटतात जीर्ण अवशेष
फेकून द्यावे असे वाटते त्यास.....
पण-
कधी स्मरणच होत नाही की,
याच जिन्याच्या सहाऱ्यानी
उंच शिखर गाठल्याचे
ज्यास निर्मिती आहे तो
नष्ट होणार एक दिवस
हे वास्तव सत्य कदाचित
जिना विसरला असेल......
परंतू-
त्या जिन्यास होणाऱ्या वेदना
जीर्ण अवशेषामध्ये एक वटून
आधाराची वाट पाहत असतो
आभागा तो बिचारा उगीच,
आस लावून उभा राहतो
येतील कधीतरी काठी होऊन
मला आधार देण्यासाठी !

डॉ.बलराज पांडवे
छ. संभाजीनगर
9511885093

## माझी माय बहीणाई

माझी माय बहीणाई, तुझी बोली अहिराणी...
कवितेची गोडी अशी, जसं नारळाचं पाणी...

माझी माय बहीणाई, सांगे संसाराचा सार...
म्हणे हाताला चटके, तव्हां मिळते भाकर...

झुंजूमुंजू होता होई, तुझ्या अंगणी पहाट...
डोळ्यापुढे येई तव्हां, तुझ्या माहेराची वाट...

तुझी कविता गं जणू, आहे बावण्णकशी सोनं,
माय मराठीला दिलं, तूच लावण्याचं लेणं...

माझी माय बहीणाई , कधी शाळेत ना गेली...
मग सांग मला माय, कसे सारे तू शिकली ?

माझी माय बहीणाई, मोठी गोड तुझी गाणी...
तुझ्या लेकिनं घातला, दंडवत हा चरणी...
दंडवत हा चरणी...

सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे परभणी
९८२३०६६६०६

## कपाशी

फट्टीफट्टीनं फिरे शेतकरी
वार्यासंगं झुलते कपाशी
म्हणे मन त्याचं
यंदा खाईन तुपाशी
सोनं शिवारात फिरे
गोड पानांशी बोले
ओल्या मातीच्या अंगावर
पावसाचा खेळ चाले
गुलुगुलु चालली वाही
मऊ झाली माती
औत चालता चालता
गाणी येई ओठी
डोळे फिरती चोहीकडे
दिसे शेत हिरवेगार
धरणीनं बघा आता
केला किती शिणगार
फळ लागो कर्मा
राहो बापा कृपा
मोडलं कर्जानं कंबर
यंदा होऊदे नफा
@ आनंदा वारांगणे सर
मोलखेडा ता सोयगाव



## गंगोत्री अन् काशी

नाही थांबत कधी तिचं पाऊल
नभीचे नक्षत्र जरी भूलती
इरादे बघून ऋतू प्रसवते
ही धरा तिज भोवती
कठोर-कर्तृत्वाने मखमली करते
ती खाच-खळगे, अन् वाटाही
त्या हिरकणीसाठी फुलतो
अवेळी तो ऋतूराजही
तीच माय, तीच मावशी
ती गंगोत्री अन् काशी!

धाडसी तिच्या पावलांत
कडाड् दामिनीचा
ब्रह्मास्त्र भेदणाऱ्या नजरेत
निर्धार; सूर्य माळण्याचा
सप्त सागर देती तिला
उसळत्या लाटांची सलामी
अनवट तिच्या बोलांची
आता चंद्रही गातो गाणी
कधी; भेटते ती कृष्णेतिरी
जसी ब्रह्मगिरीची कावेरी
ती मेघना, ब्रह्मपुत्रा
ही तीच गोमती, गोदावरी
सिंधू, झेलम, माही
हीच पूर्णा, अलकनंदा,
हीच भागीरथी, अलकापुरी
ही तीच यमुना, नर्मदा!

- मनोहर मंडवाले, कल्याण.

MANOHAR
MANDWALE

## चांद्रयान - 3

इस्त्रोच्या यशस्वी कामगिरीवर
भारतीयांना अभिमान तिरंगा फडकला चंद्रावर
उंचावली भारताची शान

आपण सर्व भारतीय या इतिहासाचे साक्षीदार
चांद्रयान तीन पोहचले यशस्वी चंद्रावर

वैज्ञानिकांची अफाट मेहनत
आज फळास आली आत्मविश्वासाचे पंख लावूनी
कामगिरी पार केली

साऱ्या जगात वाढला माझ्या भारताचा सन्मान
सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले इतिहासातील मानाचे पान

वैज्ञानिकांच्या कार्याला करूया मानाचा मुजरा
हाती तिरंगा घेवूनी उत्सव करूया साजरा

- रवींद्र व्ही. चालीकवार
जि.यवतमाळ मो.9011559106

## विक्रम हिंदुस्थानाचा

दाखवून दिले
सामर्थ्य सर्व विश्वाला
हिंदुस्थानाने गवसणी घातली
नव्या विश्व विक्रमाला
अपार मेहनत कष्ट जिद्दीने
दाखवून दिले सामर्थ्य जगाला
चंद्रयान चंद्राच्या दक्षिण
पृष्ठभागावर उतरून
तिरंगा तेथे रोवला
अंतराळात दबदबा
हिंदुस्थानाचा वाढला
हम भी कुछ कम नही
सामर्थ्य हिंदुस्थानाचे
आज जगाने बघितले
देश वासियांचे शास्त्रज्ञांचे
डोळ्यांचे पारणे आज
फिटले अंतराळात हिंदुस्थानाच्या
तिरंगा ध्वजाने आज आपले
सामर्थ्य दाखविले
विक्रम नावा सारखाच
विक्रम आज प्रस्थापित
झाला एका नव्या हिंदुस्थानाचा
आज उदय झाला
एका नव्या हिंदुस्थानाचा
आज उदय झाला
रवी दगू सगर
शिंगवे, ता. निफाड

## इस्रो शास्त्रज्ञ

भारतीय शास्त्रज्ञांना
माझा मानाचा मुजरा
येता प्रयत्नांना यश
खुले हसरा चेहरा....१

चांद्रयान मोहिमेचे
सार्थ झाले अभियान
कष्ट,जिद्द,अप्रतिम
चिकाटीचा अभिमान...२

तीन देशांचा महिमा
होता उत्तरेला खास
दक्षिणेत पाऊलांना
होता प्रगतीचा ध्यास...३

चार वर्षे परिश्रम
आले फलास अखेर
कर्तृत्वाने,कर्तव्याने
शान जपली चौफेर..४

वैज्ञानिक प्रगतीचा
जपू कृतीने वारसा
भारतीय प्रतिमेचा
नभी चमकू आरसा...५

यशोगाथा स्वाभिमानी
लाभे तिरंगा सन्मान
इस्त्रो शास्त्रज्ञ कष्टाळू
आहे विश्वात महान...६
सौ.प्रतिमा अरुण काळे

## रोप कपाशीचं

रोप कपाशीचं वर
आलं मातीस भेदून
जन्मोजन्मी हाच लढा
नित्य जगणं मरण
रोप इटुकलं छान
माने आभार देवाचं
जन्म देई काळी माय
करू सार्थक जन्माचं
आता कुठे त्यास फुटे
पान कोवळं तिसरं
बिजातून लढण्याचं
शिकविते रे वावर
काळ्या रंगाच्या मातीत
स्वप्न हिरवं उगलं
कपाशीच्या रे रोपानं
कसं बाळसं धरलं
आता कुठे जन्म झाला
खूप येणार संकट
कधी मावा टोळधाड
किडी लागे रे फुकट
आलो म्हणूनच आता
काम मोठे करतोच
देतो कापड जगास
पुण्य घेतो बहिणीचं
आता कुठे हमीभाव
थोडा माझा वाढला रे
दोन पैसे देवू वाटे
राबणाऱ्या हातास रे
ज्ञानेश्वर गायके,
कन्नड



## दयाघना...!

पड रे पावसा पड
पेरणी केली शेतात
आलेली हिरवी पिके
करपली काळ्या मातीत
तहाण क्षमविण्यास
पाण्याची टंचाई झाली
उपासमारीची वेळ
गुराढोरावर आली
पाऊस न पडल्याने
धरणे कोरडी पडली
हिरवी पिके करपून
दुष्काळाची चिंता वाढली
मागून-मागून केली
पावसाने मोठी घान
येणाऱ्या पिकांना दिला
शेवटी-शेवटी तान
हे ! दयाघना चोहीकडे
पडू दे पाणीच पाणी
शेती फुलवून कर रे
कुणब्याना आबादानी
- अय्युब पठाण लोहगांवकर
ता. पैठण मो. ९७६४३५०३७४



## इस्रोची कामगिरी...


ढगाआडून हळूच डोकावताना
सारं जग लख्ख प्रकाशमय करतोस
तुझ्या बालगीताची मैफील रंगताना
कधी झाडामागूनही हळूच हसतोस..
चांदोबा चांदोबा काय तुझी ख्याती
तुझ्या आकर्षणाची लागली बघ
भीती उगाच दिशांचे नकाशे
दाखवतोस काही गडबड झाली तर
सर्वांना रडवतोस.. तुला ना बोलता
येत ना सांगता येत तुझ्या भेटीची
आस जगाला लागली हजारो मैलांचा
प्रवास करताना भारताने चंद्रयानची
पताका आज रोवली.. माणसानेच
बनवलेलं एक यंत्र आहे शास्त्रज्ञांची
इथं मात्र रेलचेल असते जगाच्या
पाठीवर किती देश थकले
चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आज
चंद्रयान दिसते.. जगाच्या नकाशावर
नाव आता कोरलं तुझ्या सोबतीला
भारताने चंद्रयान ३ सोडलं
तुला भेटण्यासाठी ४१ दिन लागले
यशदायी कर्तुत्वानं डोळं भरून
आलं.. यशाची उंच शिखरे सर
करण्यासाठी इस्त्रोच्या कामगिरीने
देश भारावला जगाच्या इतिहासात
भारतानं तिरंग्याचा मान आज
फडकवला..
- दिलीप नामदेव धायगुडे

## आर्त.........

नको अंत पाहू मेघा
नको तू जीव घेऊ
बरसूनी जोरदार
घाल धरणीस न्हाऊ
होतं नव्हतं टाकलं
पिक जोमान उभारलं
तुझ्या ह्या रुसण्यांन
दुःख मनी दाटलं
गगनी येई नभ फार
तया नाही पान्हा फुटत
सुकलेली पिक बघून
तू नाही रे ओसंडत
रिमझिम बरसतो
जसा सलाईनचा मारा
विनवी तो शेतकरी
ये रे भरा भरा
शासन मारी दिन रात
मेघ राजा तू तरी सोड
करुनी शिवार जलमय
कर आम्हा वरी उपकार
© संदिप वाकडे पाटील
9766992776

## स्वछंद भरारी घे

स्वछंद भरारी घे आभाळ मुठीत घे
आवाज मनाचा सात समुद्रापार ने
आभाळ मुठीत घे..
स्वछंद भरारी घे...
अभिमानाने छाती दहाडु दे
हिंमतीला उचलून खांद्यावर
धावण्याला गती घेऊ दे ..
आभाळ मुठीत घे..
स्वछंद भरारी घे ...
पिळून निघू दे घाम
फेडेल मी पांग
कंबर कसून ये ध्येय जिंकून ने
आभाळ मुठीत घे..
स्वछंद भरारी घे..
लक्ष्मण वाल्डे -कन्नड
मो.नं-8888606068



# स्त्रियांमधील लैंगिक दोष

**आधुनिक केसरी**

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



पुरुषांप्रमाणे स्त्रियांमध्येही लैंगिक समस्या आढळतात. त्यामध्ये अंगातील गुळगुळीतपणा कमी होणे, कोरडेपणा येणे, लैंगिक भावना कमी होणे, पूर्णतः समाधान न होणे, प्रक्रियेमध्ये वेदना होणे अशा विविध समस्या महिलांमध्ये आढळतात. याची महत्त्वाची कारणं म्हणजे असमंजस जोडीदार संवादातील विसंगती, मनात भीती असणे. उदासीनता तणाव, काही मानसिक व्याधी, भूतकाळातील त्रासदायक आठवणी. रजोनिवृत्तीनंतर इस्ट्रोजेन हार्मोन्सच्या कमतरतेमुळेही स्त्रियांना समस्या जाणवतात. गर्भपिशवी व बीजांड काढल्यानंतरही या समस्या जाणवतात. रजोनिवृत्तीनंतर शरीरबांधणीविषयी असणारी असमाधानता सुद्धा याला कारणीभूत असते. यासंदर्भात जर योग्य काळजी घेतली तर स्त्रियांना या सर्व समस्यांमधून मुक्तता मिळू शकते. कोणती काळजी घ्यावी तर जोडप्यांमधील समंजसपणा वाढवणे. खुळ्या गैरसमजुतींवर विशवास न ठेवणे. न्यूनगंड न बाळगणे, नियमित व्यायाम, योगासनं करणे आणि आरोग्याविषयी योग्य माहिती ठेवणे अशा गोष्टी आपण करू शकतो. शिवाय एकांताचे छान वातावरण निर्माण करणे, व्यसनं सोडणे, स्वभावात बदल करून सुसंवाद वाढवणे, मूत्रजनन संस्थेशी निगडित आजार तसेच मानसिक आजार यावर योग्य औषधोपचार करणे अशी काळजी घेतली जाऊ शकते. योग्य डॉक्टरांच्या सल्ल्याने सेक्स प्रक्रियेदरम्यान लुब्रिकंटस्, क्रीम किंवा सेक्स आसनांमध्ये बदल या गोष्टी केल्याने सुद्धा बराचसा फरक पडू शकतो. ज्यांना ही समस्या उद्‌भवली आहे त्यांनी सर्वप्रथम आपल्या तणावपूर्ण जीवनातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा. क्रिया करताना स्टॉप-स्टार्ट तंत्र वापरावे. या समस्येवर अत्यंत गुणकारी आणि प्रभावी अशा गोळ्या, मलम उपलब्ध असून त्यांचा वापर तज्ज्ञ अशा सेक्सॉलॉजिस्टच्या सल्ल्यानुसार करावा.






**डॉ. विजय दहिफळे**
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248



# शिवाजी नागरी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील नावाजलेल्या शिवाजी नागरी सहकारी बँकेची ३४ वी सर्वसाधारण वार्षिक सभा माहेश्वरी मंगलकार्यालयात संपन्न झाली. सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी एजाज पठाण यांनी उपस्थित सभासदांसमोर सभेचे विषय कथन केले. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात बँकेने ८४ लाख १८ हजार नफा कमविला असून यावर्षी सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्यात आला.औरंगाबाद जिल्हाभरात बँकेच्या ४ शाखा कार्यान्वित झाल्या असुन नवीन फोन पे, पेटीयम, निप्टी, ई कॉम, सि.टी.एस, तसेच सभासद, खातेदारांना अधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून सभासद व ग्राहक यांच्या विश्वासहार्तेमुळे सभासदांना सतत ३३ वर्षापासून लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव अग्रगण्य बँक असल्याची ख्याती जिल्ह्यात निर्माण झाली असल्याची माहिती चेअरमन रवींद्र काळे यांनी मनोगत व्यक्त करताना दिली. यावेळी हरिपंडीत गोसावी (व्हा.चेअरमन) संचालक भाऊसाहेब औटे, रामचंद्र काळे,पृथ्वीराज चौहान, सतिष बलदवा, शंकरराव राऊत,दशरथ सोनवणे, पाशा धांडे,अशोक जाधव, ज्योती खांडेकर,सौ.तनुजा जाधव, अँड किशोर वैद्य, एन.व्हि शर्मा (C.A) डी.पी मोहीते, अरुन नरवडे, दत्तात्रय फटागडे, गणपत म्हस्के, संतोष राउत , सदाविजय पोशनगिर, रत्नदिप मुळे, जगदीश गोर्डे, कृष्णा काकडे,ईश्वर ढोकळे,दत्ता मोरे, बाळासाहेब दसपुते,पवन काळे, सौ. सुभद्रासोडंगे, सौ.रेवती, रांजणीकर, फौजदार जाधव, भाऊसाहेब कणसे,अबेद पठाण अशिष पवार व सभासद व ग्राहकांची उपस्थित होती.

# दप्तर गहाळ करणाऱ्या रोजगार सेवकावर अद्यापही गुन्हा दाखल नाही

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दप्तर गहाळ करणाऱ्या रोजगार सेवकावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश असताना तांडा कुंडाणे येथील ग्रामसेवकाने कारवाई करण्यास हलगर्जीपणा करत पंचायत समिती प्रशासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून अवमान केला आहे. त्यामुळे रोजगार सेवकाच्या भ्रष्टाचारावर पडदा टाकणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करावी अशा मागणीची निवेदन लोकशाही मराठी पत्रकार संघाच्या वतीने सहा. गटविकास अधिकारी रा. दा. वाघ. यांना देण्यात आले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून कामचुकारपणा करणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करण्यात येईल असे आश्वासनही यावेळी अधिकाऱ्यांनी दिला आहे. मौजे तांडा कुंडाणे येथे सन २०१२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत कार्यरत असलेले ग्रामरोजगार सेवक यांचे कडून म.ग्रा. रा.रो.ह .योजनेचे दप्तर तीन दिवसात संबंधित ग्रामरोजगार सेवक यांनी जमा न केल्यास म.ग्रा.रा.रो.ह. योजनेचे दप्तर गहाळ केले आहे. असे गृहीत धरून संबंधित ग्रामरोजगार सेवक यांच्यावर पोलिसात ३ दिवसाच्या आत दप्तर गहाळ केले बाबत गुन्हा दाखल करावा.



केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ७ दिवसाच्या आत सादर करावा. गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्यास आपणावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असे दिनांक १०-०३-२०२३ रोजी मा.रा. दा. वाघ गटविकास अधिकारी पंचायत समिती धुळे यांनी पत्रातून नरेंद्र अहिरे ग्रामसेवक ग्रामपंचायत तांडा कुंडाणे यांना आदेशीत केले होते. मात्र पाच महिने उलटूनही ग्रामसेवक यांनी दप्तर गहाळ करणाऱ्या रोजगार सेवकावर गुन्हा दाखल केला नाही व कारवाई संदर्भात कुठलाही अहवाल पंचायत समिती प्रशासनाला दिला नाही. ग्रामसेवक यांनी संबंधितांना पाठीशी घालत पंचायत समिती प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल आहे. चौकशीत तांडा कुंडाणे येथील म.ग्रा.रा.रो.ह.योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे उघड झाला आहे. रोजगार सेवकाने दप्तर गहाळ केले आहे.त्यामुळे याबाबत गुन्हा दाखल करून अहवाल देण्यात यावा.व कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित ग्रामसेवकावर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कारवाई करावी च्या अशा मागणीची निवेदन पंचायत समितीचे गट विकास अधिकारी रा. दा. वाघ यांना देण्यात आले आहे. दप्तर गहाळ करणाऱ्या रोजगार सेवक व कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ग्रामसेवक यांच्यावर कारवाई न झाल्यास आमरण उपोषण करण्यात येईल असा इशाराही लोकशाही मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने देण्यात आला आहे.



# खुलताबादेत पोलिसांकडून शहिदांच्या कुटुंबाचा झाला गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** देशाच्या अभियानांतर्गत खुलताबाद येथे शहिदांच्या कुटुंबांचा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, मेरी माटी मेरा देश पोलिस प्रशासनाच्या वतीने स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार यांचा गौरव सोहळा पार पडला.

या सोहळ्यात शहिदांच्या कुटुंबासह माजी सैनिक सेवानिवृत्त पोलिस अधिकारी - कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कन्नड व खुलताबाद अशा दोन तालुक्यांचा आतापर्यंतचा पहिला भव्य सत्काराचा कार्यक्रम येथे पहिल्यांदाच पार पडला. पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या सूचनेनुसार उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक भुजंग हातमोडे यांनी केलेल्या प्रयत्नाने शुक्रवारी दि २५ खुलताबाद येथील भक्तनिवास सभागृहात हागौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात उपविभागीय पोलिसअधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, पोलिस निरीक्षक भुजंग, कन्नड शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक बाळासाहेब भापकर, सहायक पोलिस निरीक्षक अमोल ढाकणे,पोलिस उपनिरीक्षक संतोष भालेराव, पिशोर ठाण्याचे उपनिरीक्षक रतन डोईफोडे, कन्नड - ग्रामीण ठाण्याचे उपनिरीक्षक राम बारहाते यांच्यासह गोपनीय शाखापोलिस हेडकॉन्स्टेबल के. के.गवळी, सुहास डबीर, राकेश आव्हाड, पोलिस नाईक उत्तम खटके आदींची याप्रसंगी उपस्थिती होती.





# सैनिक व इस्रो शास्त्रज्ञांना राखी भेट

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारताने नुकतेच चंद्रावर पाऊल ठेवून देशाची मान उंचावली आहे तर दुसरीकडे सिमेवर सैनिक खडापहारा देवून रक्षणाची जबाबदारी पार पाडत आहेत. याचे औचित्य साधून भोकर आगारातील महिला व कर्मचाऱ्यांनी शूक्रवारी (ता.२५)शास्त्रज्ञ व सैनिकांना राखी पाठवून अनोखा उपक्रम राबवीला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेडच्या वतीने भोकर आगारा तर्फे येथील बसस्थानकात एक राखी सैनिक व ईस्त्रो शास्त्रज्ञासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी वाहतूक नियंत्रक संदेश गुडमेवार होते.व्यासपीठावर पोलिस उपनिरीक्षक राम कराड, सिमा सूरक्षा दलाचे जवान बालाजी दवणे, गोविंद घिसेवाड यांची उपस्थिती होती. यावेळी स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षा निमित्ताने पश्चिम बंगाल येथील सीमेवरील जवानाना (७५ राख्या) आणि नुतेच भारताने चंद्रावर पाऊल ठेवून अनोखा विक्रम केला आहे.ईस्त्रो शास्त्रज्ञांना बंगलूर येथे डाकव्दारे महिला कर्मचाऱ्यांनी राख्या पाठवल्या आहेत. उपस्थित मान्यवर आणि प्रवाशांना ही राख्या बांधण्यात आल्या आहेत. रक्षाबंधन अगदि तोंडावर येऊन ठेपले असताना याचे निमित्त साधून आगारानी प्रवाशाना सुखकर प्रवास देण्यात व्यस्त असताना सामाजिक बांधिलकी जोपासत हा आगळावेगळा उपक्रम राबविल्याने सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. सूत्रसंचालन वरीष्ठ लीपिक एस.एस. चटलावार यांनी करून आभार मानले. कार्यक्रमास आगारातील महिला व कर्मचारी याची बहूसंख्य ऊपस्थिती होती.

> आम्ही ईकडे अगदी सुखरूप आहोत याच सर्व श्रैय सिमेवर खडापहारा देणाऱ्या सैनिका जात . कुठल्याही सण ऊत्सवात त्याचा सहभाग नसतो .म्हणुन सीमेवरील "मेरे प्यारे भैया" सैनिकास राखी पाठवत आहे .याचा स्विकार करावा .
> (कुमारी भाग्यश्री बिरगाळे,भोकर)

# दक्षिण मध्य रेल्वेच्या आठ गाड्यांना मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** दक्षिण मध्य रेल्वेने सुरू केलेल्या आठ विशेष रेल्वे गाड्यांना मुदतवाढ दिली आहे. त्यात अकोला मार्गे धावणाऱ्या दोन रेल्वेचा समावेश आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या विशेष गाड्यांना प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळात आहे. त्यामुळे या गाड्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला.

या मार्गावरील अतिरिक्त गर्दी दूर करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने गाड्यांच्या फेऱ्या वाढवल्या आहेत. ०७०५३ काचीगुडा – बिकानेर विशेष गाडी दर शनिवारी ०२ ते ३० सप्टेंबरपर्यंत धावणार आहे. ०७०५४ बिकानेर-काचीगुडा विशेष गाडी दर मंगळवारी ५ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत धावेल. ०७११५ हैदराबाद-जयपूर सुपरफास्ट विशेष गाडी दर शुक्रवारी ०१ ते २९ सप्टेंबरपर्यंत धावेल. ०७११६ जयपूर- हैदराबाद सुपरफास्ट विशेष गाडी दर रविवारी ०३ सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबरदरम्यान धावणार आहे. या गाड्यांना मिळालेल्या मुदतवाढीमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.





# उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांची अतिशय महत्त्वाची बैठक शिवसेना शाखा नवीन शेवा उरण येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सदर बैठकीला शिवसेना उपनेते व कोकण समन्वयक विजय कदम व शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार मनोहरशेठ भोईर हे प्रमुख मार्गदर्शक होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपनेते विजय कदम म्हणाले की, 2024 ला उरण विधानसभा मतदारसंघात मनोहरशेठ भोईर यांना पुन्हा एकदा आमदार करण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे व पक्षाकडून ज्या सूचना दिल्या त्या पद्धतीने काम करावे. त्यामध्ये सोशल मीडिया, नवीन मतदान नोंदणी करणे व केलेल्या कामांचा प्रचार करणे या सर्व गोष्टींकडे पदाधिकारी यांनी जातीने लक्ष देऊन काम करावे , सर्वांनी आळस झटकून पुन्हा एकदा मोठ्या जोमाने काम करून भोईर साहेबांना आमदार करण्यासाठी सज्ज राहावे असे त्यांनी आवाहन केले, तर माजी आमदार मनोहरशेठ भोईर म्हणाले की, 2014 ला आपण सर्वांनी मला आमदार केले परंतु दुर्दैवाने आपल्या सर्वांच्या हलगर्जीपणामुळे 2019 ला आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले. यावेळी कुठलीही चूक न करता 2024 ला सर्वांनी शिवसेनेचा उमेदवार हा कोणीही असला तरी आमदार करण्यासाठी सज्ज व्हावे व पक्षाने ज्या शिस्तीने किंवा ज्या पद्धतीने आपल्याला काम करण्याचे आदेश दिलेले आहेत त्या चौकटीत राहून सर्वांनी कामाला लागून उरण विधानसभेवर भगवा फडकवायचा आहे असे त्यांनी सर्वांमध्ये विश्वास निर्माण केला. यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, उपजिल्हा संघटिका ममता पाटील यांचेही मार्गदर्शनपर भाषणे झाली, तर सूत्रसंचालन उरण उपतालुका संघटक के एम घरत यांनी केले.

# माजी सरपंच ओंकार टिकारे अनंतात विलीन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील माजी सरपंच ओंकार सुखदेव टिकारे वय ७३ वर्ष यांचे दीर्घ आजारपणात शुक्रवारी प्राणज्योत मावळली. मागील काही वर्षांपासून पॉरालेस या आजारपणामुळे ओंकार टिकारे आजारी होते. सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात राजकीय क्षेत्रात त्यांनी खूप मोठा दबदबा निर्माण केला होता व त्यांचे मोठा टिकारे परिवारआज गावात आहे ते विशेष होते. माघील दहा वर्ष त्यांनी सावळदबारा गावाचे सरपंचपदी कार्यरत होते. खासगी डॉक्टर कडून त्याचावर उपचार सुरु होते. त्यांचे दुपारी ४:१५ वा. उपचारादरम्यान मृत्यू झाले. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या शेतात दि.२६/८/२३ शनिवार रोजी सकाळी दहा वाजता अंतिमसंस्कार करण्यात आले. रावसाहेब दानवे यांनी पार्थिवावर पुष्पहार अर्पण केले. यावेळी इद्रीस मुलतानी, सुरेश बनकर, ज्ञानेश्वर मोठे पा, जयप्रकाश चव्हाण, बंडू काळे, परिसरातील अनेक गावकरी यांनी सुद्धा श्रद्धांजली अर्पण केली. ओंकार टिकारे यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,पुतने, सुना, नातवंडे व विनोद टिकारे भाजपा उपाध्यक्ष सोयगाव तालुका यांचे ते काका होते. आज संपूर्ण सावळदबारा शोककळा पसरली आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# राज्य-राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी निकषांप्रमाणे अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू करावी

## ॲड. सूर्यकांत शहाजीराव सांडसे पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी या तालुक्यातील शेतकऱ्यांना राज्य/ राष्ट्रीय आपत्ती निवारण निकषाप्रमाणे अनुद्येय अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू करणेबाबत ॲड. सुर्यकांत शहाजीराव सांडसे पाटील यांनी निवेदनाद्वारे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्याकडे केली आहे.

पावसातील खंड व अल्प पावसामुळे वाशी तालुक्यातील खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यात सरासरीपेक्षा खुप कमी पाऊस पडला असून अनेक प्रकल्पातील पाणीसाठयाने देखील तळ गाठला आहे. झालेला पाऊस देखील नियमित नसून बहुतांश भागातील ३ आठवड्यापेक्षा अधिकचा खंड पडला आहे. यामुळे पिके सुकू लागली असून उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. जिल्हा सनियंत्रण समितीच्या आदेशान्वये कृषी व विमा कंपनीचे पंचनामे सुरू आहेत.त्यातही वाशी तालुक्याचा समावेश नाही.अनेक भागात ५०% पेक्षा अधिकचे नुकसान दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी चिंतातूर असून मदतीच्या प्रतीक्षेत आहे.

तरी राज्य/राष्ट्रीय आपत्ती निवारण निकषाप्रमाणे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाल्यास अनुदान देण्याची तरतूद आहे. राज्याचे लोकनेते उपमुख्यमंत्री मा.ना. अजित दादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सतत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा असतो ही तालुक्यातील शेतकऱ्यांची भावना आहे. या अनुषंगाने वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांना राज्य/राष्ट्रीय आपत्ती निवारण निकषाप्रमाणे अनुद्येय अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू करावी अशी विनंती अजितदादा गटाचे वाशी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष ॲड. सुर्यकांत शहाजीराव सांडसे पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



आधुनिक केसरी

लय भारी

# सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



## पापडाचा इन्स्टंट दहिवडा

**साहित्य :** 10..12 पापड , अर्धा लिटर दही , चिमूटभर सोडा ,मीठ ,साखर ,2..3 हिरव्या मिरच्या ,कोथिंबीर ,लाल तिखट ,डाळिंबदाणे ,चाट मसाला ,मिरपूड ,तेल
सजावटीसाठी हिरवी चटणी .


**कृती :** प्रथम पापड थोडे तुकडे करून मिक्सर मधून फिरवून पावडर करून घ्यावी .नंतर त्यात पाणी घालून भज्याच्या पिठापेक्षा किंचित घट्ट भिजवावे.

दही एका बाउल मध्ये काढून त्यात 3 चमचे साखर, चिमूटभर मीठ , मध्ये उभ्या चिरून हिरव्या मिरच्या ,अगदी किंचित आले खिसून घालावे मग ते सर्व एकजीव होण्यासाठी छान फेटावे व् हे तयार दही थंड होण्यासाठी फ्रीझ मध्ये ठेवावे. गॅसवर कढईत तेल घालून ते गरम करण्यास ठेवावे आता पिठात चिमूटभर सोडा घालून ते भरपूर फेटावे. त्याचे लहान लहान वडे तेलात सोडुन छान तळून पाण्यात टाकून त्यातील तेल गेले की हलकेच दाबून पिळावे व काढून ठेवावेत. सर्व वडे तळून झाले की सर्व्हिंग बाउलमध्ये काढून त्यावर दही घालावे.मग त्यावर थोडे तिखट, मिरपूड, चाट् मसाला भुरभुरावा मग डाळिंब दाणे ,कोथिंबीर व हिरवी चटणी घालून सजवावे. आवडत असेल तर बारीक शेव घालून थंडगार दहिवडे सर्व्ह करावेत.

**वैशिष्ट्य :** या दहिवड्यासाठी डाळ भिजवणे, वाटणे हे सर्व वाचते त्यामुळे वेळ आणि कष्ट दोन्ही खूप कमी लागतात आणि टेस्ट तर अगदी तशीच लागते. यासाठी उडीद किंवा मुगाचे कोणतेही पापड चालतात. मुगाचे घेतले यर त्यात पीठ करतानाच थोडे मिरे घालावेत. पापडापासून बनलेले हे इन्स्टंट दहिवडे सर्वांना नक्कीच आवडतील.

# शककर्ते शिवराय ग्रंथाच्या माध्यमातून शिवचरित्र घराघरात पोहोचणार : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** शककर्ते शिवराय हा ग्रंथ म्हणजे राष्ट्राच्या निर्माण कार्यात एक मजबूत विट लावण्याच काम हे या पुस्तकाच्या रुपात होत आहे. शिवचरित्राचे गाढे अभ्यासक, संशोधक विजय देशमुख यांच कार्य हे अतिशय मोलाचे कार्य असून शककर्ते शिवराय या ग्रंथाच्या माध्यमातून शिवरायांच चरित्र हे घराघरात पोहोचेल हे बाबासाहेब पुरंदरे यांच स्वप्न या निमित्याने पुर्ण होत असल्याचे मत महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. छत्रपती सेवा प्रतिष्ठान च्या वतीने चंद्रपूर वन अकादमी परिसरातील सिद्धांत हॉल येथे शककर्ते शिवराय या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शिवकथाकार विजय देशमुख लिखीत शककर्ते शिवराय या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीसह राजा शंभू छत्रपती व सूर्यपुत्र या पुस्तकांचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सांस्कृतिक कार्य मंत्री मुनगंटीवार यांच्यासह छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूरचे अध्यक्ष अजय विजयराव देशमुख, चंद्रपूर उपासना केंद्राचे अध्यक्ष राजू वेलंकीवार, संजय देशकर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना मुनगंटीवार यांनी विजयराव देशमुख यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने मागील वर्षी पद्म पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती, परंतू काही कारणास्तव हा पुरस्कार तेव्हा देता आला नाही. परंतू त्यांच्या या अतुलनीय कार्याचा गौरव निश्चितच करण्यात येईल असा मनोदय व्यक्त करीत ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहीती दिली. सिंदखेडराजा येथे २५० कोटींचा प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पात आई कशी असावी याचा आदर्श या प्रकल्पात दिसेल असेही मत यावेळी व्यक्त केले.
छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी शककर्ते शिवराय या ग्रंथाच्या निर्मितीचा संपूर्ण प्रवास आपल्या प्रस्तावनेतून उपस्थितांसमोर मांडला. चंद्रपुरकरांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभलेल्या अतिशय नियोजनबद्ध अशा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुर्वा पुराणिक तथा आभार प्रदर्शन मैत्री वेलंकीवार यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चंद्रपूर केंद्राच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

# तंटामुक्ती अध्यक्ष पदी नारायण पवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**धर्माबाद :** तालुक्यातील सिरजखोड रामपूर रामेश्वर गट ग्रामपंचायतमधील युवा नेतृत्व नारायण पाटील पवार यांची महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.त्याबददल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नारायण पाटील पवार यांनी गावातील नागरिकांसाठी केलेल्या समाज हिताचे कार्य लक्षात घेऊन व गेल्या अनेक वर्षापासून नारायण पाटील पवार हे सिरजरसखोड रामपूर रामेश्वरम गट ग्रामपंचायत मधील गावातील सर्वसामान्य लोकांचा हितासाठी सदैव प्रयत्न करीत आहेत व सर्वसामान्यचे प्रश्न सोडवण्याचा सदैव प्रयत्न करीत आहेत गावातील लोकांचे झालेले तंटे गावातच कशी मार्गी लावता येथील असे कसोटीने प्रयत्न असल्यामुळे याच कार्याची दखल घेऊन गावातील नागरिकांनी नारायण पाटील पवार यांच्यावर तंटामुक्ती अध्यक्षाची जबाबदारी टाकण्यात आली आहे महात्मा गांधी तंटामुक्तीची नवीन कार्यकारी निवड समस्त गावकऱ्यांच्या वतीने निवड करण्यात आली आहे नारायण पाटील पवार यांना सर्व स्तरावरून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.




# अतुल सावे यांचे हस्ते भूमिपूजन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन -४ मधिल समई गार्डन जवळील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन अतुलजी सावे ( गृहनिर्माण , इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य ) यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी माजी उपमहापौर प्रमोद राठोड, माजी नगरसेविका माधुरी देशमुख अदवंत, जीवन औंदल, प्रतिक शिरसें माजी नगरसेविका किवळेकर, बालाप्रसाद इंदाणी यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी नगरसेविका माधुरी देशमुख अदवंत म्हणाल्या आपले मंत्री महोदय अतुलजी सावे यांनी आपल्या वार्डाच्या असंख्य समस्या सोडवून आपणास मदत केली आहे. उपमहापौर प्रमोद राठोड म्हणाले शहरातील इतर भागा पेक्षाही आपल्या प्रभागात अधिक लक्ष देवून अनेक दर्जेदार सिमेंटचे रस्ते बांधून दिलेले आहेत.
मंत्रीमहोदय अतुलजी सावे हे बोलताना म्हणाले एन -३ ,एन -४ या भागातील उच्च शिक्षित नागरिकांनी माझ्या कडे वेळोवेळी आणलेल्या समस्या नेहमीच सोडलेल्या आहेत. पाणी समस्या सोडवण्यासाठी यापूर्वी १६८० कोटी रुपयांची नळयोजना मंजूर आणून तीचे निराकरण केलेले होते पण आमचं मंत्री मंडळच बदलल्याने ती योजना पूर्ण झाली नाही. तरी आम्ही खचलो नाही.आज आमचं मंत्री मंडळ आल्यावर नव्या उत्साहाने ती छत्रपती संभाजी नगरची पाणीपुरवठा योजना पूर्ण होणारं आहे. नव्या वीस जलकुंभापैकी बहुतेक जलकुंभ पूर्णत्वाकडे आहेत. आपल्या छत्रपती संभाजी नगर मधे डिसेंबर अखेरपर्यंत या जलवाहिनीचे पाणी मिळेल असाच आमचा प्रयत्न राहील.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिडको एन-४ मधिल सर्व रहिवासांच्या वतीने श्रीकांत अक्कलकोटकर व स्मिता अक्कलकोटकर यांच्या हस्ते मंत्रीमहोदय अतुलजी सावे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.
भूमिपूजनाचा हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर , अरविंद मुळे , ज्ञानेश्वर कुलकर्णी , संजय डोणगावकर , अश्वनी खुल्लर , अरविंद कुलकर्णी , संगीता धानुरे , देवश्री पाठक , ज्योती धायतडक , रेणुका कुलकर्णी , अनिता झिंगाडे , शारदा झिंगाडे यांनी मोलाची मदत केली.

# बँकेला टाळे ठोकण्याचा माजी सरपंच विलास व्हटकर यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील शेतकरी सध्या पाऊस नसल्याने आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम कर्जखात्यात वर्ग न करता किंवा कपात न करता सरसकट शेतकऱ्यांना अदा करण्यात यावी, सीबील, वयाच्या अटींचे कारण देत कृषिकर्ज वाटप करण्यास टाळाटाळ करू नये अन्यथा बँकेला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर यांनी आज निवेदनाद्वारे केले आहे. गुंजोटी, औराद, नागराळ, पळसगाव, कसगी, कदेर, मुरळी, भुसनी, गुंजोटीवाडी, कसगीवाडी, महाराणा प्रताप नगर, निशारी तांडा, धनगरवस्ती येथील शेतकऱ्यांसाठी दत्तक बँक म्हणून काम करणाऱ्या गुंजोटी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक, भारतीय स्टेट बँकेला निवेदन देण्यात आले.

यावेळी गुंजोटीचे माजी सरपंच विलास शरणप्पा व्हटकर, गुंजोटी शिवसेना शाखाप्रमुख विजय शिंदे, विजय स्वामी, माजी ग्राप सदस्य दशरथ देवकते, गुंजोटीवाडी युवासेना शाखाप्रमुख शरद लवटे, औराद युवासेना शाखाप्रमुख प्रवीण जाधव, प्रवीण शिंदे, शरद शिंदे, विशाल व्हटकर, स्वप्नील कटकधोंड, विक्रम व्हटकर, शेखर कटकधोंड, पंडित माशाळे, सूरज माने, रमेश सूर्यवंशी यांच्यासह गुंजोटीसह परिसरातील शेतकरी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्रीक्षेत्र चारठाणा ते श्रीक्षेत्र औंढा नागनाथ कावड यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील पुण्य पावन संत भूमीतील ग्रामदैवत श्री संत जनार्दन महाराज व पुरातन हेमांडपंथी महादेव मंदीर कृपाअशिर्वादाने चारठाणा व परिसरातील सर्व ठिकाणी सुख समाधान, शांती लाभो, शेतकऱ्यांची खरीप हंगामातील सर्व पिके भरभरुन उत्पादन व्हावीत याकरीता दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सर्व भाविक भक्ताच्या वतीने दि.२६ शनिवार रोजी क्षेत्र चारठाणा ते श्रीक्षेत्र औंढा नागनाथ (हिंगोली) पायी भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले.

या कावड यात्रेचे पुजन बसवेश्वर चौक पेठ विभागात येथील ओबीसी नेते नानासाहेब राऊत व हभप बापुराव महाराज जाधव यांच्या हस्ते करून प्रस्थान करण्यात आले. यावेळेस भरत राऊत, प्रल्हाद पातरफळे, अण्णासाहेब राऊत, गणेश राऊत, सर्जेराव देशमुख, दिनकरराव देशमुख भारत तोडकर, आश्रया स्वामी, तहेसीन देशमुख, भिमा कटारे, किसन मस्के, दगडु गवारे, विनोद पत्की,गजानन करसकर यांच्यासह आदी मान्यवर गावकरी उपस्थित होते. ही कावड यात्रा पायी चालत जाऊन दि.२८सोमवार श्रावण महिन्याच्या दुसरा सोमवारी रोजी सकाळी श्री क्षेत्र औंढा नागनाथ येथील( महादेव) नागेश्वर भगवानाला जलधारा, गंगाजल अर्पण सामूहिक अभिषेक करण्यात येणार आहे. भारत तोडकर, कैलास राऊत, देशमुख (भोगाव)याच्या वतीने या कावड यात्रेला अन्नदान करण्यात येणार आहेत. या कावड यात्रेत सुरेश तमशेटे, अशोक गजमल, पत्रकार संघ अध्यक्ष प्रभाकर कुर्हे, सुधाकर क्षिरसागर, शिवशंकर तमशेटे, कैलास राऊत, दिपक गजमल, रामकिशन



मस्के, मुकुंद भाग्यवंत, बाबासाहेब मेहेत्रे, सोमनाथ क्षीरसागर, गणेश क्षिरसागर, जनार्दन राऊत, राजु तमशेटे, शकंर कटारे, शिवशंकर स्वामी, नारायण तमशेटे, सूर्यकांत क्षिरसागर, संतोष गवारे, रवि क्षीरसागर, रामेश्वर क्षिरसागर, विठ्ठल तुरे, कालिदास पांचाळ, रुद्रा क्षिरसागर, संतोष क्षिरसागर, यांच्यासह येथील परिसरातील शकडोच्या संख्येने शिवशंकर भक्ताचा या कावड यात्रेला सहभागी झाले आहेत थोडेच या कावड यात्रेचे चारठाणा, जोगवाडा, रायखेडा, जिंतूर, भोगाव (देवी), रामेश्वर, गोळेगाव, औंढा नागनाथ या सर्व ठीकाणी जंगी स्वागताचे अयोजन करण्यात आले आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 65वा वर्धापन दिन उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 23 ऑगस्ट रोजी राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय व राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय व सद्‌गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद 65वा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठ वर्धापन दिन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन माननीय साईनाथ पाटील जाधव साहेब हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. व्यंकटेश लांब सर (इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड) हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. व्यंकटेश लांब सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मा.साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष साहेबांचे स्वागत प्राचार्य डॉ. घुगे सर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. लांब सर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाविषयी अतिशय सखोल मार्गदर्शन केले. शेवटी अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका ठाकूर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीतांने झाली. मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी संदिप जाधव सर,प्राचार्य डी. डी. घुगे सर,शाळेचे मुख्याध्यापक खैरनार सर, प्रा. तुकाराम जाधव सर, प्राध्यापिका ठाकूर मॅडम, प्रा. नलावडे सर, प्रा. फुलारे सर, प्रा. अमोल जाधव सर, हारदे सर, सोनवणे सर हे उपस्थिती होते.

# लाचखोर गटविकास अधिकारी फरार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** तेंदू पानाच्या वाहतुकीकरिता नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी १ लाख ३० हजारांची लाच मागणाऱ्या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. तर कारवाईची चाहूल लागताच अहेरी पंचायत समितीचा लाचखोर प्रभारी गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार फरार झाला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तालुका पेसा समन्वयक संजिव येल्ला कोठारी (४२) व अनिल बुधाजी गोवर्धन (३०) या खाजगी व्यक्तीचा समावेश आहे. तक्रारदाराने अहेरी तालुक्यातील गोविंदगाव येथून तेंदुपानाच्या वाहतुकीसाठी अहेरी पंचायत समितीमध्ये नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. दरम्यान प्रभारी गट विकास अधिकारी प्रतिक चन्नावार याने कार्यालयातील कंत्राटी पेसा समन्वयक संजिव कोठारी व अनिल गोवर्धन यांच्या मार्फत १ लाख ३० हजाराच्या लाचेची मागणी केली. मात्र, लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने यासंदर्भात लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली. संपूर्ण पडताळणीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अहेरी येथे सापळा रचून आरोपींना लाच घेताना अटक केली. दरम्यान कारवाईची चाहूल लागताच प्रभारी गट विकास अधिकारी चन्नावार फरार झाला. याप्रकरणी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार अधिकाऱ्याचा शोध घेण्यात येत आहे.

# माडग्याळमधील शेतकऱ्यांचा पाण्यासाठी आक्रोश

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** तालूक्यातील दुष्काळ म्हणजे पाचविलाच पुजलेला... गेली दोन तीन वर्षे चांगला पाऊस झाल्याने फारशी झळ पोचली नव्हती मात्र यंदा परत पावसाने हुलकावणी दिल्याने दुष्काळाचे सावट पसरलेले आहे. माडग्याळ पासून काही अंतरावरुनच म्हैसाळचा कालवा सोलापूर जिल्ह्यात गेला आहे. पण या भागातील ६५ गावांना या कालव्याचा काहीच फायदा नाही. वेळोवेळी मागणी करुनही सरकार देखील या भागातील लोकांचे म्हणणे ऐकण्यास तयार नाही. ज्या ज्यावेळी या भागातील लोकांनी पाण्यासाठी आंदोलनाचा किंवा कर्नाटकात प्रवेश करण्याचा पवित्रा घेतला त्यावेळी कोणीतरी मंत्री-संत्री येतात आणी आश्वासनाचा भडीमार करुन जातात पण गेली 40 वर्षापासून या भागातील जनतेचा पाण्यासाठीचा संघर्ष संपलेला नाही.

याला पर्याय म्हणूनच सरकारवर अवलंबून न राहता माडग्याळचे सरपंच, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य महादेव माळी, जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश जमदाडे, विठ्ठल निकम, लिबांजी माळी यांनी लोकवर्गणीतून हा प्रश्न सोडवला जाऊ शकतो या भावनेने पुढील वाटचाल केली. याबाबत सांगलीचे खासदार संजय काका पाटील यांची भेट घेत चर्चाही



केली. संजयकाका पाटील यांनी या कामासाठी आपल्या फंडातून बारा लाख रुपयांची तरतुदही करुन दिली. संजयकाका पाटील व प्रकाश जमदाडे यांनी पुढाकार घेत म्हैसाळ योजनेचे मुख्य अभियंता यांच्याकडून पाणी देण्यास ना हरकत दाखला ही मिळवून दिले. मात्र मुख्य अडचण होती ती चार खुदाई करण्यात येणाऱ्या जमिनीची. ही जमिन महाराष्ट्र सरकार वनविभाग खात्याच्या अखत्यारीत येत असल्याने त्यांची मान्यता आवश्यक होती. याबाबत गेली पाच महिन्यापासून सांगली कार्यालयास हेलपाटे देखील मारली जात आहेत. मात्र वनविभाग खात्याकडून कोणतीच कारवाई अगर दखल घेतली गेली नाही. अखेर खासदार संजयकाका पाटील यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याशी बैठक लावत खुदाईस हिरवा कंदील दिला. लगेच जागेवर खुदाईसाठी मशीनरी देखिल आल्या मात्र वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी चालू कामात खोडा घालत काम थांबवले आणी माडग्याळ सह सोन्याळ, उटगी उमदी पर्यंतच्या शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले गेले. उजाड डोंगराळ माळरान असलेल्या आणी पाण्यासाठी खुदाईने कोणतीच नुकसान होत नसले तरी कागदोपत्री खोडा घालत वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी अक्षरशा कामाच्या ठिकाणी ठिय्या मांडला व काम बंद पाडले. बंदीस्त पध्दतीने पाईपलाईन केली जाणार असली तरी लोकांच्या भावना व त्यांची पाण्यासाठीचा संघर्ष याची कोणतीच जाणीव नसलेल्या निष्ठुर अधिकाऱ्यांनी काम चालू देणार नसल्याचे सांगितले. यावेळी लोंकाच्या अश्रू अनावर झाल्या. काही शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या बुटाचे पाय धरले व आम्बाला पाणि द्या तुमच्या पाया पडतो अशी केविलवाणी प्रार्थना केली पण अधिकारी ठस की मस झाले नाहीत. शेतकऱ्यांनी मात्र यावेळी आक्रोश केला. सरकार नेमके आमच्याकडून काय अपेक्षा करीत आहे. आम्ही जगावे की मरावे, सरकार कामासाठी निधी देत नाही शेतकऱ्यांच्या व जनतेच्या लोकवर्गणीतून काम करण्यास परवाईही देत नाही मग नक्की सरकारला काय पाहिजे आहे आम्ही मराठवाडा -विदर्भातील शेतकऱ्यांसारखे आत्महत्या करावेत असे सरकारला वाटते का असा संतप्त सवाल लोकांनी केला.

गेली ४० वर्ष पाण्यासाठीचा संघर्ष आज संपेल या आशेने कामाकडे आस लावून बसलेल्या फक्त माडग्याळच नव्हे तर त्याचबरोबर ८ गावातील लोंकाची पुन्हा एकदा निराशा केल्याबद्दल सरकारचे मात्र लोंकांनी त्रिवार अभिनंदन केले.

# गाडीचा टायर फुटून अपघात, तीन ठार

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** पुणे बंगळुरू महामार्गावर सातारा शहराच्या हद्दीत मुंबईहून जयसिंगपूरला जाणाऱ्या गाडीचा टायर फुटून उभ्या असणाऱ्या दुसऱ्या गाडीवर जाऊन आदळून झालेल्या अपघातात तीनजण जागीच ठार, तर चारजण जखमी झाले. जखमींना तातडीने सातारा येथील क्रांतिसिंह नाना पाटील शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

हा अपघात एवढा जोरदार होता की यामध्ये तीनजण जागीच ठार झाले, तर इतर चारजण गंभीर जखमी झाले. एक महिला अत्यवस्थ आहे. निखिल शशिकांत चौखंडे, प्रियांका निखिल चौखंडे,



शशिकांत यदुनाथ चौखंडे, अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. अत्यवस्थ महिला व जखमींची नावे उपलब्ध झाली नाहीत. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून अपघातग्रस्त वाहन घटनास्थळावरून बाजूला हटवण्यात आले. जखमींना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. रस्त्यावर वाहन उभे करून प्रवासी घेणाऱ्या गाडीचा चालक फरार झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शिक्षणमंत्र्यांचे शिक्षक भरतीचे आश्वासन फोल

## पवित्र पोर्टल सुरू झाले नसल्याने टीईटी उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये संताप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. १५ ऑगस्टपासून ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून, २४ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले होते. मात्र, प्रत्यक्षात पवित्र पोर्टल सुरू करण्यात आलेले नसल्याने शिक्षक भरती प्रक्रियेला सुरवात झालेली नाही. त्यामुळे शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिलेले आश्वासन फोल ठरले असल्याची टीका शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी केली आहे.

राज्यात शालेय शिक्षण विभागातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पदे शासन भरत नसल्याने रिक्त जागांचा आकडा दरवर्षी वाढत असतो, काही जागा समायोजन प्रकियेने भरण्यात येत असल्या तरी रिक्त जागांचा अनुशेष भरून निघत नसल्याने याचा विपरित परिणाम या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होत आहे. उच्च श्रेणी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांच्या पदोन्नतीचे पद व विस्तार अधिकारी व सहायक शिक्षकांची पदे कधी भरणार? व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत ७ जुलै २०२३ रोजी काढलेले परिपत्रक रद्द करावे, असा प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी विधानपरिषदेत तारांकीत प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केला होता.

शिक्षक भरतीबाबत औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिली होती. आता न्यायालयाने स्थगिती हटविली असून भरतीचे शेड्युल ठरवून दिले आहे. न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जिल्हापरिषद बिंदुनामावली कायम करून १५ ते ३१ ऑगस्टदरम्यान शिक्षक भरतीची जाहिरात पोर्टलवर प्रकाशित केली जाणार आहे. १ ते १५ सप्टेंबरदरम्यान प्राधान्यक्रम ठरविण्यात येणार आहे. त्यानुसार गुणवत्ता यादी १० ऑक्टोबरला प्रसिद्ध होईल. ११ ते २१ ऑक्टोबरदरम्यान नेमणुका देण्यात येईल. त्यानंतर २१ ते २४ ऑक्टोबरदरम्यान जिल्हा पातळीवर समुपदेशन करण्यात येईल. राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही लवकरच सुरू होणार असल्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर उत्तरात सांगितले होते.

परंतु, शिक्षक भरतीची प्रक्रिया १५ ऑगस्ट लोटूनही सुरू झालेली नाही. राज्याच्या शिक्षण विभागाला पवित्र पोर्टल सुरू करण्यात अपयश आले आहे.

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे यातून दिसून येत आहे. राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी टिईटी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. शिक्षक भरती सुरू होईल, अशी त्यांना आशा होती. परंतु, पवित्र पोर्टल अपवित्र झाल्याचे दिसत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. राज्य शासनाने तातडीने पवित्र पोर्टल सुरू करून शिक्षक भरतीची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी केली आहे.

# थकीत वेतन तातडीने निर्गमित करा : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सिध्दबली ईस्पात लिमी. कंपनी, आरसीसीपीएल (परसोडा लाईमस्टोन) विसापूर प्रस्तावीत कोळसा खाण आदी विषयाशी निगडीत विविध प्रश्नांबाबत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाद्वारे दि. 25 ऑगस्ट 2023 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, पोलिस निरीक्षक पडोली शिवाजी कदम, तहसीलदार विजय पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्नील राठोड, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे बिपीन भंडारे, यु.बी. भडूले, एमआयडीसी चे श्रीकांत जोरावर, गोपाल भिराख, राजु घरोटे, विनोद खेवले, विजय आगरे, ॲड. प्रशांत घरोटे, यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सिध्दबली ईस्पात कंपनीमध्ये अन्य मागासवर्गीय तसेच व इतर प्रवर्गातील कार्यरत पूर्व कामगारांना पूर्ववत रोजगार देवून त्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याची निर्देश हंसराज अहीर यांनी यावेळी दिले. सिध्दबली कंपनी बंद झाल्यापासुन पुर्ववत सुरू झाल्यापर्यंतच्या कालावधीतील अर्ध्या वर्षातील (अडीच वर्ष) वेतन कामगारांना देण्यात यावे अशी सुचना केली. या कंपनीमध्ये 4 कामगारांचा अपघातात मृत्यू झाला होता. त्या पिडीत कुटूंबियांना कंपनी अधिनियमानुसार नुकसान भरपाईपोटी आर्थिक साह्य त्वरीत अदा करण्यात यावेत असेही निर्देश दिले.

राज्यशासनाचे नोकरीविषयक धोरण 80:20 असतांना या कंपनीमध्ये स्थानिकांना शासनाच्या अनुपातात रोजगार उपलब्ध केला गेलेला नाही. उलट परप्रांतीयांना झुकते माप देवून कंपनीमध्ये प्राधान्य दिले गेले असल्याच्या तक्रारी असुन ही बाब स्पष्ट झाली आहे. शासनाच्या 80:20 या धोरणाचे अनुपालन होत आहे किंवा नाही याची स्थापित समितीच्या माध्यमातून सखोल चौकशी करण्याची सुचना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली. तसेच या कंपनीमध्ये अनेक कामगारांचा दुर्घटनेमुळे बळी गेला असल्याने व काही कामगाराचा संशयास्पद मृत्यू झाला असल्याने या सर्व प्रकरणाची गांभिर्याने चैकशी करून या चैकशीचा सविस्तर अहवाल आयोगाकडे निर्धारित अवधीमध्ये सादर करण्याचे निर्देशही हंसराज अहीर यांनी प्रशासनाला दिले.

# दिवंगत शिक्षकांच्या परिवाराने दिले वाचनालयास दीडशे ग्रंथ

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** बोरी- येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयास दिवंगत शिक्षक श्रीपाद वैद्य यांच्या कुटुंबियांनी दिडशे ग्रंथ भेट दिले. शुक्रवार दि. 25 रोजी सकाळी दहा वाजता जैन वाचनालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्य सुभाषतात्या घोलप हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रिन्स इंग्लिश स्कूलचे प्राचार्य जावेद कुरेशी, वाचनालयाच्या अध्यक्षा मीना जैन, उपाध्यक्ष पवन ओझा, संचालक दिपक राजूरकर, सूर्यप्रकाश सोनी यांची उपस्थिती होती. नोव्हेंबर 2022 मध्ये दिवंगत श्रीपाद वैद्य या शिक्षकाचे अपघाती निधन झाले होते .त्यांना वाचण्याची आवड असल्यामुळे त्यांच्याकडे बरेच ग्रंथ उपलब्ध होते. या ग्रंथांचा इतर वाचकांना फायदा व्हावा या उदात्त हेतूने प्रभाकरराव वैद्य व त्यांच्या परिवाराने जैन वाचनालयास हे ग्रंथ भेट देण्याचे ठरवले होते. त्यानुसार आज हा ग्रंथभेटीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ग्रंथदान दिल्याबद्दल प्रभाकरराव वैद्य यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर वैद्य परिवाराने दिडशे ग्रंथ जैन वाचनालयास भेट दिले. ग्रंथपाल नेमीनाथ जैन यांनी ते स्विकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात पवन ओझा म्हणाले की, वैद्य कुटूंबानी आमच्या वाचनालयास ग्रंथ भेट दिल्याने आमच्या संग्रहात निश्चितच मोठी वाढ होईल. प्राचार्य प्राचार्य जावेद कुरेशी यांनी वैद्य परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक करून ग्रंथालयास नागरिकांनी अशा प्रकारे मदत केली तर वाचनालय अधिक सक्षम होईल व याचा फायदा वाचकास होईल असे सांगितले.

# लम्पी हा केवळ गोवंशातील विषाणूजन्य त्वचारोग : डॉ. शेख अन्सार कंत्राटी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरातील सध्या लम्पी त्वचारोगामुळे राज्यात दहशतीचे वातावरण तयार होऊ लागले आहे. गायीचे दूध प्यावे की नाही, अशीही भीती काहींच्या मनात ग्रामीण भागात झाली आहे. पण काही भिती नाही दूध उकळून प्यावे यात काहीच तथ्य नसून, अगदी लम्पी झालेल्या गायीचे दूधसुद्धा मानवासाठी सुरक्षित आहे'. असे पशू वैद्यकीय डॉ. काकडे सोयगाव डॉ.शेख अन्सार कंत्राटी यांनी बोलताना सांगितले



आहे की, गायीचे दूध हे उकळून प्यावे आणि गाभन गायीला काही होत नाही व म्हशीला तर अजिबात काहीच होत नाही अशी माहिती पशू वैद्यकीय डॉ. काकडे यांनी बोलताना सांगितले. लम्पी स्किन डिसीजमुळे जनावरांमध्ये ताप, त्वचेवर गाठी डोळे आणि नाकातून स्राव, दूध उत्पादन कमी होणं आणि आहार घेण्यात अडचण निर्माण होणं ही लक्षणं दिसतात. विशेषतः ज्या जनावरांना यापूर्वी विषाणूचा संसर्ग पशू पालकांनी आपापल्या पशूंना लंपी प्रतिबंधक लसीकरण करून घेण्याचे प्रशासनाचे आवाहन झालेला नाही, त्यांच्यासाठी हा विषाणूजन्य संसर्ग घातक ठरू शकतो. या आजारामुळे गाभण गायी त्यामुळे जनावरांना लंपी प्रतिबंधक लस आजारावर नियंत्रण आणि प्रतिबंध ठरू शकते त्यामुळे पशुपालकांनी लंपी प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे लगेच संपर्क साधून लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पशू वैद्यकीय डॉ काकडे सोयगाव व डॉ शेख अन्सार यांनी मौजे सावळदबारा येथे लंपी लसीकरण मोहीमे अंतर्गत लसीकरण करताना सांगितले आणि जे काही जनावरे धारक असतील त्यांनी घाबरुन न जाता लसीकरण करून घ्यावे असे आवाहन डॉ शेख अन्सार यांनी केले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर